
# श्री साईलीला



पुण्यतिथि विशेषांक    किं. ७५ पैसे    ऑक्टोबर १९६५

स्थापना १९१६



साईबाबांच्या

मूर्ती पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



## श्री साई वाक्सुधा

ज्या सद्गुरुवर आपली निष्ठा असेल त्याच्यावर आपला सर्व भरिभार टाकावा. संत सर्वच श्रेष्ठ योग्यतेचे असतात, परंतु आपली गुरुमाऊली तीच आपली, तिला आपल्या खोडी, संवयी माहिती तीच आपल्या कल्याणाच्या दृष्टीनें जरूर तें करणार ही श्रद्धा असावी. साईबाबानीं जीं वचनें सांगितली आहेत तीं आपल्या हृत्पटलावर सदैव कोरून ठेवा. तींच तुमच्या शाश्वत कल्याणास कारणीभूत होतील. सर्वांचें ऐकून घ्यावें. कोणाचाही अनादर करूं नये; परंतु सारें लक्ष असावें गुरुवचनावर 'सारांश प्रेम करा गुरुवर। तया अनन्यभावें नमस्कार !

—श्रीसाईसच्चरित्

---


**पुण्यतिथी श्रीसाईलीला विशेषांक**

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४४ वें ] ऑक्टोबर १९६५ [ अंक ७ वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६२२६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

विजयादशमीच्या सुमुहूर्तावर १९१८ सालीं श्रीसाईबाबा समाधिस्थ झाले. त्या घटनेस आतां उणीपुरीं सत्तेचाळीस वर्षें होतील. आणखी तीन वर्षांनी या घटनेस अर्धशतक होईल. एवढ्या दीर्घ कालावधींत बाबा ज्या कार्यार्थ भूतलावर अवतीर्ण झाले तें भक्तकल्याणाचें व भक्तांना मार्गदर्शन करण्याचें कार्य अखंड व अव्याहत चालू आहे. ' मी देहानें तुमच्यांत वावरत नसलों तरी तुमच्यापासून मी दूर झालों असें समजूं नका. माझें घर तुमच्या अंतःकरणात आहे. जेव्हा जेव्हा भक्तिभावानें तुम्ही माझें स्मरण कराल त्या त्या वेळीं तुमच्या हाकेसरसा तुमच्या सहाय्यार्थ मी धांऊन येईन. त्याची तुम्ही चिंता करूं नका. मात्र वागण्यासंबंधीं मी जे जे कांहीं माणुसकीचे नियम सांगितले आहेत त्यांचें पालन करीत जा. माणसाच्या जन्माला येऊन माणसासारखे वागत जा. कोणाला अपशब्दांनें अपमानीत करूं नका. तो माझाच अपमान होईल. तुमच्या दारावर कोणीही भुकेलेला प्राणी येवो, त्याला अन्न संतर्पण करा. त्याला विन्मुख करून परत पाठवूं नका. तुम्हीं तसें केलें तर मलाच विन्मुख पाठविल्यासारखें होईल. सर्वांशीं प्रेमानें. वागा दुसऱ्याच्या उपयोगी पडण्यासाठीं झटा. म्हणजे तुमचें कल्याण होईल. ”

बाबांनीं या व आणखी अनेक गोष्टी मानवधर्माच्या रूपानें सांगितल्या आहेत त्याप्रमाणें जे वागतात, त्यांना कोणत्याही बाबतींत असो; बाबांचा सहकार प्राप्त झाल्याशिवाय रहात नाहीं.

बाबा देहानें आज आमच्यांत नसले तरी ते नसूनही असल्यासारखेच आहेत. जे जे कोणी श्रद्धेनें त्यांचा धांवा करतात त्यांना ते पावल्याची प्रचीती आल्याशिवाय रहात नाहीं. वर्षांनुवर्षे गेली सत्तेचाळीस वर्षे बाबांच्या मागें शिरडीचें महात्म्य जें उत्तरोत्तर वाढत चाललें आहे तें का उगाच ? शिरडीत बाबांच्या समाधिस्थानापुढें रोजच्या रोज पूजा अर्चेचा अभिषेकांचा व इतर धार्मिक कार्यांचा जो धुमधडाका चालू असतो, त्यावरून काय समजायचें ! बाबा आपल्या भक्तांची आजही काळजी वहात आहेत.

विजया दशमी म्हणजे बाबांच्या प्रयाणाचा पुण्यदीन. जाणें, येणें, जगणें, मरणें या उपाधि साधुसंताच्यांठायीं संभवत नाहींत. त्यांना दोन्हीं क्रिया सारख्याच. त्यांना काळाचें बंधन नसतें. भक्तांचे कल्याण हेंच त्यांचें ध्येय असतें.

बाबांनीं आम्हांला मार्गदर्शनपर पुष्कळ गोष्टी सांगितल्या. त्यांपैकीं फक्त दोन गोष्टी जरी आम्हीं आचरणांत आणिल्या तरी आमचें कोटकल्याण होईल श्रद्धा आणि सबुरी

दोन साधेच व सहज उच्चारतां येण्याजोगे शब्द; परंतु त्यात किती खोल अर्थ भरलेला आहे. साऱ्या जीवनांतील यशस्वीतेचें सार त्या दोन शब्दांत सामावलेलें आहे.

श्रद्धा आणि सबुरी ! आजवर या साईलीलेंतून या दोन शब्दांसंबंधीं किती तरी लिहिण्यांत आलें असेल. तरीही त्यावर पुन्हां पुन्हां भाष्य करण्याचा मोह मनाला झाल्याशिवाय रहात नाहीं; कारण त्या दोन शब्दांत जीवनाला अमृतत्वाप्रत घेऊन जाण्याची ताकद आहे. मनुष्याला सामर्थ्यसंपन्न पराक्रमी व यशस्वी बनविणारे ते अमोघ शब्द आहेत.

कोणतेंही कार्य असो. ते तुम्हीं श्रद्धायुक्त अंतःकरणानें करूं लागला तर तुमचा उत्साह व आनंद द्विगुणीत झाल्याशिवाय रहाणार नाहीं. यशाचा मार्ग तोच आहे. श्रद्धा आणि विश्वास या दोन शद्बांची कांस धरून तुम्हीं कोणतेंही कार्य करूं लागा कोणतीही जबाबदारी शिरावर घ्या. त्यांत तुम्हांला यश मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं.

आज आमचे जवान पाकिस्तान्यांशीं अनेक आघाड्यांवर यशस्वी सामना देत आहेत. तो कशाच्या बळावर ? ते ज्यासाठीं लढत आहेत तें कार्य न्यायाचें आहे. व त्या कार्यांत अंतिम जय आमचाच आहे, अशी त्यांची संपूर्ण श्रद्धा आहे. ' यतो धर्म स्ततो जयः ' ज्या बाजूला सत्य व धर्म आहे त्याचाच जय होणार ही आमच्या शूर जवानांची खात्री आहे व त्यामुळें श्रद्धापूर्वक व मोठ्या जिद्दीनें शत्रूशीं सामना देऊन त्याचा पाडाव करीत आगेकूच ते करीत चालले आहेत.

श्रद्धेमुळें आपलें अंतःकरण आशेनें प्रफुल्लित झालेलें असतें त्यामुळें क्षणोक्षणीं आपला उत्साह वृद्धिंगत होत असतो व पदोपदी यशाशी गांठभेट होत असते. श्रद्धा म्हणजेच सामर्थ्य. तुम्हीं कोणतेंही कार्य हातीं घ्या. आणि तें संपूर्ण श्रद्धा युक्त अंतःकरणानें हाताळा. त्यांत तुम्हांला यश आलेंच पाहिजे.

आज प्रत्येक भारतवासायाची अशी दृढ श्रद्धा आहे कीं, सध्यां जो जीवन-मरणाचा झगडा चालू आहे त्याला कितीही भयाण व प्रखर स्वरूप प्राप्त झालें तरी शेवटीं जय आमच्याच पदरांत पडणार आहे. ही श्रद्धा एकट्या दुकट्याची नाहीं. ती देशव्यापी व सर्व भारतीयांची आहे. तिचा योग्य तो परिणाम आपणास आज नाहीं उद्यां, दिसल्याशिवाय रहाणार नाहीं.

श्रद्धा आणि सबुरी ! कोणतीही गोष्ट तडकाफडकी पार पडूं शकत नाहीं. धीर धरला पाहिजे. धीर धरणें हें ताकदीचे एक प्रमुख लक्षण आहे. खरी श्रद्धा कोणती ? जी कोणत्याहि परिस्थितींत अविचल राहूं शकते ती. श्रद्धा परिपूर्ण पाहिजे. डळ-मळींत व लेचीपेची श्रद्धा काय बरें कामाची !

तुम्हीं हातीं घेतलेले कार्य न्याय्य व सत्याचें आहे ना ? तुम्हीं कोणाचें वाईट चिंतिलें नाहीं. तुम्हीं कोणाच्या अपहार करण्याची वृत्ति बाळगली नाहीं. तुम्हीं दुसऱ्यांच्या मार्गांआड कधीं आलां नाहीं. तुम्हीं तुमच्या विकासासाठीं झटत होतां. त्या तुमच्या मार्गांत विघ्न आलें. माणसावर तशीच देशावरही संकट आलें असतां भागूबाईप्रमाणें मुळू मुळू रडत का बसायचें आहे ? दंड थोपटून संकटांशीं सामना देण्यासाठीं पुढें सरसावणें हीच माणुसकी.

ती माणुसकी प्रगट करण्याची संधी वाट्यास येणें हें महत् भाग्य होय. प्रत्येक माणसाच्या वाटयास लहान मोठ्या प्रमाणांत ही संधी कधीं ना कधीं येतच असते. ' रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग ! ' असें म्हटलें आहे तें उगाच नाहीं. या संसारांत वावरत असतांही आपल्यावर घरगुती व सामाजिक युद्धाचे प्रसंग प्रत्यहीं येत असतात. त्या त्या प्रसंगी दबून न जातां श्रद्धायुक्त अंतःकरणानें आलेल्या प्रसंगास धैर्यानें तोंड देण्यासाठीं पुढें या. यशापयशाची चिंता तुम्हीं करूं नका. तुम्हीं जोर काढा. आपल्या कामास लागा. संपूर्ण श्रद्धेनें कामास लागा. तुमच्या रक्षणासाठीं, तुम्हांला यश मिळवून देण्यासाठीं, तुमच्या पाठीशीं हातीं दुधाची वाटी घेऊन मी खडा आहे. याची जाणीव सतत ठेवा. मी सांगितलेलें कधींही वाया जाणार नाहीं. मात्र ' श्रद्धा ' आणि ' सबुरी ' हे दोन शब्द आपल्या अंतःकरणावर सतत कोरलेले राहूं द्या. त्यामुळें प्राप्त होणाऱ्या दिव्य प्रकाशांत वावरा; म्हणजे यश तुमच्याकडे धांव घेत येईल.

बाबांचें पुण्यस्मरण आम्हांला नेहमींच होत असतें; परंतु त्यांतल्या त्यांत हा चालू आठवडा विशेष महत्त्वाचा आहे. हा विजयादशमीचा आठवडा आहे. बाबांनीं ज्या दिवशी देहविसर्जन केला ' जे एका ठायीं होते । ते सर्वांठायीं झालें — असा हा पुण्यप्रद आठवडा आहे.

बाबांचे कृपाछत्र तुम्हा-आम्हावर सदैव आहे. त्यांची अमृतवाणी सतत दृष्टीपुढें ठेऊन आम्हीं मार्गक्रमण करूं या. म्हणजे त्यांच्या कृपाप्रसादास आम्हीं पात्र झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

—संपादक

# कर्तव्य पालनाचें महत्व

## बाबांचा 'ही' सिद्धांत

लेखकः— इ. श. टिपणीस

पुंडलीकाचें चरित्र सर्वांना ठाऊक आहे. माता पित्याच्या सेवेचा आदर्श म्हणून सर्वांनीं त्याची आठवण करावी. पुंडलीकाची सेवा निःस्वार्थी होती. कोणत्याही शाळा वा कॉलेजांत न शिकलेला तो एक तरुण होता. आईवडिलाच्या डबोल्यावर नजर ठेऊन त्यांची सेवा करणारा तो आधुनिक तरुण नव्हता. आईवडिलाकडून चार पैसे मिळतात म्हणून मोठ्या हौसेने त्यांची सेवा करणारा तो अलिकडील विद्यार्थीही नव्हता. आईवडिलांच्या जवळ असलेल्या पुंजीच्या, प्रमाणांत त्याची सेवा नव्हती. पुंडलीकाला आईवडिलाकडून आशिर्वादाखेरीज कांहींहीं नको होतें. आम्हाला म्हातारी म्हातारा नकोशी होतात. त्याला हवीशी होती. त्या वयांत त्यांचीं सेवा करणें ही सर्वांत श्रेष्ठ भक्ति आहे असें तो समजे. सेवा म्हणून तो सेवा करी. त्याच्या सेवेंत कोठेंही आसक्ती नव्हती. आईवडिल हेच त्याच्या हृदयमंदिरांतील देव, तेच परमेश्वर आणि तेच भगवान. त्यांची सेवा हीच देव भक्ति. हीच देवपुजा गीतेंतील कर्मण्येवाधिकारस्तेंत त्याच्या सेवेचा उगम होता. फलत्यागपूर्वक आईवडिलांची सेवा हेंच त्याचें व्रत. हीच त्याची तपश्चर्या. या खेरीज दुसरें कांहीं तो जाणत नसे. या सर्व गोष्टी आपणांस माहीत आहेत. पण माहीत नाहीं असें आणखी कांहीं आहे. 'स्वधर्मे निधनं श्रेयः' या भगवंताच्या उक्तीत तें आहे. पुंडलीकाच्या चरित्राची ही बाजू लहान थोर सर्वांनीं लक्षांत घ्यावी अशी आहे. म्हणून ती संबंधी थोडक्यांत विचार करूं.

### पुंडलीक वरदे हरि विठ्ठल

देवाला, पांडुरंगाला पुंडलीकानें विटेवर उभा केला हें सर्वश्रुतच आहे. पंढरीला जाणारा प्रत्येक भक्त हें डोळ्यांनीं पहात असतो? पण त्यांतील रहस्य तो जाणत नसतो. पंढरींत आवाज घुमत असतो." मी कंबरेवर हात ठेवून पुंडलीकाची सेवा बघितली. त्याच्यावर माझी नजर होती. कृपा होती. आजही तेंच करीत आहे. मी उभा आहे, सर्व भक्त मला दिसावेत म्हणून. लाखांनीं माझ्याकडे लोक येतात. बघतो आहे त्यांत कोण सच्चे सेवक आहेत, कोण भगवान आहेत. स्वकर्तव्यांतच मला पाहून त्यांत चूर होणारे कोणकोण आहेत व केवळ माझ्या नांवानें ओरडणारे, बुक्का माळा धारण करणारे कोण आहेत." हा आवाज ज्यांना ऐकू येतो असे भक्त थोडेच.

पुंडलीकाचें नांव घेणाऱ्यांच्या जीवनांत पुंडलीक नाहीं. 'पुंडलीक वरदे हरी विठ्ठल,' हा गजर मात्र घुमत असतो. पहावें तिकडे भक्तीचा नुसता भाजीपाला त्यांतही ( बोल ) घेवड्यांचे पीक अमाप.

## देवाला पुंडलिकाचें उत्तर

कर्तव्याकर्तव्याचा संशय निर्माण झाला असतां अचूक मार्गदर्शन करणारा ही-सिद्धांत भगवंतांनीं गीतेंत सांगितला त्याचीच आठवण पुंडलिकानें भगवंताना करून दिली व देवा, तुम्ही तुमचा उपदेश विसरलांत तरी आम्ही भक्त मात्र तो विसरूं शकत नाही हें दाखवून दिलें. पुंडलीकाचा हा ही-सिद्धांत त्याच्या जीवनाचें ध्येय होतें. पुंडलीक करीत असलेली आईवडिलांची सेवा पाहून देव प्रसन्न झाला व मनुष्यरूपांत पुंडलिकासमोर उभा राहिला. त्यावेळीं पुंडलिक आईवडिलांची सेवा करीत होता. देवाला पाहून त्यानें नमस्कार केला व एक वीट त्याच्याकडे फेंकून त्यावर उभे राहण्यास सांगितलें. देव वाट पहात उभा राहिला. पण पुंडलिकाची सेवा संपेना व तो देवाकडे पाहिना. शेवटीं देव म्हणाला, "पुंडलिका, माझें दर्शन घेण्यास लोक आतुर झालेले असतात. उपाशीतापाशी धक्केबुक्के खात उन्हातान्हांत माझ्या दारीं तिष्ठत असतात. पण मी होऊन तुला दर्शन देण्यास तुजकडे आलों असतां तूं मजकडे ढुंकूनहि पहात नाहींस. हें कसें?" पुंडलीकानें उत्तर दिलें, "देवा, तूं देव आहेस हें खरें. पण मला माझें आईवडील हें देव आहेत. तेही खरें व हेंही खरें. हाही सिद्धांत मी पाळतो. 'माझ्या देवांत माझें लक्ष आहेच मग आणखी तुझ्याकडे तें काय निराळें लक्ष द्यायचें! हा देव काय आणि तूं देव काय, एकच. तुझी गीता तूंच विसरलास वाटतं." पुंडलीकाचें हें उत्तर मार्मिक आहे. हा ही-सिद्धांत सर्वांनीं घ्यावा असा आहे. आपला रोजचा व्यवहार करतांना आपल्या कर्तव्यांत आपणांस देव दिसला पाहिजे. स्वकर्तव्यें करणें ही श्रेष्ठ देवपूजा आहे, चांगली वाईट पारखून मग जशी आपली भावना व वृत्ति तसें आपण वागावें. दुसऱ्यांची नक्कल कामीं नाहीं. आपलें तें आपलें, त्यांतच देव पहावा.

## बाबांचा सिद्धांत

आहे तें सर्व चांगलेंच आहे. जगांत हेंही खरें व तेंही खरें. अध्यात्मांत दुसऱ्याचें पाहून तसें करणें हें जसें चूक आहे, तसेंच माझेंच बरोबर हा हट्टही घातक आहे. दुसऱ्याचा भक्तिमार्ग चूक, माझाच बरोबर हें जितकें अयोग्य आहे तितकेंच हेंही अयोग्य कीं माझा मार्ग चूक व दुसऱ्याचा बरोबर ही गोष्ट. चौपाटीवरील शामा व काका यांच्या भागवत वाचनाच्या प्रसंगीं घडलेल्या घटनेचें जें वर्णन साईचरित्रांत आलें आहे तें वाचल्यावर सहज ध्यानीं येईल. 'अज्ञानाची' तरफदारी करतांना पूर्वींचेही बरोबर व आतां मी सांगतो तेंही योग्यच असें म्हणून ही-सिद्धांतच बाबानी चांदोरकरांच्या ध्यानीं आणून दिला आहे. खरं म्हणजे तेंही बरोबर हेही बरोबर. सर्व

खल्विदं जर खरं तर देवळाच्या गाभाऱ्यांत देव आहे हेंही खरं आणि कर्तव्याच्या गाभाऱ्यांत देव आहे हेंही खरं. यांत योग्य अयोग्य नसून पचणें न पचणें आहे. पचेल तें खावें व रुचेल तें बोलावें. तद्वत् अध्यात्मांत पचेल तो मार्ग व रुचेल तो देव असावा. दुसरा म्हणतो वा करतो म्हणून कां आपण तसें करावयाचें ? यांत नुकसान आहे. कोणी रोज वीस पोळ्या खाईल तर दुसरा एखादा पांच खाईल. दोघेही जीवन जगतात व कार्य करतात. मग त्यांना आडकाठी कां करावी ? खाता आहेत तर खाऊं द्या. त्यांतच त्यांचें हीत आहे. पांचवाला विसवाल्यासारखें करील तर अजीर्णानें मरेल व वीसवाला पाचवाल्या सारखे करील तर उपाशी मरेल. ज्यानें त्याने आपल्या पावलाप्रमाणें चालावें. कोणी हळूं चालतील कोणी जलद चालतील. पण अंतीं एकाच मुक्कामावर येऊन पोहोंचणार सगळें. कमी जास्त वेळ एवढाच फरक. यामुळें हाही देव आणि तोही देव. इथेंही आणि तिथेंही. घर देवळासारखें वाटले पाहिजे व देऊळ घरासारखें वाटलें पाहिजे. घरांत देव दिसावा व देवळांत घर दिसावें. देऊळ व घर, देव व मानव हें एकांत एक पहावेत; कारण हें ही खरें आहे आणि तेंही खरें आहे. या ही—सिद्धांताच्या अभावामुळें लोकधर्मीघळे होतात. हा ही—सिद्धांत जर मानवानें मानला व आचरणांत आणला तर जगांतील धार्मिक भांडणें बंद पडतील.

## आई वडिलांच्या सेवेचें महत्व

ही सिद्धांत भागवत धर्माचें मर्म आहे. म्हणून साईबाबानीही तो आपल्या भक्तांच्या अनेक वेळां ध्यानीं आणून दिला आहे. स्वधर्माच्या आंधळेपणामुळें मानवांत भेदाभेद झाले आहेत. एकाच धर्मांतील अंतर्गत पंथीयांत प्रेम व सलोखा असण्या-ऐवजीं मत्सर, द्वेष मी तूंपणा असलेला दिसून येतो. नाना दैवतें व नाना गुरु यामुळें धर्मसाधना करण्यास सर्वांना वाव मिळावा, धर्मवृत्ती निर्माण व्हावी व एक दिल व्हावा पण प्रत्यक्षांत त्या ऐवजीं फाटाफूट, भांडणतंटे व फाजील अभिमान निर्माण झालेले आपल्या अनुभवास येतात याचें कारण ही-सिद्धांताची आपण ओळख करून घेत नाहीं व तो पाळीत नाहीं. अनेकत्वांत एकत्व व एकत्वांत अनेकत्व पहाण्याची दृष्टी हल्लींच्या धर्म साधनामुळें आमच्या ठायीं निर्माण होत नाहीं. ही दृष्टी म्हणजेच 'ही' सिद्धांत. आईवडिलांची सेवा हाही भक्तिमार्गच आहे व आईवडिलांच्याठायींही परमेश्वर रूप आहे हाही सिद्धांत पुंडलीकाच्या उदाहरणानें सिद्ध करून दिला आहे. सर्वं खल्विदंचें प्रतीक ही सिद्धांत व ही सिद्धांताचें प्रतीक पंढरीचा विठोबा व ही-सिद्धांत प्रत्यक्षांत सिद्ध करून दाखवणारा पुंडलीक. यामुळें हरि विठ्ठलच्या पंक्तीत पुंडलिकाला स्थान मिळालें आहे. म्हणून पुंडलीक वर दे हरि विठ्ठल असें म्हणण्याची प्रथा पडली आहे. हा ही-सिद्धांत आपण अधिक व्यापक केला व सर्व मानवांच्याच ठायीं नव्हे तर प्राणिमात्राच्याही ठायीं देव पहाण्याची दृष्टी

आपण ठेवली व त्या दृष्टीनें मानवाची सेवा आपण करीत राहिलों तर ती एक श्रेष्ठ सगुणभक्ति ठरेल, याच भक्तिमार्गाची आजच्या जगास अधिक जरुरी आहे.

भजनपूजनादिपेक्षां मानवी सेवेनें देव लौकर प्रसन्न होतो, एवढेंच नव्हे तर तो अशा भक्ताच्या आधीन राहतो हें पुंडलिकानें सहोदारण दाखवून दिलें आहे. देवरुप मानून कोणाचीही सेवा लहान मोठी मनोभावें केली तर ती फळास आल्याशिवाय राहणार नाहीं. भावनेंत देव असतो. देवळांतील पाषाण मूर्तींत वा कागदाच्या फोटोंत देव आहे अशी दृढ भावना टेवून आपण भक्ति करतों पण चालत्या बोलत्या मानवाच्या ठायीं तशी भावना आपण ठेवूं शकत नाहीं हें आपली बुद्धि व भावना रुढीच्या दगडाखालीं दडपून गेल्याचे लक्षण आहे. पुंडलिकानें रूढीला झुगारून दिलें. एवढेंच नव्हे तर सेवेपेक्षां देवाचेंही महत्व कमी आहे असे त्यानें दाखवून दिलें. धार्मिक रुढीनीं आपल्या भावनाना निष्कारण केलेले अटकाव बाजूस सारून खरा शुद्ध भक्तिमार्ग आपण स्वीकारला पाहिजे हा भक्तिमार्ग भागवत धर्मानें जनतेला खुला करून दिला आहे व त्याचें शुद्ध व पवित्ररूप एकनाथानें विशद केलें आहे. यांत कर्तव्याला महत्व आहे. करीत आहोंत तें देवाचेच कार्य आहे या दृष्टीनें निःस्वार्थीपणें व सेवावृत्तीनें कर्तव्य करीत राहिल्यानें उच्च दर्जाची अध्यात्मिक साधना आपल्या हातून घडत. यास्तव साईबाबानीं कर्तव्याला आपल्या अध्यात्मांत महत्त्वाचें स्थान दिलें आहे.

### बाबानीं जागृती आणिली

पंतनामे एक गृहस्थ बाबाच्या दर्शनास गेले असतां बाबाना पाहिल्याबरोबर ते झीट येऊन पडले. बाबानीं उदी लावून थोड्यावेळानें ठीक होईल म्हणून सांगितलें, पंत शुद्धिवर आले. आपणाला कोणीतरी झोपेंतून जागृत केलें, असें त्यांना वाटूं लागले. हुषारी व उत्साह वाटूं लागला. जागृति देण्याचा झीट हा एक प्रकार होता. अंतर्गत जी जागृति आली तिची कल्पना पंताना होणें शक्य नव्हतें म्हणून त्यांना बाबा म्हणाले, " स्व गुरुला विसरून माझ्या दर्शनास आलास. शिष्याच्या कर्तव्याची विस्मृती तुला झाली होती. त्याची जागृती मी दिली आहे. लक्षांत ठेव कीं कांहींही झालें तरी आपलें कर्तव्य, आपलें कार्य कधींही सोडूं नये. तुमच्या गुरुच्या ठायींच तुम्ही देव पहावयाचा होता. येथें येऊन देव पहाण्याची कांहीं जरुरी नव्हती. "

येवो म्हणती प्रसंग कांहीं । ' अपना तकिया छोडना नहीं । '
सदा सर्वदा निश्चल राहीं । अनन्य पाहीं एकरवीं ॥ अ.२६–५५

### पूर्वी एकटा होतों !

दुसरी एक घटना पहा. सुरवातीस बाबा टांगलेल्या वीतभर फळीवर शयन करीत असत. पुढें त्यांनीं ती फळी तोडून टाकली व म्हाळसापती वगैरे भक्तांबरोबर ते खालीं झोपूं लागले. एके दिवशीं काका दिक्षितानीं बाबास विचारलें, " बाबा पूर्वी-

प्रमाणें तुम्हीं आतां फळीवर शयन कां करीत नाहीं ?" बाबा म्हणाले, "अरे पूर्वी मी एकटा होतों. आतां म्हाळसापती सोबतीला आहे. त्याला टाकून एकटा कसा झोपूं ?" दिक्षित म्हणाले, "मी आणखी एक फळी टांगून देतो. त्यावर म्हाळसापती झोपेल." बाबा म्हणाले, "छे रे, तें शक्य नाहीं. जें मी करीन तें तो करूं शकणार ? माझें काम तें माझें काम, फळी ही बिछाईत माझीच. त्याला नाहीं साधणार तें. "म्हणोनि आपुलें आपल्या संगे। दुजियाचें तें दुजिया संगे। हें तो बाबा वेळ प्रसंगे। भक्तानुरागे अनुदत॥ ज्याची जशी योग्यता तसें तो काम करतो. तसा त्याचा मार्ग असतो. आपण आपल्या योग्यतेप्रमाणें मार्ग घ्यावा. व कार्य करावें. दुसरा करतो म्हणून आपण तें करणें हानीकारक आहे. ज्यानें त्यानें आपल्या ताकदीप्रमाणें भावनेप्रमाणें व परिस्थितीप्रमाणें आपल्या भक्तिमार्गाची निवड करून तेथेंच चिकटून रहावें व मनोभावें आसक्तीरहीत सेवा करावी, यांतच हीत आहे. हीच सेवा कृष्णार्पण होते.

असा हा ही–सिद्धांत आहे. आज समाजास सर्वसाधारणपणें निःस्वार्थपणें कर्तव्य करीत रहाण्याची वृत्ति कमी होत असून स्वार्थ व सुखाकडे तिचा काटा अधिकाधिक झुकत असुन कौटुंबिक, सामाजिक व राष्ट्रीत अधिकाधिक डावललें जात आहे. ही स्थिती मूळ ठिकाणीं आणण्यास शाळा कॉलेजांतील शिक्षण भाषणें व उपदेशांमृताचे डोस हा उपाय नसून भागवतधर्म मृदंग वा टाळा माळा मध्यें न ठेवतां तो आपल्या दैनंदिन आचरणांत आणणें हा आहे. त्याचप्रमाणें जगांत सलोखा व शांतता राखण्यासाठीं भागवत धर्मांतर्गत ही–सिद्धांत आचरणांत आला पाहिजे. समोर मृत्यू दिसत असतांही केवळ कर्तव्य बुद्धीनें आपल्या जागेला चिकटून राहणारें '**कॅसाबियंका**' आज जगाला पाहिजे आहेत.


॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें लोंकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

**※ आमची कोठेंही शाखा नाहीं. ※**

# साधकासाठीं कांहीं विचार

संसारी माणसाच्या वाट्यास राग आणि द्वेष हे दोन दुर्गुण कधीं येतील हें सांगतां येणें कठीण आहे. उठतां बसतां रागाशीं तसाच द्वेषाशीं सामना द्यावा लागत असतो. आपल्या मनाविरुद्ध कांहीं घडलें कीं रागाचा पारा चढलाच म्हणून समजावें सर्ववेळीं सान्याच गोष्टी आपल्या मनाप्रमाणें घडतात असें थोडेंच आहे?

हे दोन्हीं दुर्गुण आपल्या कल्याणाआड येणारे आहेत हें जाणून त्यांना आटो-क्यांत आणण्याचा प्रयत्न प्रत्येकानें केला पाहिजे. त्याशिवाय आपलें पाऊल पुढें पडणार नाहीं.

राग आणि द्वेष यांच्यापासून आपली सुटका जोपर्यंत होणार नाहीं, तोंपर्यंत तुमच्या कर्मयोगांत ज्ञानयोगांत किंवा भक्तियोगांत तुम्हीं बिलकूल प्रगती करूं शकणार नाहीं. फार कांय? कोणत्याही कार्यांत तुम्हाला सिद्धी मिळूं शकणार नाहीं. यासाठीं ज्याला स्वतःचें कल्याण साधायचें आहे त्यानें राग आणि द्वेष यांच्यापासून सुटका करून घेण्यासाठीं अहर्निश झटलें पाहिजे. यासाठींच श्रीकृष्णांनीं गीतेंत रागद्वेषापासून मुक्त होण्याबद्दल ठायी ठायीं आवाहन केलें आहे. त्याच्याशिवाय तुम्हीं अंतःकरणाची प्रसन्नता मिळवूं शकणार नाहीं.

तुम्हांला समता साधतां आली पाहिजे. परंतु राग आणि द्वेष यांच्या तावडींत सांपडलेल्या माणसाच्या अंतःकरणांत सतत चलबिचल चालू असते. त्याला स्थीरपणा नसतो. माणसांत स्थीरपणा, स्थैर्य आलें पाहिजे. फार कठीण आहे ही गोष्ट; परंतु आपण ती प्रयत्नेंकरून साध्य करून घेतली पाहिजे. कारण त्याशिवाय तरणो-पाय नाहीं.

क्षणोक्षणीं या संसारांत अनुकूल प्रतिकूल, मनासारखें व मनाविरुद्ध हें द्वंद्व चालूच असतें. कारण आपण त्याला अंतःकरणांत आश्रय दिलेला असतो.

मनाविरुद्ध एखादी घटना घडून आली कीं, उद्वेग, भय संताप, ईर्षा, चिंता वगैरे नानाविकार उचल खातात त्यांना आवरायचें कसें? तें सहजासहजीं होण्यासारखें नाहीं. त्यासाठीं त्या भावनांवर अखंड पहारा ठेवण्यांत आला पाहिजे. उठतां बसतां त्या दोषांच्या आहारी न जाण्याचा निर्धार करून तो अमलांत आणण्यासाठीं आपण बद्धपरिकर झालें पाहिजे.

राग वा द्वेष या दोन्हीं दुर्गुणांची हकालपट्टी केल्याशिवाय तुम्हांला वरची पायरी चढतां येणार नाहीं

राग, द्वेष, आनंद, दुःख या ज्या भावना आहेत त्या कां बरें डोकें वर करतात ? याचें कारण आसक्ति. मला हें हवें तें हवें. मला हें मिळालें नाहीं, तें मिळालें नाहीं ही भावना. आम्हीं या भावनांना चिकटून रहाण्यांत आनंद मानतों परंतु त्यामुळेंच अखेर आपल्या वाट्यास दुःख येतें. राग, द्वेष या भावना उचंबळून वर येतात. ती आसक्ति सुटली पाहिजे. याचाच अर्थ अंगीं वैराग्य बाणलें पाहिजे. जेथें वैराग्य संचारलें आहे तेथें संसारांतील सुखोपभोगांबद्दल तिटकाराच वाटणार. कोणी कितीही विद्वान असो; महापंडित असो वा महाज्ञानी असो. त्याच्याठायीं जर वैराग्य बाणलें नसेल तर त्याचे तें ज्ञान व विद्वत्ता सारी व्यर्थ समजली पाहिजेत.

आपली नेहमीं घडपड चालू असते. कशासाठीं ? कांहीं तरी मिळवायचें असतें आपलाला ? घडपड चालावी उच्च ध्येय गांठण्यासाठीं. भगवंताची कृपा साध्य करण्यासाठीं; परंतु आपल्या वासना, कामना, इच्छा, आकांक्षा साऱ्या असतात ऐहिक सुखोपभोगासाठीं. गोडी लागली पाहिजे भगन्नामाची. आनंद वाटला पाहिजे त्या नामाचा. या जगांत शाश्वत सुख देणारे जर कांहीं असेल तर तें म्हणजे भगवन्नामच होय. त्याला सतत चिकटून राहिल्यानें तुमच्या मनांतील, राग, द्वेष या भावनांस आपोआप तिलांजली मिळेल.


## " साई भक्तांस अमूल्य संधी "

श्री साईलीला १९५८ ( त्रैमासिक ) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ ( मासिक ) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक ( विशेष अंकासह ) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, ( विशेष अंकासह ) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळे. ( एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे, ) ( दोन अंकास १५ पैसे, ) ( तीन अंकास २० पैसे, ) ( चार अंकास २५ पैसे. ) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी–किंमत टपाल खर्चासह ( स्टँप–तिकिट ) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक

श्री साईलीला मासिक

# आम्हीं दुःखी कां?

लेखक —एक आत्मानुभावी

**जगांत सर्वत्र आनंदी आनंद व मांगल्य ओतप्रोत भरलेलें आहे. भगवंतानें आपल्या सुखासाठीं व आनंदासाठीं ही सृष्टी निर्माण केली आहे. असें असतांही आम्हीं दुःखी कष्टी व चिंताक्रांत स्थितींत कां बरें असावें?**

सुखाऐवजी व आनंदाऐवजीं जिकडे पहावें तिकडे दुःखच दुःख कां बरें आढळून यावें? असंख्य लोक दुःखानें पोळलेले कां बरें दिसावें? आणि प्रत्येक मनुष्य पहावा तर सुखोपभोगासाठीं सतत धडपड करीत आहे. सुख! सुख! आणि सुख! दुसरें कांहीं नको! असें असतां त्याच्या हातीं दुःखाचा भरलेला प्याला कां बरें यावा!

## सुखाचें वास्तव्य

कारण मनुष्य ज्या सरळ मार्गानें जायचें तो सिधा मार्ग सोडून भलत्याच मार्गानें भ्रमंति करीत आहे. त्यामुळें सुखमय सृष्टि दुःखमय होऊन राहिली आहे. मानव दुःखीकष्टी कां? कारण तो स्वत्वाला विसरलेला आहे. पारखा झालेला आहे. सुख धुंडाळण्यासाठीं कुठें बाहेर भटकायला नको. तें त्याच्याचठायीं वास करीत आहे. त्यानें स्वतः कोण हें जाणून घेतलें पाहिजे. त्यानें स्वस्वरूपाची जाणीव करून घेतली पाहिजे. मायेचा पडदा ताडकन् फाडून टाकून त्याच्या पलिकडे काय आहे. हें पहाण्याचा झटून प्रयत्न केला पाहिजे. मायाजालांत गुंतल्यामुळें किंवा त्यांत सांपड-ल्यामुळें त्याची पुरी फसवणूक झाली आहे. तो अज्ञानांधकारांत रात्रंदिवस वावरत आहे. मग त्याच्या वाट्यास सुखाऐवजी दुःख आल्यास त्यांत नवल तें कसलें! हा सारा अज्ञानाचा प्रताप आहे बरें!

## तो पुण्यस्पर्श!

ही सभोंवारची सारी सृष्टि भगवंताच्या स्पर्शानें पुण्यपावन झालेली आहे. त्या स्पर्शामुळेंच तिच्यांत माधुर्य व मनोहारित्व आलेलें आहे. तसा त्याचा पुण्यस्पर्श तुम्हांला कां होऊं नये? आणि तो झाला असतां तुमचीं सारीं दुःखें लयाला गेल्या शिवाय कशीं रहातील! तुम्हीं त्या स्पर्शापासून स्वतःला दूर ठेवलें आहे. आणि म्हणून तुम्हीं दुःखीकष्टी! ज्याला पकडींत धरायचें त्याला सोडून तुम्हीं

नसल्या व्यापांत स्वतःला गुंतवून घेतलें आहे. जगांतील ज्या दुःखदायक गोष्टी त्यानांच तुम्हीं चिकटून बसलेले अहांत मग तुमच्या वाट्याला दुःख आलें तर त्यांत नवल कसलें ?

## आम्हीं दुःखी कां?

ज्या गोष्टी क्षणभंगुर ज्यांच्यामुळें लवलेशही सुखप्राप्तीची आशा नाहीं त्याच्या मार्गें लागल्यानें तुमच्या वाट्यास दुःख नाहीं तर दुसरें काय बरें येणार ?

संपदा, मुलेंबाळें, मानसन्मान हीं मिळाली म्हणजे मी सुखी होईन अशी तुमची खोटी कल्पना ! परंतु हीं सारीं साधनें क्षणभंगुर आहेत याची तुम्हांला कल्पना का नाहीं ! मग कां त्यांच्या मोहांत पुन्हां पुन्हां सांपडतां ?

समजा हीं सारीं साधनें ज्याच्या वाट्यास आलीं आहेत ते तरी सुखी समाधानी आहेत का ? तुम्हीं हीं सुखाचीं साधनें मानतां आणि तीं नाहींशीं झालीं म्हणजे दुःख करीत बसतां ?

या सर्व साधनांपेक्षां ज्ञानप्राप्ती, बुद्धिमत्ता हे साधन अधिक महत्वाचें नाहीं का ? परंतु असें पहा कीं, बुद्धिमान माणूस तरी सुखी आहे ? त्यालाही आपलें कुठें तरी चुकत आहे अशी चुटपुट लागून राहिलेली असते. म्हणजे काय ? त्यालाहि खरें सुख प्राप्त झालेलें नसते.

## खरें सुख कशांत

मग खरें सुख आहे तरी कशांत ? आत्मप्रचीतींत आत्मानंदांत स्वतः मी तोच भगवंत आहे. त्याचेंच वास्तव्य माझ्या ठायीं आहे. मी त्याच्याहून मुळींच भिन्न नाहीं. तो आणि मी एकच आहे कविसम्राट रविंद्रनाथ टागोर यानीं आपल्या एका काव्यांत म्हटल्याप्रमाणें—'तुमी आर आमी एका'—'तत्वमसि' ही जाणीव होईल तोच या जगांत खरा सुखी.

आम्हांला अजून स्वतःचें मोलच समजलेलें नाहीं. आम्हीं स्वतःला सफशेल विसरून गेलेले आहोंत तुम्हीं कोण याची एकदां का तुम्हांला जाणीव झाली मग या संसारांतील सारे सुखोपभोग त्यापुढें फिके पडतील. 'ज्ञाते तत्त्वे कः संसारः तें तत्व एकदां का तुमच्या गळीं उतरलें मग या संसारांत एखाद्या वैराग्याप्रमाणें तुम्हीं वागूं लागाल. मग या संसारभोगांत तुम्हीं लिपंडलेले/चिकटलेले रहाणार नाहीं. संसार जरूर करावा; परंतु त्यांतच मग्न होऊन जाऊं नये. मग तुम्हांला दुःखभोग सतावूं शकणार नाहींत.

संसारांत दुःख आहे, तो दोषपूर्ण आहे असे कां वाटतें तुम्हांला ? कारण तुम्हीं दोषपूर्ण आहांत. तुमची दृष्टी दोषानें व्यापलेली आहे. तुम्हीं मोहपाशानें बरबटलेले आहांत.


**ती उज्वल भावना**

मी तो आत्माराम आहे ही भावना तुमच्या अंतःकरणांत जागी होऊं द्या. मग पहा तिचा प्रताप! तुमचें सारें जीवन उजाळलें जाईल. तें प्रफुल्ल व वैभवशाली बनेल याची खूणगांठ बाळगून ठेवा.

आत्माराम आणि मी भिन्न नाहीं, याची जाणीव झाल्यानंतर तुम्हीं क्षणिक सुखदुःखाच्या जाळ्यांत सांपडून दुःखी होणार नाहीं. कोणतेंही दुःख तुम्हांला सतावूं शकणार नाहीं.

मग चला आपण त्या आत्मारामाचे भक्त पुजारी होऊं या. सुखदुःखाच्या पलिकडे जाऊं या. कोणत्याही प्रकारच्या अहंकाराला बळी न पडतां पुढें पुढें पाऊल टाकीत जाऊं या.

जें जें म्हणून कर्तव्य असेल तें तें त्याच्यासाठीं पार पाडण्यासाठीं मनोभावे झटूं या आसक्ति नको लोभ नको. कांहीं नको. कर्तव्यपालन आणि तेंही भगवंतासाठीं ही भावना उराशीं बाळगूं या.




## ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

**२६३, मंगळदास मार्केटसमार, मुंबई नं. २. ट. नं. २२८४४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रीटेलर्स.**

# आसक्ति, श्रद्धा व सबुरी

लेखक —श्री. बा. भा. मगदूम

आसक्ति ही जीवमात्रांची व अखिल संसाराची प्रेरणा आहे. मानवी प्रयत्नांची जननी आहे. मानवाचीं बहुतेक कर्में आसक्तींतून निर्माण होतात. मानवी जीवनाला व विचारांना गति देण्याचें कार्य आसक्ति अहर्निश करीत असते, व गति मूलतः अनिर्बंध असल्यानें राग लोभादि अनुषंगिक विकार आसक्तितून उद्भवतात त्याला रोखण्यासाठीं संयमरूपी लगामाची पदोपदीं गरज भासते. स्वेच्छेनें व सतत वहाणाऱ्या या आसक्तिरूपी प्रवाहाला श्रद्धेचा बांध घालून कुशलतेनें त्याचें हितकारी उपयुक्ततेंत रूपांतर करणें इष्ट आहे. आसक्तिरुपी सरितेचे श्रद्धा व सबुरी हे दोन तीर आहेत. ज्याप्रमाणें स्त्रियांचे जीवन सासर व माहेर या दोन धाग्यानीं विणलें जातें; त्याप्रमाणें भक्तांचे जीवन श्रद्धा व सबुरीनें विणलें गेलें पाहिजे.

श्रद्धेनें जीवनाचा ताण योग्य प्रमाणांत ठेवतां येतो, व योग्य वळणही लावतां येते; पण सबुरी म्हणजे दिरंगाई नसून कालाधिष्ट विवेक आहे. या जगांत कर्माचे तात्काळ फल मिळत असलें तरी परिणामाची दखल घेण्यासाठीं कांहीं कालावधि लागतोच. त्यानंतरच त्या फलाची इष्टानिष्टता ठरत असते. यालाच "पिरियड ऑफ ग्रॅज्युएशन," असे तत्ववेत्ते म्हणतात. याचें नाव सबूरी. बाबांच बनता बनता, बनेगा ! हें वचनही सबुरीचाच उपदेश करते. 'Rome was not uilt bin a' day हें आंग्ल वचन यास पुष्टी देणारें आहे. ज्याप्रमाणें कर्ता करविता परमेश्वर आहे व त्याचे बरेवाईट फल देणाराही तोंच आहे. आपण केवळ निमित्तमात्र आहोंत. हे गीतातत्वही सबुरीचाच पुरस्कार करते.

'आसक्तींतून' अहंता निर्माण होते, व अहंकारानें जीवनास कीड लागते. चांगल्याचें वाईटांत रुपांतर होतें. हा सबुरीने = ( निश्चयानें ) टाळतां येतो. श्रद्धा ही संकल्पदाई असते, व सबुरी ही संकल्पाला यथार्थ करण्यास मदत करणारी असते. या शिवाय सबुरीनें ममत्वाची तृष्णाही रोखली जाते. ममत्व व अहंता हे आसक्तींतून उद्भवणारे दोन मोठे दोष आहेत. या दोषांचें खंडण व उपशम 'केवळ श्रद्धा व सबुरीनेंच होऊं शकतो. आजची चिंता व उद्यांची काळजी यावर श्रद्धा व सबुरीनें मात करतां येते. पुण्य प्राप्त करून आसक्तींतून निर्माण होणाऱ्या पापाचा परिहार करतां येतो.

'श्रद्धेनें परिस्थितीवर विजय मिळविता येतो तर सबुरीनें काळावर मात करता

येते. निश्चयाचें बळ । तुका म्हणे तेचि फळ !! हा अभंगही सबुरीचाच सल्ला देतो. संकल्पाचे सिद्धींत परिवर्तन होण्यासाठीं सबुरीची अत्यंत आवश्यकता आहे. ज्याप्रमाणें बी रूजल्यावर आपणास तत्काळ पिकाची अपेक्षा करतां येत नाहीं हा निसर्गनियम, सबुरीचाच उपदेश करतो. यालाच भौतिक शास्त्रें कालचक्राची गति, असे संबोधतात. तात्पर्य मानवी प्रयत्न व आकांक्षा याना श्रद्धा व सबुरीची, जोड मिळाल्याशिवाय सफलता मिळणें अशक्य आहे.

तसेंच माणसाच्याठाईं असणारा रानटीपणा, क्षुद्रता इ. आनुवंषिक दुर्गुणही 'श्रद्धा व सबुरीच्या, नैसर्गिक उपायानें नाहींसें करतां येतात. यामुळेंच यांत्रिकतेवर विसंबणारी व मानवी मनाला भुरळ पाडणाऱ्या पाश्चात्यांच्या संस्कृतीपेक्षां श्रद्धां व सबुरीवर अधिष्ठित असणारी भारतीय संस्कृती जगांत श्रेष्ठ मानली जाते. पंथ व संथारूपी जडवादांतून मुक्त होण्यासाठीं भौतिकतेची जाचक बंधनें दूर करून सूक्ष्मतेनें मानवी जीवनाचा विचार करावयास लावणारी व अंतीं योग्य मार्गदर्शन करणारासी ही श्री साईबाबांची शिकवण, विनाशाच्या व वंचनेच्या गर्तेत जाणाऱ्या विश्वाला निश्चितपणें वाचवूं शकेल, कारण ही शिकवण 'प्रायोगिक अवस्थेंतील नसून पूर्णा-वस्थेतील आहे.ही शिकवण आग्रहाची नसून निष्ठेची आहे. मानवी जीवनाच्या सखोल अनुभवांतून व द्रष्टेपणाच्या निष्कर्षांतून निर्माण झालेली ही शिकवण आहे. त्यांत केवळ आत्मस्तुती व परनिंदा नसून अवलोकन व चिंतन, या मूलगामी मूल्यांना आवाहन करणारी ही शिकवण आहे. निःस्वार्थपणें जलवर्षाव करणाऱ्या मेघासारखी ही आहे. भवयातनानीं तृषित झालेले मानवी जीव बाबांच्या या कृपाजलाचें प्राशन करून, आत्मतोष पावोत, व मानवी जीवन समाधानी, उन्नत व निरामय होवो, हीच श्रीसाईबाबांच्या चरणीं नम्र प्रार्थना !!

# स्वप्नांतील साईंना !

हुबेहुब तें स्वप्न आठवें भल्या पहाटेचें
साईंना मी आज पाहिले क्षण तें भाग्याचें

शुभ्रच कफनी रुमाल डोईं हातामधें सोटा
वामकरां ते भिक्षापात्र चाल शिर्डी वाटा

मंदमंद ती चाल असे ही पवित्र चरणाची
आणि झळकते छटा मुखावर स्तिमित हास्याची

निंबवृक्षाच्या तळीं जावुनी क्षणभर उभे राही
करांगुलीनें मला खुणवुनी बोलावून पाही

हाय ! हाय रे ! त्यांच क्षणाला झोंप गेली सरूनी
नमस्कार हा साईनाथा त्रिकाल तव चरणीं

—गोविंद केशव पेठकर

# बाबांचें अवतार-कार्य

## जगाच्या कल्याणा । संतांच्या विभूति

—लेखकः कै. हरी सिताराम दीक्षित

संतांची व श्री साई बाबांसारख्या अवतारी पुरुषांचीं चरित्रें परोपरीनें गावी, ऐकावीं, ऐकवावीं व वाचावीं. त्यांचें मनन पुण्यदायक असतें. त्यांची गोडी अवीट असते. श्री साईबाबांच्या पुण्यस्मरण विशेषांकांत त्यांच्या जीवन कार्याची त्रोटक माहिती, त्यांचे परमभक्त व ज्यांना त्यांचा सहवास लाभला होता असे कै. हरी सिताराम दीक्षित यांच्या श्रीसाई सच्चरितांतील लेखाच्या रूपानें करून देण्यांत येत आहे.

श्रीसाईनाथ महाराज सुमारें पन्नास वर्षांपूर्वी शिरडीस प्रथम आले. शिर्डी हा गांव अहमदनगर जिल्ह्यांत कोपरगांव तालुक्यांत आहे. महाराज मूळ कोठील रहाणारे व त्यांचीं मातापितरें कोण, याविषयीं खात्रीलायक माहिती मिळत नाहीं. एवढें मात्र खचित दिसतें की, महाराजांचा मोंगलाईशीं संबंध बराच असावा. महाराजांचे बोलण्यांत शेलू, जालना, माणवद, पाथरी, परभणी, नौरंगाबाद ( म्ह० औरंगाबाद, ) बीड, बेदर या मोंगलाईच्या गांवांचा वारंवार उल्लेख येत असे. एकदां एक पाथरीचा गृहस्थ महाराजांचे दर्शनास आला होता. त्याला महाराजांनीं पाथरीची हकीकत विचारून तेथील बहुतेक ठळक ठळक गृहस्थांची नांवें घेऊन त्यांचेविषयीं चौकशी केली. यावरून महाराजांना पाथरीची विशेष माहिती होती असें मानतां येईल; पण त्यांचा जन्म तेथलाच असावा असें खात्रीलायक म्हणतां येत नाहीं.

तसेंच महाराज मूळचे ब्राह्मण होते, कीं ते जन्मतःच मुसलमान होते हें निश्चयात्मक सांगता येत नाहीं. किंबहुना त्यांच्या कित्येक भक्तांच्या मानण्याप्रमाणें ते ‘ अयोनिज ’ होते कीं काय हेंहि सांगतां येत नाहीं. महाराजांना अयोनिज मानणें हें भक्तेतरांच्या दृष्टीला अशक्य वाटेल, पण तसें प्रस्तुत लेखकाला वाटत नाहीं. या लेखकाजवळ महाराजांनीं स्वतः एकदां असें उद्गार काढले होते कीं, ‘ आतां आपण जाऊं ते आठ वर्षांचे होऊन येऊं. ’ श्रीकृष्णमूर्ति देवकीमातेजवळ प्रकटली तेव्हां आठ वर्षांचीच होती असें पुराणांतरीं वर्णन आहे. ‘ आठा वर्षांची मूर्ति । असंभाव्य पडिली दीप्ति । तेजें दशदिशा उजळती । तेथें लपती शशिसूर्य ॥ ’ ( हरिविजय अ. ३, ओ. १२६ ). महाराजांचे पुष्कळ भक्त, त्यांना हे साधकाचे सिद्ध झालेले मानीत नसून प्रत्यक्ष अवतार मानतात, व महाराजांच्या लीला व त्यांची अद्भुत शक्ति पाहून त्यांना

श्रीकृष्णाचा अवतार मानणारे पुष्कळ आहेत. महाराज मात्र स्वतः आपल्याकडे तो अधिकार घेत नसत. ते बोलतांना आपल्याला परमेश्वराचा सेवक ' बंदा ' म्हणून घेत. आपल्या गुरुचा आशीर्वाद आपल्याला पूर्ण आहे व त्यांचेच कृपेनें भक्तांचीं संकटें दूर होऊन त्यांचें कल्याण होतें, असें ते म्हणत. भक्तांना आशीर्वाद देतांना प्रायः ' अल्ला भला करेगा ' हेच शब्द असत. स्वतःकडे कधींहि मोठेपणा घेत नसत. ते कधींहिं ' अनल हक्क ' म्हणजे ' मीच परमेश्वर ' असें म्हणत नसत. पण त्यांचा उच्चार वारंवार ' यादे हक्क ' म्हणजे ' मी परमेश्वराची याद म्हणजे स्मरण करतों ' हा असे.

## शिरडींत आगमन

महाराज शिर्डीस आले ते एका मुसलमान गृहस्थाकडील वरातीबरोबर आले. त्याचें नांव चांदभाई. तो धूपखेडें नांवाच्या गांवचा पाटील होता. एक दिवस त्याचा घोडा चुकला म्हणून त्याला शोधावयाला तो रानांत चालला होता. तों तेथें एका झाडांखालीं त्याला महाराज बसलेले दिसले. महाराजांना त्यानें पूर्वी कधीं पाहिलें नव्हतें. महाराजांनीं त्याला हांक मारली व चिलीम पिऊन जा असें म्हटलें. तो म्हणाला माझा घोडा चुकला आहे व मीं त्याच्या शोधासाठीं निघालों आहे. महाराज म्हणाले, ' त्यासाठीं लांब कशाला जावयाला पाहिजे ? तो पलीकडच्या कुंपणाच्या आड आहे. ' त्याबरोबर चांदभाई, महाराजांनीं सांगितलेल्या कुंपणाकडे गेला. तों तेथें घोडा खरोखरच चरत होता. चांदभाईनें घोडा घेतला व तो महाराजांकडे आला. महाराजांनीं त्याला चिलीम पाजल्यावर तो महाराजांना आपल्या घरीं येण्याबद्दल आग्रह करूं लागला. महाराज म्हणाले, ' मी उद्यां येईन. ' त्याचप्रमाणें महाराज दुसरे दिवशीं त्याचे घरीं गेले. चांदभाईला चिलीम पाजली तेथें रानांत विस्तव नव्हता. महाराजांनीं आपल्या हातांत असलेला चिमटा जमिनीवर आपटून विस्तव उत्पन्न केला व आपलें काम करून घेतलें.

महाराज चांदभाईचे घरीं कांहीं दिवस राहिले. नंतर चांदभाईचे बायकोच्या भाच्याची सोयरीक शिर्डीच्या एका मुलीशीं झाली व त्या लग्नाचे वरातीबरोबर महाराज शिर्डीस आले. वरात गांवाबाहेर खंडोबाचे देवळाजवळ एका मळ्यांत उतरली होती. महाराज खंडोबाचे देवळांत गेले तों तेथें त्यांना म्हाळसापती या नांवाचे गृहस्थ भेटले. हे म्हाळसापती शिर्डीचे रहाणारे असून जातीनें दैवज्ञ होते. हे खंडोबाचे भक्त असून खंडेरायाची वारी त्यांच्याकडे कित्येक पिढ्यांपासून असे. महाराज खंडोबाचे देवळांत गेले तेव्हां कफनी, टोपी व अंगावर धोतर असा होता. त्यांना पाहिल्याबरोबर म्हाळसापतींनीं ' आवो सांईबाबा ' या शब्दांनीं त्यांचें स्वागत केलें, व तेंच नांव म्हणजे ' सांईबाबा ' महाराजांनीं अखेरपर्यंत धारण केलें. महाराजांची बहुतेक भक्तमंडळी त्यांना सांईबाबा किंवा बाबा असें म्हणत. महाराचांची एकदां एका कामांत

कमिशनवर साक्ष झाली, तेव्हां महाराजांना नांव विचारलें असतां 'मला साईबाबा म्हणतात' असें उत्तर दिलें. म्हाळसापती महाराजांना घेवून आले व तेथें त्यांनीं महाराजांची व आपले सोबती काशीराम शिंपी व आप्पा जागले यांची गांठ घालून दिली. हे तिघेहि गांवांत येणाऱ्या साधुसंतांची, गोसावी-बैराग्यांची, फकीर-फुकऱ्यांची आपल्या शक्तीप्रमाणें सेवा करीत, व त्यांचा परामर्ष घेत. शिर्डी गांव फार रहदारीचा असल्यामुळें येथें वारंवार अशी मंडळी येत व त्यांची थोडीबहुत संभावना, वर लिहिलेल्या तिघांकडून होत असे. हे तिघेहि ( काशीराम, आप्पा व म्हाळसापती ) महाराजांचे पूर्ण भक्त बनले. यांपैकीं काशीराम व आप्पा हे पुढें कांहीं वर्षांनीं वारले काशीरामांनीं आधीं देह ठेवला. व त्यानंतर कांहीं वर्षांनीं आप्पानीं देह ठेवला. पण दोघांनाहि मरणसमयीं एकादशी लाभली.

## महाराजांचें धोरण

हरिभक्तांचें मरण हरिदिनींच होणें योग्य व त्याप्रमाणेंच या दोघांचेंहि झालें. काशीरामांनीं महाराजांची सेवा अति उत्तम तऱ्हेनें म्हणजे खरोखरच तनमनधनानें केली. महाराजांची कफनी पूर्वी भगवी किंवा पांढरी असे. काशीरामानें हिरवी कफनी व हिरवी टोपी महाराजांना शिवून दिली; पण प्रायः महाराज पांढरीच कफनी घालीत व डोक्यास धोतर बांधीत. तसेंच महाराजांना चिलीम तंबाकू पुरवून त्यांच्या धुनीला सर्पणहि पुरवावयाचें व जरूर पडल्यास पैसेहि द्यावयाचें हें व्रत कांशीरामांनीं चालविलें. पुढें पुढें तर आपली पैशांची थैलीच महाराजांपुढें ठेवावयाची व महाराजांनीं इच्छेस येईल तितके पैसे घ्यावे अशी विनंती करावयाची. महाराज त्या वेळेस दक्षिणा घेत नसत, तरी पण काशीरामाकडून पैसा दोन पैसे घेत. महाराजांनीं आपल्याकडून दक्षिणा घ्यावी याबद्दल काशीरामाला इतकी आतुरता असे कीं, एकादे दिवशीं जर महाराजांनीं दक्षिणा घेतली नाहीं, तर अतिशय वाईट वाटून डोळ्यांतून अश्रूहि यावयाचे. अशा प्रकारें वाईट वाटणें सुद्धां परमार्थाला विघातक आहे. कारण त्यांत माझी देण्याची शक्ति आहे अशा तऱ्हेचा अभिमान शिरतो. अर्थात् भक्तांच्या परमार्थाला विघातक गोष्टी असतील त्या काढून टाकण्याचा देवाचा नित्यसंकल्प असतो. त्याप्रमाणें काशीरामासही झालें. कांहीं दिवसांनीं त्याची पैशांसंबंधानें ओढाताण होऊं लागली, आणि महाराजांनीं त्याच्याजवळ दक्षिणा मागण्याचा सपाटा चालविला. पैसे संपले असें त्याला मोठ्या कष्टानें म्हणावें लागलें. मग 'वाण्याजवळून मागून मला आणून दे' असें महाराजांनीं म्हटलें, त्याप्रमाणें कांहीं दिवस वाण्याकडून मागून आणण्याचा क्रम ठेवला पुढें वाणीहि पैसे देईनासा झाला. अर्थात् सगळी लीला काशीरामचा अभिमान दूर करण्यासाठींच होती. त्याची अशी खात्री झाली कीं, आपली देण्याची शक्ति नाहीं, हें त्याला पटल्याबरोबर त्याची सांपत्तिक स्थिती सुधारत चालली

आणि तो पूर्वीप्रमाणें सुखवस्तु झाला. महाराजांनीं आपल्याकडून दक्षिणा नित्य घ्यावी ही तळमळ पार नाहींशी झाली.

## काशीरामवर संकट

काशीराम कापड विकण्याचा धंदा करीत असे व निरनिराळ्या गांवीं बाजाराचे दिवशीं दुकान घाली. एकदां नाऊरच्या बाजाराहून परत येतांना कांहीं लुटारू भिल्लांशीं त्याची गांठ पडली. काशीराम घोड्यावर होता. तिकडे लुटारू प्रथम गेले नाहींत पण त्याच्या बरोबरच्या गाड्या रस्त्यानें चालल्या होत्या त्या त्यानी अडविल्या. नंतर काशीरामाकडे त्यांचें लक्ष गेल्याबरोबर ते तिकडे धांवून गेले. चोरांनीं काशीरामाला लुटण्याची तयारी केली व त्याप्रमाणें कांहीं सामान घेतलेंहि. त्याला काशीरामानें हरकत केली नाहीं. पुढें त्या चोरांनीं त्याचेजवळ एक लहानशी गांठोडी होती तिला हात घातला. चोरांना वाटलें त्यांतच कांहीं डबोलें आहे. खरोखरच त्यांत नुसती पिठीसाखर होती. काशीरामाला जानकीदासबाबा यां नांवाच्या सत्पुरुषानें मुंग्यांना साखर घालीत जावी असा उपदेश केल्यापासून काशीराम नेहमीं साखर जवळ बाळगीत असे; अर्थात् ती गठडी त्याला अत्यंत प्रिय होती, व काय वाटेल तें होवो पण ती गठडी जाऊं द्यावयाची नाहीं, असा त्यानें निश्चय केला. तितक्यांत त्यां चोरांपैकीं एकाची तरवार पडली होती तिकडे काशीरामचें लक्ष जाऊन त्यानें ती उचलली व त्या चोरांपैकीं दोघांना त्यानें ठार केलें. इतक्यांत तिसऱ्या चोरानें मागाहून येऊन कुऱ्हाडीचा घाव त्याचे डोक्यावर घातला. त्याबरोबर काशीराम बेशुद्ध होऊन प्रेतवत् पडला. राहिलेल्या चोरांना काशीरामाचा प्राणान्त झाला असें वाटून ते त्याला तेथेंच टाकून चालते झाले. पण वस्तुतः त्याचा प्राणान्त झाला नव्हता. पुढें कांहीं वेळानें तो शुद्धीवर आला व कांहीं दिवसांनीं बरा झाला. त्याचा महाराजांवर पूर्ण श्रद्धा असल्यामुळें त्यानें इस्पितळांत जाण्याचें नाकारलें व मला शिर्डीस घेऊन चला असा आग्रह धरला. त्याप्रमाणें त्याला तेथें आणलें आणि महाराजांच्या सांगण्यावरून तेथेंच माधवराव देशपांड्याकडून औषधोपचार करविला. अर्थात् महाराजांच्या कृपेनें काशीरामाची प्रकृती चांगली झाली.

## सरकारकडून बक्षीस


या शूर कृत्याबद्दल मुंबई सरकाराकडून काशीरामास एक तलवार बक्षीस मिळाली. काशीरामाची चोरांशीं झटापट चालली असतांना इकडे शिरडीस महाराजांनीं आकान्त करून सोडला. एकसारख्या शिव्या, बोंबा मारणें व इतर क्षोभाचे प्रकार चालले. जवळ असलेल्या मंडळींनीं ताबडतोब ओळखिलें कीं कोणत्या तरी प्रिय भक्तावर अति महत्संकट आलें आहे; व हा सगळा आकान्त त्या संकटांतून भक्ताला रक्षण करण्यासाठींच आहे आणि तसाच प्रकार झाला. चोर पुष्कळ असून हत्यारबंद

होते. त्यांचें तडाख्यांतून काशीरामानें जिवंत सुटणें कोणालाहि शक्य वाटलें नसतें; पण तारणाऱ्यापुढें मारणाऱ्याचे काय चालतें ? असो. काशीराम यानंतर कांहीं वर्षें वांचला व शके १८३० च्या चैत्र शुद्ध ११ ला वारला.

वर लिहिलेल्या तिघांपैकीं म्हाळसापती बरेच दिवस हयात होते, आणि ते भाद्रपद शके १८४४ त वारले. त्यांचा व महाराजांचा अति निकट संबंध होता. महाराजांचे बसणें मशिदींत असे व निजणें एक रात्र मशिदींत व एक रात्र चावडींत असे. महाराज मशिदींत निजत त्या रात्रीं म्हाळसापती उजाडेपर्यंत महाराजांजवळ बसून असत, व मधूनमधून दोघांच्या अति प्रेमाच्या गोष्टी चालत. म्हाळसापतींचें देहावसान होईपर्यंत त्यांचा एक दिवस आड मशिदींत रात्रभर बसण्याचा क्रम चालू असे. हे चांगले अधिकारी असून पूर्ण निरपेक्ष असत व यांचेपासून महाराजांचे


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डंबेल्स, लेझीम... यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स** ८५ बापू खोटे स्ट्रीट जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

भक्तांना बोध व आनंद नित्य मिळत असे; किंबहुना महाराजांच्या पश्चात् त्यांच्या भक्तांना हें एक विश्रांतिस्थानच होतें.

महाराज येथें आल्यापासून प्रायः येथील मशिदींत वास करूं लागले. ती मशीद त्या वेळेला अगदीं पडक्या स्थितींत असे. महाराज दिवसा इकडे तिकडे जात, पण रात्रीं मशिदींतच रहात. कोणीं जेवावयास नेलें तर जात; लोकांस औषध-पाणी सांगत व देत. त्यासाठीं कधींहि पैसा घेत नसत. इतकेंच नव्हे पण रोग्यांची शुश्रूषा योग्य होत नसली तर स्वतः आपण जाऊन करीत व अशा तऱ्हेनें महाराजांनीं ज्यांना औषधोपचार केला व ज्यांची शुश्रूषा केली अशी पुष्कळ मंडळी अजून येथें आहेत. पुढें औषधपाणी देण्याचें महाराजांनीं बंद केलें व नुसती उदी म्हणजे अंगारा देऊं लागले. पूर्वींहि अंगारा देत असत व त्यापासून लोकांना गुण येई.

आपण पूर्वीं लोकांना औषधपाणी करीत होतों, अशाविषयीं उल्लेख महाराजांनीं एकदां प्रस्तुत लेखकाजवळ केला होता. ते म्हणाले, "काका, ( प्रस्तुत लेखकाला ते काका म्हणून हांक मारीत. ) मी पूर्वीं लोकांना औषध देत असें. पुढें औषध देणें सोडलें आणि 'हरि हरि' करूं लागलों आणि हरि हरि करतां करतां हरि भेटला."

**'हा हिरा आहे'**

महाराज येथें प्रथम आले तेव्हां येथें एक देवीदास नांवाचे साधु असत व त्यांचे-कडे निरनिराळे वेळीं येत. तसेंच रामेश्वर, पंढरपूर व इतर दक्षिणेकडील क्षेत्रांना पाय-वाटेनें जाणाऱ्या यात्रेकरूंचा हा रस्ताच असल्यामुळें पुष्कळ सत्पुरुषांचे पाय येथें वेळो-वेळीं लागत. त्यापैकीं एक जानकीदास नांवाचे साधु येथें बरेंच दिवस होते. ते उत्तम अधिकारी होते असें सांगतात. त्यांची व महाराजांची फार बैठक असे. तसेंच सुप्र-सिद्ध गंगागीरबाबाहि येथें येत असत. महाराज येथें आल्यानंतर जेव्हां गंगागीर येथें प्रथम आले, तेव्हां महाराज दोन हातांत दोन मातीच्या घागरी विहिरींवरून भरून नेत होते. त्यांना पाहिल्याबरोबर गंगागीरबाबा जवळ असलेल्या गांवकरी मंडळींना म्हणाले, "ही मूर्ति येथें कधीं आली ? हें केवळ रत्न आहे. यांची योग्यता फारच मोठी आहे. गांवचें फार मोठें भाग्य कीं, हें रत्न तुम्हांला लाभलें.' नंतर गंगागीरबाबा महाराजांचें दर्शनास गेले व दोघांच्या मोठ्या प्रेमाच्या गोष्टी झाल्या. असेंच उद्गार महाराजांसंबंधानें अक्कलकोटच्या आनंदनाथमहाराजांनी काढले होते. हे आनंदनाथमहाराज अक्कल-कोटच्या सुप्रसिद्ध स्वामींचें शिष्य होते. ते येवल्याजवळ सावरगांव येथें एकदां गेले असतां शिर्डीचे माधवराव बळवंत देशपांडे, दगडू भाऊ गायके, नंदराम शिवराम मारवाडी व भागचंद मारवाडी त्यांचे दर्शनास गेले होते. दर्शन झाल्यावर ही मंडळी शिर्डीस यावयाला निघाली, तों आनंदनाथमहाराज एकाएकीं धांवत येऊन त्यांचे गाडींत बसले, व म्हणाले मी तुमच्याबरोबर येतों. नेवरगांवाच्या व येवल्याच्या मंडळींनीं या

महाराजांना अडविण्याचा प्रयत्न केला पण तो व्यर्थ गेला. आनंदनाथमहाराज तेथें आले तेव्हां त्यांनीं महाराजांसंबंधानें शब्द काढले ते असे, "हा हिरा आहे. याची खरी किंमत तुम्हांला नाहीं. हा जरी उकिरड्यावर असला तरी प्रत्यक्ष हिरा आहे. हें ध्यानांत ठेवा." या वेळीं महाराज प्रसिद्धीस आले नव्हते व गांवांतले लोक त्यांना एक साधारण किंबहुना वेडा फकीर मानीत.

महाराजांची स्थिती या वेळेला "फाटकें तुटकें नेसतो रे। मन मानेल तेथें बसतो रे। वेड्या वेड्यापरि दिसतो रे। परी ब्रह्मांड गिळुनी असतो रे॥" अशी होती. महाराज कधीं ओढ्यावर जाऊन बसत; कधीं गांवकुसाजवळ असलेल्या एका लिंबाखाली बसत, कधीं कोणाच्या मळ्यांत जाऊन बसत; अंगावरील कपडे फाटके असत, कधीं कधीं उग्ररूप धारण करीत. या व अशाच वर्तनामुळें जनसमाजाला ते वेडेच वाटत. पण लौकरच लोकांचा भ्रम दूर झाला व महाराजांची योग्यता शिर्डीच्या लोकांना कळून आली. तो प्रकार असा घडून आलाः—

## दिवे लावण्याची हौस

महाराजांना मशिदींत व देवळांतूनहि पुष्कळ दिवे लावण्याची हौस असे. अर्थात् 'हौस असे' हें व्यावहारिक दृष्टीचें बोलणें आहे. खरोखर पाहिलें तर त्यांचें करणें कोणतीच हौस पुरविण्याकरितां नसे. (कारण, त्यांना हौस अशी उरलीच नव्हती.) तर त्यांत कांहीं तरी अन्य हेतु म्हणजे लोकांचें हित करण्याचाच असावयाचा. असो. या दिव्यांसाठीं महाराज तेली व वाणी यांचें घरोघर जाऊन तेल मागून आणीत. कांहीं दिवस त्यांनीं महाराजांना तेल दिलें. अर्थात् ती व्यावहारिक माणसें किती दिवस तेल देणार! त्यांनीं एक दिवस महाराजांना तेल नाहीं म्हणून सांगितलें. त्यामुळें महाराजांच्या नित्यक्रमांत थोडाच फरक पडणार होता! महाराजांनीं पणत्यांमध्यें तेलाऐवजीं पाणी घातलें आणि नेहमीप्रमाणें काकडे घालून काडी ओढून ते पेटविले. महाराज ही तयारी करीत असतांना लोकांना त्यांच्या वेडेपणाविषयीं खात्री वाटूं लागली; पण जेव्हां काडी ओढून काकडयांस लावल्याबरोबर ते पेटले व रात्रभर जळत राहिले, तेव्हां अर्थातच लोक थक्क झाले. ते महाराजांना शरण गेले व महाराजांची अवहेलना केल्याबद्दल क्षमा मागूं लागले. कित्येकांनीं तर महाराजांना निरानिराळ्या तऱ्हेनें थोडें थोडें छळलें होतें, ते तर फारच घाबरले. पण महाराज पूर्ण दयाळू, अपकार करणाऱ्यांची सुद्धां उपेक्षा करावयाची नाहीं पण त्यांच्यावरहि उपकारच करावयाचा हें महाराजांचें ब्रीद! तेव्हां अर्थातच कोणालाहि भिण्याचें कारण नव्हतें. सर्व लोकांवर महाराजांचें प्रेम असून त्यांचें पुत्रवत् प्रतिपालन महाराज करीत. गांवावर कोणतेंहि संकट यावयाचें असलें कीं महाराजांनीं त्याची अगाऊ सूचना द्यावी. महाराजांचे सांगण्याप्रमाणें जे वागत ते निर्भय होत.

सगळ्या गांवची जरी महाराजांवर श्रद्धा बसली, तरी महाराजांशीं निकट संबंध

फारच थोड्या लोकांचा असे. महाराजांच्या प्रखर वृत्तीमुळें त्यांच्याशीं फाजील सलगी करण्याची कोणाची हिंमत होत नसे; आणि मशिदींत लोकांचे जाणें-येणें फार कमी असे. या वेळेला येथील देशपांडे घराण्यांपैकी माधवराव बळवंत यांचें जाणें-येणें विशेष होऊं लागलें. मशिदीच्या आवाराला लागूनच एक लहानसें घर होतें, तेथें एक त्या वेळीं मराठी शाळा असे. शाळेंत माधवराव हे मास्तर होते व त्यांनीं वेळोवेळी शाळेंतून मशिदींत जाण्याचा पाठ पाडला. तेथें गेले म्हणजे चिलीम भरून आपण ओढावयाची आणि महाराजांना ओढावयाला द्यावयाची. कोणत्या कारणानें कां होईना माधवरावांची महाराजांशीं सलगी होऊं लागली आणि माधवरावांचें मन महाराज आकर्षण करूं लागले. कांहीं वर्षांनीं माधवरावांनीं सर्व धंदे सोडून केवळ महाराजांची व त्यांचे दर्शनास येणाऱ्या मंडळीची सेवा हाच एक धंदा पत्करला. या सेवेबद्दल मोबदला म्हणून माधवरावांनीं कधींहि मागितला नाहीं. अजूनहि त्यांचा आणि महाराजांच्या भक्तांचा निकट संबंध आहे. आणि त्यांचा पुष्कळ मंडळींना आधार वाटतो; व कित्येक भक्त तर अधिक उणें कांहीं निघाल्यास माधवरावांचे सल्ल्याशिवाय पुढें पाऊल टाकीत नाहींत.

## कांहीं भक्तांचा परिचय

महाराज शिर्डीस सोडून बहुतकरून कोठें जात नसत. मात्र कधीं कधीं निमगांवास बाबासाहेब डेंगळे या नांवाचे महाराजांचे भक्त असत तिकडे जात. व कधीं राहत्यास चंद्रभानशेट मारवाडी यांचेकडे जात. चंद्रभानशेट वारल्यावर त्यांचे दुकानचा कारभार खुशालचंदशेट पहात असत. या खुशालचंदजींना महाराज वारंवार बोलवणें धाडीत व कोणी राहत्याचा माणूस आला कीं त्याला खुशालचंद भेटला का म्हणून विचारीत. असो.

बाबासाहेब डेंगळे यांचे बंधु नानासाहेब डेंगळे जाळी—निमगांव येथें राहत असत. त्यांना मुलगा नव्हता. प्रथम कुटुंबास मुलगा होईना म्हणून दुसरें केलें; तरीसुद्धां कांहीं उपयोग झाला नाहीं मग बाबासाहेबांनीं त्यांना महाराजांचे दर्शनास पाठविलें. महाराजांचे दर्शनास नानासाहेब डेंगळे आले तेव्हां महाराजांनीं मुलगा होईल असा आशीर्वाद दिला व योग्य वेळीं तो आशीर्वाद फलद्रूप होऊन त्यांना मुलगा झाला. अर्थातच त्यामुळें नाना साहेबांची श्रद्धा महाराजांवर बसली व ते महाजांकडे वारंवार येऊं लागले. त्यांचें सरकारी कामगारांशीं बरेंच दळणवळण असल्यामुळें त्यांनीं साहजिक महाराजांचे गुण कामगार मंडळीजवळ गाईले. आणि त्यामुळें लवकरच कलेक्टराचे चिटणीस रा. चिदंबर केशव ऊर्फ अण्णासाहेब गाडगीळ कांहीं मंडळींना घेऊन महाराजांचे दर्शनास आले आण्णासाहेब गाडगिळांची महाराजांवरील श्रद्धा उत्तरोत्तर वाढत जाऊन ते महाराजांचें पूर्ण भक्त बनले.

महाराज ज्या मशिदींत बसत व निजत, ती पूर्ण मोडकळीस आलेली असून खालीं धुरळा अतिशय, व वरूनहि माती पडावयाची अशी स्थिति असल्यामुळें नानासाहेब डेंगळ्यांनीं महाराजांना एक जाड फळी निजण्यासाठीं म्हणून आणून दिली. त्यांचा हेतु हा कीं महाराजांनीं नुसत्या जमीनीवर न निजतां ती फळी खाली टाकून तिच्यावर निजावें. महाराजांनीं त्या फळीचा उपयोग निजण्यासाठीं केला, पण प्रकार निराळा केला, ती फळी जमिनीवर न टाकतां ती मशिदीच्या आढ्याला जुन्या चिंध्या बांधून टांगली व तिच्यावर निजूं लागले, त्या चिंध्यांकडे पाहिले तर सुद्धां ओझें सहन करण्यासारख्या त्या नव्हत्या, पण महाराजांच्या प्रभावामुळें त्या फळीचेंच काय, पण महाराजांच्या शरीराचेंहि ओझें सहन करूं लागल्या. निजतांना चार बाजूला चार जळत्या पणत्या महाराज ठेवीत. त्या फळीवर महाराजांना पहाण्याचें ज्याला त्याला मोठें कौतुक वाटे व पुष्कळ मंडळी लांब उभे राहून तें कौतुक पहात; मात्र महाराजांना फळीवर चढतांना किंवा उतरतांना कोणी पाहिलें नाहीं. पुष्कळदां मंडळींनीं पाळती ठेविल्या पण महाराजांचें चढणें–उतरणें कोणालाहि दिसलें नाहीं. वरील कौतुक पाहाण्यासाठीं मंडळी फार जमूं लागली, तेव्हां ही उपाधी दुर होण्यासाठीं महाराजांनीं ती फळी एके दिवशीं तोडून टाकली.

नानासाहेब डेंगळे ज्या कारणासाठीं महाराजांचे दर्शनास प्रथम आले, त्याच कारणासाठीं कोपरगांवचे मुलकी सर्कल इन्स्पेक्टर गोपाळराव गुंड हेहि दर्शनास आले. यांना तीन कुटुंबें असून मुलगा नव्हता. यांनाहि महाराजांचे आशीर्वादानें मुलगा झाला. हेहि महाराजांचे पूर्ण भक्त बनले. त्यांच्या मनांत एकदां असें आलें कीं, मशीद मोडकळीस आली आहे, ती आपण फिरून बांधवावी; व त्यासाठीं त्यांनीं बरेचसे दगड गोळा केले. पण महाराजांनीं त्यांना मशीद बांधण्याची परवानगी दिली नाहीं. तें काम दुसऱ्या एका भक्ताकडून करवून घ्यावयाचें होतें. ती हकीगत पुढें दिली आहे. गोपाळरावांनीं जमविलेल्या दगडांचा विनियोग महाराजांच्याच आज्ञेनें तेथील शनीचें देऊळ बांधण्यांत व गांवांतील दुसऱ्या देवळांचा जीर्णोद्धार करण्यांत झाला. महाराजांचें सर्व देवळांकडे लक्ष असे. येथील मारुतीच्या देवळाचाहि महाराजांनींच जीर्णोद्धार करविला व तें देऊळ मोठेंहि करविलें. जसें गांवांतील देवळांकडे महाराजांचें लक्ष असे, तसेंच तेथील तुरबतींकडेसुद्धां महाराजांचें लक्ष असे. गांवकुसाजवळील निंबाच्या झाडाखालीं महाराज कधीं कधीं बसत म्हणून वर सांगितलें आहे. तेथेंच एक पीराची तुरबत आहे असें महाराजांनीं एकदां म्हटलें व तेथें खणून पाहिलें तों तेथें खरोखरच तुरबत निघाली. मग त्यादिवशीं मंडळींनीं महाराजांची वाजत गाजत मिरवणूक काढली. या तुरबतीबद्दलचा उल्लेख महाराजांनीं प्रस्तुत लेखकाजवळहि केला होता. महाराज म्हणाले, ही आपल्या वडिलांची जागा आहे. तेथें दर गुरुवारीं

व शुक्रवारीं ऊद जाळीत जावा म्हणजे त्यांत आपलेंच कल्याण आहे. एकदां गोपाळराव गुंडांच्या मनांत असें आलें कीं, येथें महाराजांप्रीत्यर्थ वार्षिक जत्रा ऊर्फ उरूस भरवावा. तो विचार त्यांनें गांवांतील तात्या पाटील, दादा कोते पाटील, माधवराव देशपांडे वगैरे मंडळींपुढें ठेवला व त्यांना तो रुचून त्यांनीं त्यासाठीं जमवाजमव करण्याचें मनावर घेतलें. पण तेथें तेव्हां असलेल्या कुळकर्ण्यांकडून आडकाठी झाली व तिचा परिणाम हा झाला कीं, कलेक्टरानें जत्रा भरवूं नये म्हणून हुकूम दिला. पण जत्रा भरविण्यासंबंधानें महाराजांचा आशीर्वाद पूर्ण होता. म्हणून वरील मंडळींनीं फिरून कलेक्टराकडे अर्ज करून पहिला हुकूम रद्द करवून जत्रा भरविण्याचा हुकूम आणला. ती जत्रा महाराजांच्या आज्ञेनें रामनवमीला भरवावयाचें ठरलें, व तेव्हांपासून ती सुरू झाली ती अजूनहि दर रामनवमीला भरत असते.

## सौ. बायजाबाईंची सेवा

या जत्रेची व्यवस्था पहिल्यापासून शिर्डी येथील तात्या गणपती पाटील कोते हे पाहात असतात. त्यांच्यावर महाराजांचें अत्यंत प्रेम असे. हे महाराजांना ‘मामा’ म्हणत. यांची आई सौ. बायजाबाई यांनीं महाराजांची फार सेवा केली. आणि ती अशा वेळेला कीं, जेव्हां गांवांतील बहुजनसमाज महाराजांना वेड्यांत काढी. महाराज पूर्वी दिवसांतून चारपांच वेळां गांवांत भिक्षेला जात. पण सौ. बायजाबाईंनी त्यांना कधींहि विन्मुख लाविलें नाहीं. अर्थात् या सेवेचे फळ बाईंना तर मिळालेंच, पण त्यांच्या सर्व कुटुंबाला व विशेषतः तात्यांना मिळालें. तात्यांना महाराज पैसे देत इतकेंच नव्हे, तर त्यांचे सर्व तऱ्हेनें लाड करीत. संध्याकाळीं रोज तात्या हे महाराजांकडे जात त्या वेळेचा मामा–भाच्यांचा प्रेमाचा सोहळा पाहण्यासारखा व प्रेमाचीं भाषणें ऐकण्यासारखीं असत. त्यांच मशिदींतील व चावडींतील सर्व व्यवस्था तात्यांकडेच असे. तात्यांनीं येऊन उठविल्याशिवाय महाराज उठत नसत; व तात्यानीं महाराजांना हातीं धरून नेऊन तेथें महाराजांसाठीं आसन घालावयाचें व त्यावर महाराजांनीं बसावयाचें असा क्रम असे. चिलीमहि तात्यांनींच भरून द्यावयाची.

रामनवमीच्या जत्रेच्या वेळीं म्हणजे खुद्द रामनवमीचेच दिवशीं दोन मोठ्या निशाणांची थाटाची मिरवणूक निघून मशिदींत जात असे; व तेथें ती दोन निशाणें दोन टोकांना बांधलीं जात. त्यांपैकीं एक निशाण रा. शंकरराव रघुनाथ देशपांडे उर्फ नानासाहेब निमोणकर यांजकडून येत असे, व दुसरें नगरचे दामूशेट कासार यांचेकडून येत असे. नानासाहेब निमोणकर हे निमोणचे देशपांडे होते. निमोण गांव संगमनेर तालुक्यांत आहे. नानासाहेब तालुक्यांत पुढारी गृहस्थांमध्यें मोडत असून सरकारांनीं त्यांना ऑनररी मजिस्ट्रेट नेमिलें होते; व तें काम त्यांनीं पुष्कळ वर्षें केलें. शेवटीं वृद्धापकाळ झाला म्हणून तें त्यांनीं सोडलें. त्यांचे चुलते येथें रहात असत व ते कधीं

कधीं येथें येत. येथें आले म्हणजे चुलत्यांचे सांगण्यावरून महाराजांचे दर्शनास जात. हळू हळू महाराजांवर त्यांची श्रद्धा वाढत चालली आणि शेवटलीं तीन वर्षे तर त्यांनीं महाराजांच्या अखंड सेवेंतच घातलीं. फक्त स्नानसंध्यादि नित्य कर्म उरकण्यापुरते घरीं जात. बाकी सारा वेळ महाराजांचे सेवेंत तत्पर असत. साठी उलटून गेली होती, तरी महाराजांचीं सेवा करितांना आळस किंवा विश्रांतीची इच्छाहि कधीं त्यांना शिवली नाहीं. महाराज त्यांना 'काका' म्हणून हांक मारीत. महाराजांच्या पश्चात् हे फार दिवस राहिले नाहींत. लौकरच त्यांना महाराजांनीं आपल्या पायापाशीं नेलें. महाराजांचें कृपेनें त्यांचा अंत उत्तम झाला. शेवटचे तीन दिवस त्यांना जिकडे तिकडे महाराज दिसत, व जो जवळ येई त्याला साईबाबा [ महाराजांना 'बाबा' म्हणत तें वर सांगितलेंच आहे ] म्हणत. स्वतःच्या कुटुंबालाहि "या साईबाबा" असें म्हणत. कुटुंबाला वाटलें त्यांना कांहीं भ्रम झाला असेल आणि म्हणून कुटुंबानें म्हटलें, "मी बाबा नव्हे, मी आपली पत्नी आहें." त्यावर ते म्हणाले, "तुझ्यांत कोण, बाबाच आहेत. तूं बाबाच आहेस." अशा तऱ्हेनें महाराजांचे अखंड स्मरणांत त्यांचा अंत झाला.

### दोन निशाणें

रामनवमीचे वेळीं दुसरें निशाण येतें तें दामोदर सावळाराम उर्फ दामूशेट कासाराचें हें वर सांगितलेंच आहे. यांना दोन कुटुंबें असून एकापासूनहि पुत्रसंतति नव्हती व त्यामुळें तें फार खंत करीत असत. त्यांना एकदां माधवराव देशपांड्यांचे सासरे रा. गोविंदराव सापकर यांनीं येथें येऊन महाराजांचा आशीर्वाद घ्यावा असें सुचविलें. त्याप्रमाणें ते आले. महाराजांनीं आशीर्वाद दिला व त्या आशीर्वादाप्रमाणें त्यांना मुलगा झाला. अर्थात् त्यांची निष्ठा महाराजांवर बसली; व तेव्हांपासून रामनवमीला निशाण आणावयाचें व त्या दिवशीं येथें फकीर जमले असतील त्या सगळ्यांना जेवूं घालावयाचें हा नेम त्यांनीं धरला; व तो त्यांचा नेम अजून चालू आहे.

रामनवमीची जत्रा सुरू होण्याचे कांहीं वर्षांपूर्वी महाराजांनीं एका निष्काम भक्ताला आपल्याकडे ओढून घेतलें होतें. तें भक्त म्हणजे रा. नारायण गोविंद ऊर्फ नानासाहेब चांदोरकर. हे कल्याणचे रहाणारे असून त्या वेळेला नगरच्या कलेक्टरचे चिटणीस होते. त्यांना एके दिवशीं येथील कुलकर्णी रा. केशव अनंत ऊर्फ आप्पा यांनीं सांगितलें कीं, आपल्याला महाराजांनीं बोलाविलें आहे. नानासाहेबांना हे आप्पांचें बोलणें प्रथम खरें वाटलें नाहीं. व त्यांनीं त्याला म्हटले : उगीच महाराजांचें नांव कशाला सांगतोस ? तुझें माझ्याशीं कांहीं काम असेल तसें स्पष्ट सांग. त्यावर आप्पानें खरोखर महाराजांनीं बोलाविले आहे असें निश्चयानें सांगितल्यावरून नानासाहेब महाराजांचे दर्शनास आले व लौकरच त्यांची श्रद्धा महाराजांवर बसली. मग ते तेथें येऊन

महाराजांच्या बोधामृताचा लाभ घेऊं लागले. महाराजांच्या व त्यांच्या तासच्या तास बैठकी होत. " तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । उपदेक्ष्यंति तेऽज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः ॥ " या श्रीभगवदुक्तीप्रमाणें नानासाहेबांचे प्रणिपात, परिप्रश्न व सेवा असत आणि महाराज त्यांना उपदेश करीत. एकदां तर याच श्लोकाचें विवेचन महाराज सुमारें एक तास करीत होते. त्या विवेचनावरून नानासाहेबांची खात्री झाली कीं, महाराजांना संस्कृत उत्तम येत असलें पाहिजे. नानासाहेबांनीं महाराजांची सेवा अति उत्तम केली. त्यांत विषेशतः दोन गोष्टींमुळें तर ते महाराजांच्या भक्तांना चिरस्मरणीय राहातील. एक तर महाराजांची जुनी मशीद होती ती त्यांनीं मोडून फिरून बांधली व मोठी केली. नानासाहेबांना हें काम स्वतः करून घेण्याला सवड नव्हती, म्हणून त्यांचे विनंतीवरून नानासाहेब निमोणकरांनीं येथें राहून स्वतः देखरेख करण्याचें पत्करलें व तें काम त्यांनीं उत्तम तऱ्हेनें पार पाडलें. मशीद बांधण्याला महाराजांची परवानगी म्हाळसापतींचेंद्वारें मागितली व ती महाराजांनीं दिली. तरी पण काम चालू असतांना महाराजांनीं वेळोवेळीं काम पाडून टाकावें आणि मोठेमोठे जड दगड व प्रयाली आपल्या हातांनीं दूर भिरकावून द्याव्यात. मग तें काम पुन्हां करण्यांत यावें. हें महाराजांचें कृत्य इतरांना चमत्कारीक वाटेल, पण त्यांतील खरें इंगित ज्यांना ठाऊक आहे, त्यांना महाराजांच्या कृतीचें नवल वाटणार नाहीं. शेवटीं एकदाचें मशिदीचें काम पुरें झालें; व त्या दिवशीं महाराज निमगांवास गेले असतां त्यांना तेथून वाजत गाजत आणून नव्या मशिदींत बसविलें. या मशिदीचें काम करण्यांत येथील सुतार कोंडाजी गबाजी व तुकाराम हे तिघे बंधु फारच उपयोगी पडले. महाराजांचे देहावसानापर्यंत मशीद झाडणें, महाराजांची मांडी घासणें, महाराजांचे तोंड धुवावयाचें पाणी तापविणें व तें पाणी सारणें हीं सर्व कामें तुकारामच करीत असे. महाराज सहसा दुसऱ्या कोणाला हें काम करूं देत नसत. अजूनहि रामनवमीच्या निशाणाची मिरवणूक या सुताराचे घरीं तयार होऊन तेथूनच निघते.

## नानासाहेबांची कामगिरी

नानासाहेबांची दुसरी कामगिरी म्हणजे महाराजांचे कीर्तीचा प्रसार करून लोकांना महाराजांच्या आशीर्वादाचा लाभ करून देणें हा होय. हे पूर्वी मामलेदार व नंतर डेप्युटी कलेक्टर असल्यामुळें यांना पुष्कळ फिरावें लागे. व त्या फिरण्यामध्यें ते जेथें जेथें जात, तेथें तेथें महाराजांचे गुण वर्णन करीत, व महाराजांच्या दर्शनांविषयीं लालसा उत्पन्न करीत. प्रस्तुत लेखकाला महाराजांच्या दर्शनाचा लाभ घडायला कारण नानासाहेबच होत. मुंबई ठाणें जिल्ह्यातील हजारों लोक महाराजांचें दर्शन घेऊन आनंद व लाभ पावले, याला कारणहि नानासाहेबच. मुंबईच्या मंडळींचें मन ओढण्याला नानासाहेबांशिवाय आणखी दोन व्यक्ति विशेष कारणीभुत झाल्या.

त्यांपैकीं एक रा. गणेश दत्तात्रेय सहस्रबुद्धे ऊर्फ दासगणू हे होत. हे पूर्वी पोलीस खात्यांत असत. त्यांना तमाशाचा फार नाद असे. नानासाहेबांच्यामुळें हे महाराजांचे दर्शनास आले, व हळूहळू त्यांच्या मनावर महाराजांनीं इतका परिणाम केला कीं, त्यांनीं नोकरी सोडून संतचरित्रांचा कीर्तनरूपानें व ग्रंथरूपानें लोकांत प्रसार करण्याचा उपक्रम सुरू केला. यांनीं अर्वाचीन भक्तलीलामृत, संतकथामृत, भक्तिसारामृत हे संतचरित्रात्मक ग्रंथ लिहिले असून त्याशिवाय ईशावास्योपनिषद् आणि श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा अमृतानुभव या दोन ग्रंथावर मराठींत सरस आणि सुबोध टीका केल्या आहेत. याशिवाय यांचे आणखीहि ग्रंथ आहेत. नानासाहेब चांदोरकरांनीं यांना मुंबईस नेऊन यांच्या भक्तिरसपरिप्लुत कीर्तनांना व तद्द्वारां महाराजांचे गुणश्रवणाचा लाभ मुंबईकरांस करून दिला. यांच्या कीर्तनामुळें मुंबईची व मुंबईच्या आसपासची पुष्कळ मंडळी महाराजांचे दर्शन घेण्यास आतुर झाली व दर्शनास गेली. वर उल्लेख केलेली दुसरी व्यक्ति म्हणजे प्रस्तुत लेखक. यांचेहि या सुमारास महाराजांच्या चरणांजवळ पुष्कळ राहणें होऊं लागल्यामुळें मुंबईच्या सार्वजनिक चळवळींतून त्यांचे अंग साहजिक निघालें व तो बावा ( म्हणजे बैरागी, सन्यासी वगैरे ) झाल्याचें पार्शी व इतर पत्रांतून आल्यामुळें, ज्यांच्यामुळें हें स्थित्यंतर झालें. त्यांचें दर्शन घेण्यासाठीं कांहीं मंडळी आली. एकंदरीत १९१० पासून महाराजांच्या दर्शनास येणाऱ्यांची संख्या बरीच वाढत गेली.

नानासाहेब चांदोरकर येथें आले त्या वेळीं येथें दर्शनास येणाऱ्या मंडळींना राहण्यासाठीं एकहि वाडा नव्हता. पण ही उणीव महाराजांनीं लौकरच भरून काढली. ह्या जिल्ह्यात रावबहादुर हरी विनायक साठे डेप्युटी कलेक्टर होते. त्यांचें प्रथम कुटुंब निवर्तल्याला पुष्कळ दिवस झाले होते. पण फिरून लग्न करण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्यांना पुत्रसंतति नसल्यामुळें त्यांच्या मित्रांचा त्यांनीं फिरून लग्न करावें असा आग्रह चालला होता. शेवटीं महाराजांचे दर्शनास जाऊन महाराज आज्ञा करतील तसें करावयाचें असें ठरलें. त्याप्रमाणें ते दर्शनास आले. महाराजांनीं लग्न करण्याची आज्ञा दिली व मुलगा होईल असा आशीर्वाद दिला. रावबहादुरांनीं मुलगी पसंत करून महाराजांना दाखवावी असें तिचे वडील रा. गणेश दामोदर केळेकर यांना कळविलें त्याप्रमाणें ते मुलीला तेथें घेऊन आल्यावेळीं महारजांनीं तिच्या ओटींत एक खर्बुज टाकलें व मुलीला कुंकूं लावलें. पुढें योग्य वेळीं लग्न लावलें आणि त्यानंतर लौकरच महाराजांचे सुचविण्यावरून त्यांनीं वर लिहिलेलें लिंबाचे झाड व त्यांस भोंवतालची जागा विकत घेऊन तेथें एक वाडा बांधला, त्यामुळें दर्शनास येणाऱ्या मंडळींची उतरण्याची सोय झाली. पुढें तीन वर्षांनीं महाराजांनीं प्रस्तुत लेखकाकडून एक वाडा बांधून घेतला, व त्यानंतर नागपूरचे श्रीमंत गोपाळराव ऊर्फ

बापूसाहेब बुटी यांजकडून एक वाडा बांधून घेतला. हा वाडा फार मोठा व सर्वस्वी दगडाचा असून मजबूत आहे व याला खर्चहि बराच लागला. शिर्डीच्या खासपास किंबहुना सबंध तालुक्यांत अशी इमारत असेल असें वाटत नाहीं. याच वाड्यांत महाराजांची समाधी आहे.

## शिरडीचें वाढतें वैभव

लौकरच शिर्डीला संस्थानचें रूप येऊं लागलें. महाराजांची आरती होऊं लागली आणि आरतीचे वेळेस चवऱ्या, छत्रचामरें महाराजांवर ढळूं लागलीं. चावडींत महाराज जातांना वाजतगाजत घोडा, पालखी, चोपदार, भजनकरी मंडळी, टके—पताका या इतमानिशीं जाऊं लागले. चावडी, आरसे, हंड्या, झुंबरें, तसबिरी यांनीं सुशोभित झाली. मशिदीला व चावडीला फरशी झाली; वगैरे वगैरे. या सर्व शोभेचें श्रेय बहुतांशीं कै. सुंदराबाई क्षीरसागर ऊर्फ राधाकृष्णाआई यांना आहे, या प्रेमळ भक्तीच्या आचार्य होत्या, असे म्हणण्याला यत्किंचितहि हरकत नाहीं. यांच्याजवळ धन तर नव्हतेंच, पण आपलें तन व मन सर्वस्वी महाराजांना अर्पण करून, महाराजांच्या निरनिराळ्या भक्तांकडून निरनिराळ्या जिनसा आणवून त्यांनीं शिर्डी संस्थान उत्तम थाटून दिलें. दुर्दैवानें त्यांचा अवतार लवकरच म्हणजे त्यांचे वयाचे ३५ वे वर्षी संपला! त्या येथें आठनऊ वर्षेंच होत्या. पण तेवढ्या मुदतींत त्यांनीं जें जें केलें तें दुसऱ्याला पंचवीस वर्षांत करतां आलें असतें कीं नाहीं, याची शंका वाटते. या बाईमुळेंच चावडींत रात्रीं महाराजांची शेजारती व पहाटेस कांकड आरती सुरू झाली. महाराज पहिल्यानें स्वतःची पूजासुद्धां करूं देत नसत. पहिली पूजा म्हाळसापतीकडून घेतली. नंतर कांहीं दिवसांनीं निंबगांवचे सीताराम डेंगळे पूजा करावयास आले असतां महाराज त्यांच्यावर संतापले, पण त्यांची शेवटास जाऊं दिली. नंतर कांहीं दिवसांनीं नानासाहेब चांदोरकरांचा थाकटा मुलगा महादेव उर्फ बापू याला समाधानानें पूजा करूं दिली, व त्यानंतर सगळ्यांनाच पूजा करण्याची मुभा मिळाली. पण त्या वेळेला महाराज आपली आरती करूं देत नसत. कांहीं दिवसांनीं प्रथम आरती करण्याचा मान रा. लक्ष्मण कृष्णाजी उर्फ तात्यासाहेब नूलकर यांना मिळाला. हे पंढरपूरचे मुन्सफ असून आजारी पडल्यामुळें रजा घेऊन येथें आले होते; पण मनांत हेतु हाच कीं, आतां नोकरी सोडून उरलेले अयुष्याचे दिवस महाराजांचे चरणांजवळ घालवावयाचे; व त्याप्रमाणें शेवटीं घडून आलें.

## राधाकृष्णा आईची सेवा


राधाकृष्णाआई स्वतः सर्व तऱ्हेची सेवा करीत. त्या रोज दोनदां महाराजांचे जाण्याचे रस्ते झाडून साफ करीत. अर्थात् तेथें असलेली सर्व घाण स्वतः काढीत. हा क्रम त्यांच्यापूर्वी बाळाजी पाटील नेवासकर यांनीं सुरू केला होता. हे पूर्ण विरक्त

भक्त सर्व संसार–पसारा सोडून येथें येऊन राहिले होते. त्यांना समजावून नेण्याकरितां पुष्कळ मंडळी आली पण हे गेले नाहींत. हे नेहमीं रस्ते झाडणें; मशीद सारवणें वगैरे करीत. महाराजांचें दुरूनच दर्शनच दर्शन घेत. जवळ जात नसत. पाणी प्यावयाचें तें महाराजांचें चरणतीर्थ किंवा स्नान होत असतांना महाराजांच्या अंगावरून पडलेलें पाणी किंवा महाराजांचें उष्टें पाणी हेंच प्यावयाचें. तसेंच शेताचें उत्पन्न आलें कीं, सर्व महाराजांजवळ आणून द्यावयाचें व त्यांतून महाराज देतील तेवढें घ्यावयाचें. अर्थात् महाराज बहुतेक सगळेंच परत देत. दोन वर्षें तेथें राहिल्यानंतर महाराजांनीं बाळाजी पाटलाला आपल्या घरीं जाण्याविषयीं आज्ञा केली व त्याप्रमाणें ते गेले. तरी पण वारंवार दर्शनाला येत आणि आपलें सगळें उत्पन्न महाराजांना अर्पण करीत. हे पुढें कांहीं वर्षांनीं वारले.

राधाकृष्णाआई स्वतः सर्व तऱ्हेची सेवा करीत इतकेंच नव्हे, तर त्या महाराजांचे बहुतेक भक्तमंडळीकडून महाराजांची सेवा करवून घेत. त्या निरनिराळीं कामें करीत; आणि त्यांत सगळ्यांना गोवीत; आणि सगळी मंडळी प्रेमानें व हौसेनें काम करीत. त्यांत सर्व दर्जाची मंडळी असे व स्त्रियाहि असत. माती–दगड वाहणें, रस्ते झाडणें, चिखल करणें व वाहणें, खड्डे खोदणें व भरणें, झाडें लावणें लाकडें फोडणें, हंड्या–झुंबरें पुसणें, मशीद धुणें व रंगवणें, कागदाची फुलें कातरणें, चवरी मोरचेल अबदागिरी निशाणें धरणें, निशाणें शिवणें वगैरे सर्व तऱ्हेची कामें मोठमोठी मंडळी व मोठ्या घराण्यांतल्या कुलस्त्रियासुद्धां करीत, आणि आपल्याला सेवा करण्याला संधी मिळाली म्हणून आनंद मानीत.

महाराजांचा नित्यक्रम फार नियमानें पाळला जात असे. ते पहांटेस उठून धुनीपाशीं बसत; नंतर कांहीं वेळानें शौचविधि उरकून आपल्या हातानें फेडून टाकीत. नंतर कांहीं वेळ स्वस्थ बसत. तेवढ्या अवकाशांत भागोजी शिंदे या नांवाच्या गृहस्थानें येऊन महाराजांच्या उजव्या हाताला पट्टे असत ते सोडावयाचे; हात चोळावयाचे व सर्व अंग दाबावयाचें. नंतर, चिलीम भरून आपण पेटवून महाराजांना ओढावयाला द्यावयाची व महाराजांनीं ओढून पुन्हां भागोजीस ओढावयाला द्यावयाची. असें पांचसहा वेळां झाल्यावर भागोजीनें जावयाचें. या भागोजीला महाव्याधीनें पछाडीलें होतें, तरी महाराजांनीं कधींहि त्याचा कंटाळा केला नाहीं; किंवा त्याच्या संबंधाचा आपला नित्यक्रम यत्किंचितहि बदलला नाहीं. भागोजी गेल्यानंतर कांहीं वेळ महाराज बसत असत व त्या वेळेला कांहीं नियमित भक्तमंडळी येऊन सेवा करीत व नंतर महाराज तोंड धुण्यास उठत. महाराजांचें तोंड धुणें पाहण्यासारखें असे. हातावर, पायावर, तोंडावर, कानावर पाणी यथेच्छ घ्यावयाचें व हें सर्व भाग चांगले स्वच्छ करावयाचे पण तें अत्यंत नाजुकपणानें करावयाचें.

श्रीएकनाथमहाराजांनीं वर्णन केल्याप्रमाणें "रोम रगडतील संपूर्ण । यालागीं न करी अंगमर्दन । एवं स्वदेहाचें देहपण । भूतहिंसेभेणें अहत्वा नाणी।" ( ए. भा., अ. ३, ओंवी ४५८ ). असाच प्रकार स्नानाचे वेळेसहि असे. तोंड झाल्यावर गांवांत भिक्षेला जात. भिक्षेसाठीं नेमक्या पांच ठिकाणीं जाऊन एके ठिकाणीं उभे राहत. भाकरी व कोरड्यास काय येईल तें घ्यावयाचें, व मग मशिदींत आल्यावर थोडेंसें खावयाचें. खाणें झाल्यावर कांहीं वेळ बैठक व्हावयाची. त्यावेळीं बरीच भक्तमंडळी जमत असे, व महाराज गोष्टीरूपानें बोध करीत. कधीं कधीं याच बैठकीचे वेळी केळीं, पेरू, आंबे विकत घेऊन मंडळींना महाराज वांटीत व आपल्या हातानें खाऊंहि घालीत. आपल्या हातानें खाऊं घालीत म्हणजे केळीं आपल्या हातानें सोलून देत, पेरूचे आपल्या हातानें तुकडे करून देत व आंबे स्वतः चोळून देत. या बैठकीनंतर महाराज लेंडीवर जात; व तेथें साधारण एक तास राहात. लेंडीवरून परत आल्यावर तिसऱ्या प्रहरचे दोन वाजेपर्यंत मशिदींत असत. तितक्या वेळांत मंडळीकडून महाराजांची पूजाअर्चा, आरती वगैरें होत असे. नंतर महाराजांचें जेवण झाल्यावर महाराज पुन्हां लेंडीवर जात; तेथून सुमारें पाऊण तासानें परत येत व मग संध्याकाळपर्यंत पुन्हां मशिदींत बसत. संध्याकाळीं थोडे बाहेर पडत व लगेच पुन्हां मशिदींत येऊन बसत. सर्वसाधारण बैठकी दिवसांतून तीन होत. एक सकाळीं न्याहारीनंतर; दुसरी लेंडीवरून परत आल्यावर; व तिसरी तिसरे प्रहरीं पांच वाजावयाच्या सुमारास. तिन्ही बैठकींचे वेळीं गोष्टीरूपानें महाराज बोध करीत. महाराजांचे बोलण्यांत तेथें त्या वेळीं असलेल्या निरनिराळ्या मंडळीच्या मनांत घोळत असलेल्या निरनिराळ्या बाबतींसंबंधानें खुलासे होऊन जात. महाराज गहन वेदान्तविषयाचें प्रकट रीतीनें विवरण करीत नसत किंवा उपनिषदावर प्रवचन देत नसत. त्यांचा उपदेश मुख्यतः नैतिक असे. शिष्याची भूमिका शुद्ध करून मग त्यांत ज्ञानाचें बीज पेरावयाचें ही सद्‌गुरूची शास्त्रोक्त वहिवाट आहे; तसेंच महाराजहि करीत; म्हणून त्यांचा उपदेश सर्वसाधारण नीतितत्वाचाच असे. पण या उघड शाब्दिक बोधापेक्षां असंख्य पटीनें मौल्यवान असा अनुभवरूपानें बोध महाराजांपासून मिळत असे व त्यामुळेंच महाराजांकडे श्रद्धेनें येणाऱ्या भक्तांचें अति उच्च प्रतीचें हित होत असे.



# याद

सुखदुःखाने भरला आहे ।
विश्वाचा संसार ।
साई, तू भक्तांचा आधार ॥ धृ ॥
कृपावंत तू जगदाधारा
सृष्टीपालका दयासागरा ।
वसते तव मनिं प्रेम अपार ॥ १ ॥
याद असावी तुझी निरंतर ।
तुझ्या स्मृतीनें भरलें अंतर ।
पसरला सभोवती अंधार ॥ २ ॥
असह्य होतां ताप भवाचा ।
व्याकुळतो हा प्राण धरेचा ।
वर्षवी मेघांची जलधार ॥ ३ ॥

# —:तुझ्यासाठीं:—

आतां फुलावें चांदणे ।
साई, तुझ्याच कारणें ॥ १ ॥
तुझ्यासाठींच घडावे ।
माझे जगणे, मरणें ॥ २ ॥
शब्दसौंदर्याचे रूप ।
अर्थ ज्ञानाचे हे लेणे ॥ ३ ॥
व्हावे तुझ्यापदीं लीन ।
एवढेच रे मागणे ॥ ४ ॥
जडो तुझ्याठाईं मन ।
माझे भरले चिंतेने ॥ ५ ॥
सुख, दुःख सारें आता ।
तुझ्यासाठींच भोगणे ॥ ६ ॥

कविः—बा. भा. मखदूम

# सेवाव्रताची महती

पृथ्वीवरील एकाद्या देशाची किंवा देशांतील एकाद्या शहराची आपण वरवर जरी पहाणी केली—सूक्ष्म निरीक्षण करण्याचें कारण नाहीं—तरी आपल्या एक गोष्ट सहज नजरेस येते ती ही कीं, देशाच्या किंवा शहराच्या एकाद्या लहानशा भागांत संपत्ति, समृद्धि विलास व चैन ह्यांचा अतिरेक झालेला असला तरी दुसऱ्या फारच मोठ्या भागांत दारिद्य, दुर्भिक्ष्य, दैन्य, दुःख, हालअपेष्टा, पापाचरण व निराशा ह्यांचा प्रक्षुब्ध महासागर पसरलेला असतो. ह्या सागरांत गटंगळ्या खात असलेलीं हजारों, नव्हे लक्षावधि मनुष्यें संपन्न भागांतील मनुष्याकडे केविलवाण्या मुद्रेनें, मदतीच्या अपेक्षेनें पहात असतात, किंवा काकुळतीनें हांका मारीत असतात. अशा वेळीं हांकेची वाट न पहातां दीनांच्या सहाय्याला धांवून जाणें हें हरएक संपन्न, शिक्षित व संस्कृत मनुष्याचें कर्तव्य आहे. किंबहुना पैसा, शिक्षण व संस्कृति ज्या अनेक हेतूंनीं प्राप्त करून घ्यावयाचीं असतात, त्यापैकी परोपकार हा एक श्रेष्ठ हेतु असला पाहिजे. दीनांच्या मदतीला धांवून न जाणें म्हणजे कर्तव्यपराङ्मुख होऊन आपलें शिक्षण व संस्कृति व्यर्थ होत, असे जगाच्या नजरेस आणणें होय. कलोपासक जॉन रस्किन ह्यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, जीं मनुष्यें नेहमीं दयेचीं व प्रेमाची कार्यें करण्यांत रत नसतात तीं दुष्ट व क्रूर होत.

सेवा व शील ह्यांचें फार नजीकचें नातें आहे व त्याचप्रमाणें उच्च राहणी व परोपकारबुद्धि ह्यांचाहि अगदीं निकटचा संबंध आहे. परमेश्वरानें आम्हांला मनुष्यजन्म दिला आहे तो स्वप्नसृष्टींत राहून मनोराज्यें करण्यासाठीं किंवा प्रत्यक्ष चैनीनें आयुष्य घालविण्यासाठीं नाहीं तर आपण ह्या पृथ्वीवर आलों तेव्हां तिची जी स्थिति होती ती आमच्या येथील वास्तव्यानें व आम्हीं केलेल्या कार्यानें आमच्या येथून होणाऱ्या प्रयाणाच्या वेळीं अंशतः तरी सुधारलेली असली पाहिजे. ही सुधारणा न झाली तर आमचें जीवित व्यर्थ गेलें म्हणण्यास हरकत नाहीं.

सेवा व सेवेला वाहून घेणें ह्यांची वाढ परस्परावलंबी आहे. जों जों सेवा अधिक करावी तों तों तिची अधिकाधिक गोडी लागते, व सेवेला अधिकाधिक वाहून घ्यावें तों ती अधिक श्रेष्ठ दर्जाची होते. सेवाव्रत प्रत्यक्ष आचरणाऱ्यांना कल्पनेबाहेर फायदे होतात. आपल्या हातून काय होणार आहे अशी जी आपल्या ठिकाणीं भावना असते ती नष्ट होऊन आत्मविश्वासाची वाढ होते. दुसरा असा होतो कीं, सेवेचे वेगवेगळाले अनेक मार्ग स्पष्ट दिसूं लागतात. निराशावादित्व

नाहींसें होऊन सेवकाच्या ठिकाणीं आशेचा रवि उदय पावतो, सहानुभूतिची वाढ होते, प्रेमाची वाढ होऊन बंधुभाव वृद्धिंगत होतो. सेवकाला वर्णभेद, जातिभेद, उच्च–नीच भाव हे स्पर्श करीत नाहींत. त्यामुळें फादर डॅमियनसारखे उदारात्मे महारोग्यांच्या सेवेला तत्पर होतात. सेवाव्रतामुळें आनंदाचीहि वाढ होते. जॉर्ज हरबर्ट नांवाच्या एका सेवकानें म्हटलें आहे कीं, ह्या जगांत सर्व आनंद एकत्र गोळा केले तरी ते सेवेमुळें होणाऱ्या आनंदाच्या पासंगास पुरणार नाहींत. हा जॉर्ज हरबर्ट बोलका सेवक नव्हता. दुसऱ्यानें आपणांवर केलेल्या उपकारांची फेड करण्यांसाठीं ती करावयाची नसून ख्रिस्तानें व बुद्धानें सांगितल्या-प्रमाणें अपकार करणाऱ्याचीहि केली पाहिजे. ती कोणत्या बुद्धीनें करावी हें खालील गोष्टीवरू उत्तम प्रकारें दिसून येईल. एकदां एका विश्वविद्यालयाच्या आवारांतील एका इमारतीला आग लागली. ती दृष्टीस पडतांच पहारेकऱ्यानें आगीच्या सूचनेची घंटा वाजविली. त्याबरोबर एक वृद्ध, क्षयी अध्यापक बिछान्यातून उठून नळाच्या ठिकाणीं गेले व त्याला पाण्याचा होज लावून त्यांनीं आगीवर पाण्याचा मारा करण्यास सुरवात केली. थोडक्याच वेळांत इतर अध्यापक मुख्यासह तेथें आले व पहातात तों, जॉन स्टर्लिंग ढोंपरभर पाण्यांत उभा आहे व पाणी मारण्याचें काम करतो आहे. त्यांना फार आश्चर्य वाटलें व मुख्य अध्यापक म्हणाले, "आपण येथें कसे?" स्टर्लिंगनें उत्तर केलें, 'कोणी तरी येथें असणें आवश्यक आहे!' ह्या उत्तरांत सर्व सेवेचें ब्रीद सांठविलेलें आहे. केवळ कर्तव्य म्हणून केलेली सेवा तीच खरी श्रेष्ठ सेवा होय. जेथें कोणी तरी असणें आवश्य आहे, अशीं स्थळें किती आहेत ह्याची आपण यादी केली तर ती फार मोठी होईल व सेवाक्षेत्राची अवाढव्यता आपल्याला पटेल. ह्यासाठीं सबंध जगाला


## लहान मुलांच्या आंकडीवर

जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबजार, मुंबई २.

गवसणी घालण्याची जरूरी नाहीं. आपल्या देशाचा, आपल्या शहराचा विचार केला तरी अशीं अनेक स्थळें आपल्याला दिसतील व त्यांतील एकादें आपल्यापैकीं प्रत्येकाला आपलें कार्यक्षेत्र करणें शक्य होईल. आपल्या देशाचें साक्षरतेचें प्रमाण शेंकडा दहा बारा पडेल. म्हणजे शेंकडा सुमारें नव्वद माणसें अज्ञानांधकारांत चांचपडत आहेत. धृतराष्ट्रानें भारतीय युद्धांत त्याचे पुत्र मरण पावल्यावर संजयाशीं झालेल्या संभाषणांत उद्‌गार काढले कीं, ह्याजगांत मनुष्यमात्राच्या हालअपेष्टांना अहंता व ममता ह्यापेक्षां दुसरें मोठें कारण नाहीं. अहंता व ममता बरीच दुःखें प्रसवतात. हें खरें; तरी पण अज्ञानानें निपजणाऱ्या दुःखांपुढें त्यांचा पाड नाहीं. ज्ञानाच्या अभावीं धरणीमातेपासून जास्तींत जास्त पीक कसें घ्यावें हें न कळल्यामुळें हजारों, लाखों लोक उपाशी मरत आहेत; त्यामुळेंच आरोग्ययुक्त रहाणी ठेवणें अशक्य होतें; अज्ञानामुळें आपण घातक चालीरीतीचे दास बनून आपलें नुकसान करून घेत आहों हें समजत नाहीं; त्यामुळें सत्य धर्मांचा उमज पडत नाहीं व त्यामुळें अतोनात नुकसान होतें.

देशांत दुर्भिक्ष्य इतकें पसरलें आहे कीं शेंकडा सत्तर माणसें नेहमीं अर्धपोटीं रहातात. ह्या दोन्ही ठिकाणीं कोणीतरी एका माणसानें असून चालावयाचें नाहीं, तर अनेक कामकऱ्यांची पलटण पाहिजे अहे. "लोभः पापस्य कारणं" हें जसें खरें त्याप्रमाणें 'बुभुक्षितः किं न करोति पापं' हेंहि खरें आहे. पोटभर खावयास न मिळाल्यामुळें एका इंग्रजानें म्हटल्याप्रमाणें अनेक माणसें घांसभर भातासाठीं आपल्या शरीराची विक्री करतात. चैन करतां यावी म्हणून कित्येक आपले आत्मे विकतात. कित्येक जीवन असह्य झाल्यामुळें नदीच्या पात्राची खोली पहातात व कित्येक कारागृहाचा मार्ग अनुसरतात. इंग्रज सरकारचें राज्य झाल्यापासून गेलीं दीडशें वर्षे येथें सुधारणेचा प्रसार होत होता. मोठमोठे कारखाने निघाले, गिरण्या निघाल्या व त्यामुळें खेडीं ओसाड पडून शहरांतील लोकवस्ती वाढली, ग्रामोद्योग बंद झाले, शहरांतील वस्ती वाढली. त्या वस्तीची सोय करण्यासाठीं खुराडेवजा चाळी बांधण्यांत आल्या. एकेका खोलींत आठ आठ दहा दहा माणसें राहूं लागलीं. कारखान्यांतील कोंदट हवा व चाळींतील दाट वस्ती ह्यांनीं कामकऱ्यांचें आरोग्य बिघडून मृत्युसंख्येची वाढ झाली, अनीतीला पूर आला. अशा प्रकारें बहुजनसमाजाचा शारीरिक व आत्मिक ऱ्हास झाला, पण इकडे लक्ष कोण पुरवितो? चाळवाले गरीबांच्या पैशांवर श्रीमंत होऊन चैन करीत आहेत. करूं देत बिचारे. पण दीनदुबळ्यांच्या नाशाला आळा कसा घालायचा? येथेंहि "कोणीतरी असावयास" नको काय? दारू न पिण्याबद्दल शुक्राचार्यांनीं अनुज्ञा केली पण आतां त्या व्यसनानें किती लाखों बळी घेण्याचें काम चालविलें आहे? सट्टे, शर्यती किती

कुटुंबांना धुळीस मिळवीत आहेत ! ह्या सर्व स्थळीं हजारो सेवकांची आवश्यकता आहे ! ही दुःस्थिति अशीच रहावयाची कीं हींत कांहीं सुधारणा होणें शक्य आहे ! वस्तुस्थिति निराशाजनक आहे खरी; तरी पण निराश होण्याचें कारण नाहीं. ह्या हालअपेष्टांचा जनक देव नाहीं. तर मनुष्यानेंच तीं आपल्या मूर्खपणानें, अज्ञानानें लोभानें निर्माण केलीं आहेत. आपण उत्पन्न केलेल्या दुःखाचें परिमार्जन करणें मनुष्याला शक्य आहे आणि त्यानें तें करण्यास तयार झालें पाहिजे. ही शोचनिय स्थिति नाहींशी करण्याचा पहिला उपाय म्हणजे संपन्न स्थितींतील माणसांनी आपलपोटेपणाला आळा घातला पाहिजे.

प्रत्येक देशांत व शहरांत कांहीं लोक विलास व चैन उपभोगित असतात. चैन करूं नये असें माझें म्हणणें नाहीं. पण सभोंवार माणसें अन्नान्न करीत असतां चैन करणें म्हणजे रोमला आग लागली असतां नीरोनें फिडल वाजवीत बसण्याइतकें अमानुष होय ! आपल्याला चैनीला लागणारी संपत्ति बाजूस ठेवली तरी चैनी माणसापाशीं दीनांना देण्यासाठीं पुष्कळ पैसा असतो. त्याचा त्यांनीं योग्य उपयोग केला पाहिजे. बहुजनसमाज अज्ञानांत लोळत आहे, हालअपेष्टा काढीत आहे, ह्याचा परिणाम श्रीमंतांनाहि भोगावा लागतो. महारवाडा गांवाबाहेर असतो तरी तेथें रोगराई उत्पन्न झाली म्हणजे तिचा प्रवेश स्पृश्यांच्याहि वस्तींत होतो, हें आपण विसरतां कामा नये. पोप महाराजांनीं थोडे दिवसांपूर्वीं आपल्या श्रीमंत अनुयायांना हीच विनंति केली आहे. मध्यम स्थितींतील माणसांनीहि आपल्या रहाणीचें निरीक्षण करावें. आपल्या खाण्यापिण्यांत, कपड्यालत्त्यांत, प्रवासांत, आवश्यक नसलेल्या वस्तू घेण्यांत आपण किती पैसा खर्चितो हे पाहिलें तर त्यांनाहि दिसून येईल कीं थोड्याशा काटकसरीनें प्रत्येकाला एखाद्या अनाथ अर्भकाचें पोट सहज भरतां येईल. गरिबांना पैसा देणे शक्य होणार नाहीं, कारण त्यांनाच कोणीं दिल्यास तो पाहिजे असतो. तरी पण त्यांना अन्य तऱ्हेनें सेवाव्रत आचरणें शक्य आहे. मनुष्यांना खाण्यापिण्याच्या वस्तूंची भूक असते तशी प्रेमाची, गोड शब्दांचीहि भूक असते.

रशियांत प्रचंड दुष्काळ पडला होता. तेव्हां एके दिवशीं टॉलस्टॉय फिरावयाला निघाला असतां, रस्त्याच्या नाक्यावर एका भिकाऱ्यानें त्याला साहेब, दीनावर दया करा, दोन दिवसांचा उपाशी मी आहे असें म्हटलें. टॉलस्टॉयनें आपलें खिसे चांपचून पाहिले, पण त्यांत त्या भिकाऱ्याला द्यावयाला एक दिडकीही नव्हती. तेव्हां त्यानें त्या दीनाचे दोन्ही हात आपल्या हातांत घेऊन त्याला म्हटले, " बंधू, मला फार वाईट वाटते कीं मनांत असूनहि तुला द्यावयाला मजपाशीं एक पैसाहि नाहीं, क्षमा कर. " भिकाऱ्यानें उत्तर केलें, " कांहीं हरकत नाहीं; साहेब तुम्हीं मला आपला बंधु म्हटलेंत हीच मला मोठी देणगी दिलीत ! "


अशा तऱ्हेनें गोड भाषणानें व शारीरिक सेवा करून दीन दुबळ्यांना सहाय्य करणें गरीबांना अशक्य नाहीं. पण सर्वांत मोठी सेवा आणखी एका मार्गानें करतां येईल. सायमन पीटरपाशीं एकानें भीक मागितली असता तो म्हणाला, मजपाशीं तुला देण्याला सोनेरुपें कांहीं नाहीं. पण मजजवळ जें कांहीं आहे तें तुला देतों. कोणी एकानें म्हटलें आहे कीं, सर्व सुधारणांचा आत्मा म्हणजे आत्म्याची सुधारणा होय.

आपण आपल्या आत्म्याची सुधारणा घडवून आणली आहे. आपण आपल्या आत्म्याची उन्नति करतों आहों अशी ग्वाही आपलें मन देतें काय ? देत असल्यास दुसऱ्यांच्याहि आत्म्यांची उन्नति करण्याचा प्रयत्न करणें आपलें आद्य कर्तव्य आहे. ही धर्मासंबंधानें वादविवाद घालीत बसण्याची वेळ नाहीं. प्रत्यक्ष आचरणानें, प्राप्त झालेल्या अनुभवाच्या जोरावर, आपल्या अभागी बांधवाच्या सेवेला कंबर बांधून तयार झालें पाहिजे.




दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतील

छबिलदास रोड, दादर (W. R.),

# 'आम्हांसी आपुलें नावडे संचित'

*****************************************

## आपल्यांत व साधुपुरुषांत अंतर

आम्हांसी आपुलें नावडे संचित ।
चरफडी चित्त कळवळ्यानें ॥ १ ॥
न कळतां जाला खोळंब मारगा ।
जगीं जालों जगा बहुरूपी ॥ २ ॥
कळों आलें बरें उघडलें डोळे ।
कर्णधार मिळे तरि बरें ॥ ३ ॥
तुका म्हणे व्हाल ऐकत करुणा ।
तरी नारायणा उडी घाला ॥ ४ ॥

तुकारामबावा म्हणतात कीं, आम्हांला आपलें संचित आवडत नाहींसें झालें आहे. बरें, संचित आवडत नसेल असें असलें, तरी पुढें काय ? संचित आवडत नाहीं एवढ्यानेंच भागत नाहीं. तर तुकारामबावा सांगतात कीं, आमचें चित्त चरफडतें; कशानें ? तर कळवळ्यानें. हें तुकोबांच्या अभंगांतील वाक्य आमच्या अनुभवाला कसें काय पटतें, याचा विचार प्रत्येकानें आपल्या ठिकाणीं करावा. अभंगाच्या शब्दामध्यें काठिण्य नाहीं आहे. अनुभवामध्यें प्रकार कसा आहे त्याची प्रतीति प्रत्येकानें पहावी. व्यवसायात्मिका बुद्धि नष्ट होऊन आम्हामध्यें असणारे बाजारांतलें काल्पनिक भेद सुटावे म्हणून आपण या स्थलीं बसलों आहों; तर आपलें संचित आपणास आवडत नाहींसें होऊन, दुःसह झालें आहे काय, आणि हवा बंद पडते, चैन पडेनासें होतें, त्याप्रमाणें जीवात्म्याची चडफड झाली आहे, असा कधीं तरी आपणांस दिवस आला काय, विचार केला पाहिजे.

वस्तुस्थिति पाहिली, तर आमच्यांतून कोणाला संचित कधीं नावडेंतच होत नाहीं ! चरफडणें दूरच. यासंबंधानें अर्जुनाने श्रीकृष्णाला मार्मिक प्रश्न केला आहे, तो हा कीं, जनावराला खाटकानें ओढून न्यावें त्याप्रमाणें मनुष्य परवशतेमध्यें कां पडतो ? याचें कारण इतकेंच कीं, साधारणतः मनुष्याला संचित नावडतें होत नाहीं. इतकेंच नाहीं, तर उलट त्याचें ओझें वाटत नाहीं. अशी स्थिति आहे तोंपर्यंत यथार्थता नाहीं. प्रत्येकानें हे अभिमानाचें गांठोडे बांधून ठेविलें आहे व त्याविषयीं त्याला घमेंड वाटत असते. चालीवरून, मुद्रेवरून, पेहरावावरून व बोलण्याच्या ऐटीवरून माणसामध्यें भेद असतो, तो भाग निराळा आहे. परंतु

कोणास आपलें ज्ञान कोणास आपलें बल, कोणास आपली शांति, कोणास आपलें औदार्य, कोणास स्वरूप, कोणास आपली कुटुंबवत्सलता वगैरे गुणांविषयीं अभिमान असून त्यांची लोकांत चहाच होत नाहीं असें वाटते; लोकांस आपल्या अंगचे गुण दिसतच नाहींत, अशीं अभिमानाची गांटोडीं व ओझीं प्रत्येकजण वहात आहे. मनाची अशी अवस्था असली, म्हणजे ओझें आपणांस दडपून टाकते. अशा रीतीनें आपण मनाच्या बेड्या धारण केलेल्या असून आपणाला मात्र तसें वाटत नाहीं, व आपले हातपाय खुले आहेत, अशीच धुंदी असते. या भारी बेड्या परचक्रानें अथवा परस्थ अंमलानें घातलेल्या नाहींत; तर आपल्या आपण ठोकलेल्या आहेत; ह्यामुळें आपणांस पाश नाहीं, आपण अगदीं निःशृंखळ आहों, असें भासत असतें. याच भासाला वेदांत्यांनी अविद्या, अथवा, माया म्हटलें आहे. स्थिति एक प्रकारची असतां विपरीत गोष्ट खरी वाटते, हीच माया. अनेक प्रासंगिक कारणांनी जी बुद्धि, जो तिखटपणा, जें बल, जी विद्या इत्यादि प्राप्त झालेल्या असतात त्यांचें जें ओझें मी बाळगितों, तें संचित. मी बादशहा, मी संस्थानिक, मी जहागिरदार, मी अमेरिकन, मी युरोपियन, मी धनाढ्य असा जो बोजा उत्पन्न होतो, तो आपण आपल्या कृतीनें मिळविलेला नसतो; तो वडिलवाडलांपासून प्रमाणतः आलेला असतो, व पिढीप्रमाणें हें ओझें वाढत जातें. यांतून एखादी गोष्ट स्वसंपादित असली, तरी तो केवळ आपल्याच कृतीचा परिणाम नसून त्याला अनुकूल अशा ज्या पुष्कळ गोष्टी झाल्या त्यावर अवलंबून आहे. हे सर्व प्रकार संचिताचे आहेत; परंतु अभि-

MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

माटुंगा क्लीनिंग वर्क्स

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ (मालक: एस. व्ही. प्रधान

मानानें आम्ही त्यांचें ओझें बाळगतों. आपल्या कृतीनें, अथवा क्रीयमाणानें त्यांची उपस्थिति केली असली तर त्याविषयीं अभिमान असो; परंतु तसें नसून जागृतींत तर काय, पण रात्रींही निजलों असतां, बोजा वाहत असतों; व त्यामुळें परस्परांविषयीं द्वेषबुद्धि मनांत वागते. खरोखर विचार केला असतां, हे संचित आवडूं नये, इतकेंच नव्हे, तर त्याच्यासंबंधानें अंगाची लाही व्हावी; परंतु उलट प्रकार असा होत असतो कीं, या संचिताला आपण कुरवाळतों आणि खाऊं घालतों. तुकोबांचें संचित त्यांस कां नावडतें व्हावें; त्याचा त्यांना त्रास कां वाटावा व तुम्हांआम्हांला कां वाटूं नये, याचा विचार प्रत्येकानें अवश्य करावा असें केल्यावर खूण पटेल, नाहीं; त्याला नाहीं; इतकेंच कीं, ज्याला पटेल तो भाग्यवान् समजावयाचा कितीही सुखाचीं साधनें असली, कितीही पुरुषार्थ असला, तरी या संचिताच्या योगानें काय स्थिति होते त्याचें 'माझ्या कनवाळू क्षमानिधि या पदांतील 'जाणुनि आधीं करितों अनुचित तें, काय असें मज होतें' व 'विचार करूनीही निश्चिय करितां स्थिर न होय' या दोन्ही कडव्यांच्या पूर्वार्धांत कवीने फार मार्मिक रीतीने वर्णन केले आहे. यांत सांगितल्याप्रमाणे निश्चय स्थिर कां होत नाहीं; नियम कां पाळला जात नाहीं, ऊर्ध्व दिशेस जाऊं लागलों असतां, आपण पाठीमागे कां हटतों? तर या संचिताचे ओझे असले म्हणजे ते आपणांस इतके जखडून टाकते कीं, आपली कर्तृत्वशक्ति अगदीं जाऊन स्वतंत्रता जणूं काय आपणांस नव्हतीच अशी परतंत्रता येते व संचिताचे दास होऊन आपल्या आपण परस्वाधीन होतों. ही परवशता परस्थ अमलाखालीं असण्यापेक्षांही दुःसह होय हे जाणून तुकारामासारख्यांनीं आपले संचित नाहींसे केले, तसे तुम्हांआम्हांला होत नाही हें साधुपुरुषांमध्ये व आपल्यामध्ये अंतर आहे. साधुसंतास देहधर्म आपल्याप्रमाणेच लागू असतात, व त्यापैकीं कोणी मेलेली माणसे सजीव करितात; कोणी मशिदी उठवितात; कोणी भिंती चालवितात, असे सांगतात. त्यांत विशेष मोठेपणा आहे असे नाहीं, त्यांचे विशेष लक्षण हेच कीं, जे आपणांमध्ये नानातऱ्हेचे संदेह व भ्रम, आणि मिथ्या सामर्थ्याच्या, ज्ञानाच्या, अधिकाराच्या व बलाच्या कल्पना व त्यापासून होणारी घमेंड इत्यादि असते ती सर्व नष्ट करितात, त्या अभिमानामध्यें वैय्यर्थ्य आहे, इतकेंच नव्हे तर दुष्टपणा आहे असें समजून त्यांचे वळ मोडण्याचा सतत प्रयत्न त्यांच्या हातून होत असतो. आपण उलटे त्यांस अधिक पोटाळितों; याचा आपणास अनुभव आहे, किंवा नाहीं. याची ज्याने त्याने प्रतीति घ्यावी.

तुकोबांनीं म्हटल्याप्रमाणे :—

न कळतां जाला खोलंबा मारगा । जगीं जालों जगा बहुरूपी ॥

आपल्या मार्गांत खोलंबा आहे किंवा नाहीं हे पाहूं गेल्यास आपण संचिताने परवश होतों; खऱ्या आत्मस्वरूपाच्या अंशाला उदयास येऊं देत नाहीं तो संचि-

अभिमानानें दडवून जाऊं देतों, व आपल्या सभोंवती या संचिताचें वारूळ वाढवून त्यांत आपण बसलेले असतों, असे दिसून येईल. तसेच जगामध्ये बहुरूप धारण करीत नाहीं असा कोट्यवधि मनुष्यांत एकही बहुधा सांपडणे मुष्कील. श्रीमंत नसतांना श्रीमंतीची बडेजाव, ज्ञान नसतां ज्ञानीपणाची घमेंड, अशुद्ध, पापी वर्तन असतां पवित्रतेचा अभिमान अशा रीतीनें बहुरूपीपणा एकदांच नव्हे, तर आपल्या सर्व चरित्रांत नेहमीं, दृष्टोत्पत्तीस येत असतो. तेणेंकरून स्वरुपसिद्धि व्हावयाला जो कार्यभाग पाहिजे तो एकीकडे राहून, नाटकांतील सोंगें घेऊन बतावणी करण्यास व जें खरोखर मिथ्या तें सत्य मानून घेण्यास आपण मात्र तत्पर असतों. भगवत्प्राप्तीला मुख्य खोळंबा अथवा प्रतिबंध काय तो या बहुरूपीपणाचाच असतो. म्हणून तुकारामबावांनीं म्हटलें आहे,

कळों आलें बरें उघडले डोळे । कर्णधार मिळे तरी बरे ।
तुका म्हणे व्हाल ऐकत करुणा । तरी नारायणा उडी घाला ॥ १ ॥

त्याप्रमाणें आपण लोकांस फसविण्यास प्रवृत्त असतों, इतकेंच नव्हे, तर आपण स्वतः आजवर भ्रमांत होतों असें वाटून, परमेश्वरा, उडी घाल ( जसे दोन स्नेही रानांतून जात असतां त्यांतून एक नदींत पोहावयास गेला. अथवा पाण्याने भरलेल्या खोल खड्ड्यांत पाय अवचित गेला आणि बुडूं लागला, म्हणजे तो दुसऱ्यास 'धांव उडी घाल' असें आक्रांताने म्हणतो त्याप्रमाणें ) असें आक्रोशानें कळवळ्यानें, अत्यंत निष्ठेनें आपण कधीं म्हटलें आहे काय ?

# —: माझा देव साईबाबा :—

माझा गुरु साईबाबा
माझा देव साईबाबा ॥ धृ ॥
तोच काशी आणि काबा
त्याचा जगावरी ताबा ॥ १ ॥
जमे भक्तांचा तो मेळा ।
साई भक्तिचा भुकेला ॥
नित्य दारी तुझ्या उभा
साई शिरडीची शोभा ॥ २ ॥
माझें तोषले रे मन
साई आनंदाचा घन ॥
त्याचे गाईन मी गान ।
त्याला वाहीन जीवन ॥ ३ ॥

—बा. भा. मगदूम

# भारतमातेसाठीं प्रार्थना

********** *******************

भारतीय स्त्रीवर्गापुढे किती उच्च आदर्श आहेत ! सीता, सावित्री, दमयंती यांच्या केवळ नामोच्चारानेंच कोणत्या पवित्र व उच्च भावना तुमच्या अंतःकरणांत उत्पन्न होतात बरें ! त्यांचे जीवन किती पवित्र व त्यागमय होतें ! त्याच आदर्शानुरुप आजच्या भारतीय भगिनींनीं वागायचे आहे.

श्री शंकर हें तुमचे महान् दैवत. त्याचा त्याग किती प्रखर स्वरूपाचा होता ! उमापतीचे जीवन सन्यस्तवृत्तीला शोभणारे होतें. तुमची संपदा, तुमचे जीवन हें सुखोपभोगांत लोळण्यासाठीं नाहीं. तुमचें जीवन हें केवळ तुमच्यासाठीं नाहीं; तें परोपकारासाठीं व परदुःखनिवारणेसाठीं आहे तुमचा जन्म मातेचें दुःख दूर करण्यासाठीं आहे. मातेला दुःखात ठेऊन तुम्ही सुख भोगणार आहांत का ?

ज्यांना तुम्ही पददलीत व खालच्या वर्गातील समजतां, जे अज्ञानांत घोरत आहेत, दारिद्र्यांत पोळत आहेत, दुःखानें व रोगानें गांजलेले आहेत, ज्यांना तुम्हीं महार, चांभार व म्हणून अस्पृश्य समजता ते सारे कोण आहेत ? तुमच्याच रक्तामासाचे, तुमचे बंधू आहेत ते !

तुमच्या अंगांत या घडीला शौर्याचा संचार होऊं दे आणि मी भारतीय आहे याचा तुम्हांला अभिमान वाटूं दे. मोठ्यानें टाहो फोडून साऱ्या जगाला सांग कीं मी भारतीय आहें. अज्ञानांत लोळणारा दारिद्र्यांत खितपत पडलेला भारतीय, तसेंच ब्राह्मण, शूद्र हे सारे सारे माझे बांधव आहेत. मी त्यांना अंतर देणार नाहीं. त्यांच्या उद्धारासाठीं माझ्या जिवाचें मी रान करीन.

प्रत्येक भारतीय मग तो कोणत्याही जातींत व स्थितींत जन्मलेला असो माझा सखा आहे. हा सारा समाज माझा आहे. ज्या मातींत मी जन्मलों, ज्या भूमातेनें मला अन्नपाणी देऊन पोसलें, त्या भारतमातेचा मी दासानुदास आहे. तिच्यासाठीं वाट्यास येईल तो त्याग करण्याची माझी तयारी आहे.

भारताचें वैभव तेंच माझें वैभव; भारताची अब्रू तीच माझी अब्रू. तिला कधींही कलंक लागतां कामा नये.

माझी भारतमाता जगांत डौलानें मिरविली पाहिजे. तिच्या कीर्तीचा सुगंध सर्वत्र दरवळत राहिला पाहिजे.

हे भगवंता माझ्या या मातेवर आघात झाला असतां तो प्रत्यक्ष माझ्यावरील

आघात आहे असें मला वाटूं दे. तिच्या रक्षणासाठीं हे भगवंता ! तूं मला सामर्थ्य दे. माझ्यांत जर कांहीं उणीव असली तर ती तूंच दूर कर व मला सर्व परीनीं सामर्थ्यसंपन्न बनव.

माझ्या भारतमातेसाठी मला सर्वस्व अर्पण करण्याची सद्बुद्धि दे. मला परम पुरुषार्थी बनव व अशा रीतीने माझ्या मातेचे ऋण फेडण्यासाठीं मला समर्थ कर.

—स्वामी विवेकानंद.

# साई या, हो या !

साई ! या, हो या ! आपुले दर्शन द्या, या ! सकलां दर्शन द्या, या —० ! !
तळमळतो आम्ही अपुल्याभेटी
अंतर्यामी आशा मोठी
साक्षी दर्शन द्या या ! सकलां दर्शन द्या, या —० ! !
भक्तांसाठीं चिंता मोठी
हे जगजेठी करता मोठी
वेळ न लावा या, या ! सकलां दर्शन द्या, या —० ! !
दिव्यरूपाहे दिगंबराहे
सच्चिदानंदा; आनंदाहे
नेई दुःखे विलया ! सकलां दर्शन द्या, या —० ! !
दृष्टि असुनी दृष्टि नाहीं
मंगलदृष्टि जंगल पाही
दिव्यदृष्टि ती द्या, या ! सकलां दर्शन द्या, या —० ! !
सुखासाठीं करितों तळमळ
कळकळ हळहळ, आत्मी जळजळ
मळमळ दूर करण्या या ! सकलां दर्शन द्या, या ०— ! !
पतीत पावन लक्ष्मीनाथा
दीनदयाळू दीनानाथा
"**नारायण**" विनवी या—! सकलां दर्शन द्या, या —० ! !

—नारायण तलाखार ( शुभांशु )

# उच्च ध्येय व त्याचें साधन

ह्या जगामध्यें आपण अशीं पुष्कळ मनुष्यें पहातों कीं ज्यांचा जन्म एकाच प्रकारच्या परिस्थितींत झालेला असतो. तीं ज्या कुटुंबांत जन्मलेलीं असतात त्यांचा सामाजिक व सांपत्तिक दर्जा एकाच प्रकारचा असतो. त्यांचीं संगोपनाचीं व शिक्षणाचीं साधनें सारखींच असतात. परंतु हीं मनुष्यें शिकून मोठीं झाल्यावर जेव्हां प्रत्यक्ष व्यवहारांत पडून संसार करूं लागतात, तेव्हां त्यांची स्थिति अगदीं पालटून जात. कांहीं जगिक दृष्टया उच्च स्थितीला पोहोंचतात, तर आध्यात्मिक दृष्टया अधोगतीला गेलेलीं असतात. कांहीं ह्याच्या उलट स्थितींत असतात. कित्येक उन्नतहि नाहीं व अवनतहि नाहीं अशा मध्यम स्थितींत असतात. परंतु ह्यांपैकीं कोणत्याहि दोन माणसांची स्थिति सारखी नसते. असें कां होतें ह्या प्रश्नाचें उत्तर जर आपण शोधूं लागलों तर वेगवेगळया विचारांचीं माणसें त्याचीं वेगवेगळीं उत्तरें देतील. कित्येक असें म्हणतील कीं परिस्थिति कशीहि असली तरी मनुष्य लहान किंवा मोठा होणें हें तिच्यावर अवलंबून नसून नशिबावर अवलंबून असतें. दैवाच्या पुढें कोणाचेंहि कांहीं चालत नाहीं. दुसरें कित्येक असें म्हणतील कीं आपल्याला परिस्थिति सारखी आहे असें जरी वाटलें तरी ती केव्हांहि तशी नसते. तिच्यांत जो थोडाबहुत फरक असतो तो इतका मोठा असतो कीं त्यामुळें मनुष्यांची स्थिति पूर्णपणें पालटून जाते. ह्या दोन्हीं उत्तरांत सत्याचा अंश कितीसा आहे ह्याचा विचार करतां विशेषसा नाहीं असेंच आपल्याला म्हणावें लागेल. नशीबावर हवाला ठेवून विचार करण्याचा हा काळ नव्हे. वरील प्रश्नाचें तिसरें व विशेष समाधानकारक असें उत्तर देतां येण्यासारखे आहे? तें हें कीं एकाच प्रकारच्या परिस्थितींतली माणसें भिन्न प्रकारच्या परिस्थितींत जाऊन पडतात, ह्याचें कारण तीं आपल्या पुढें जें ध्येय ठेवतात तें होय. श्रेष्ठ ध्येय ठेवून त्याप्रमाणें वागलें असतां मनुष्य उन्नत होतो. ह्याच्या उलट हिणकस ध्येयामुळें अधोगति प्राप्त होते; व ध्येयाच्या अभावीं सुकाणूं नसलेल्या गलबताप्रमाणें संसारसागरांत इकडून तिकडे गटंगळ्या खाव्या लागतात.

आपण ज्या समाजा ( Society ) मध्यें रहातों त्या समाजाची नीतिमत्तेची इयत्ता मध्यम प्रकारची असल्यामुळें उत्तमोत्तम ध्येय पुढें ठेवून त्याप्रमाणें वागूं असा कोणीं निश्चय केला असतां, त्याला तसें वागण्याला सहसा प्रोत्साहन मिळत नाहीं. समाजाची नीतिमत्ता नेहमीच मध्यम प्रकारची असावयाची.

पूर्वापार चालत आलेल्या चालीरूढींमुळें ती बनलेली असते आणि रूढीचें प्राबल्य नेहमींच पुष्कळ असतें. त्यामुळें ती असणें अनिवार्य असतें. धर्माचरण करावें, सत्यानें वागावें, न्याय, समता, प्रेम ह्यांचा व्यवहारांत नेहमीं उपयोग करावा, अशा प्रकारचें सर्व धर्मांचें शिक्षण असतें. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत ह्या सद्गुणांचा कितीसा उपयोग केला जातो ? प्रसंग पडला असतां हरिश्चंद्राप्रमाणें सत्यासाठीं वाटेल ते हाल सहन करणारे किती धर्मात्मे सांपडतील बरें ? कोणाचें लग्न होत असेल तर, कोणाचे प्राण वांचत असतील तर खोटें बोलण्याचें पातक लागत नाहीं असाच पुष्कळांचा समज नसतो काय ? वाटेल तसें अनीतीचें वर्तन ठेवावें, अन्यायानें वागावें, लबाडीनें धनसंचय करावा, लांच घ्यावी व द्यावी, पण मधून मधून एखादा सत्यनारायण करावा, ब्राह्मण-भोजन घालावें, एखाददुसरी यात्रा करावी, म्हणजे सर्व पापांचें क्षालन होतें, असाच व्यवहारी धर्म नसतो काय ? अशा प्रकारें समाजांत जो वागतो तो समाजाला प्रिय असतो; त्याच्या वाटेला समाज जात नाहीं; इतकेंच नव्हे, तर तो नमुनेदार धार्मिक पुरुष गणला जातो. समाजानें योग्य ठरविलेल्या नीतिमत्तेच्या इयत्तेपर्यंत जो येऊन पोहोंचणार नाहीं तो धनवान् किंवा वजनदार असल्याशिवाय समाज त्याला केव्हांहि क्षमा करणार नाहीं; व ह्या इयत्तेच्यापेक्षां आपलें आचरण श्रेष्ठ ठेवावयाचें असा जो कोणी निश्चय करून त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करील त्याचें आचरण समाजाला खपायचें नाहीं व समाजाकडून त्याचा छळ झाल्याशिवाय रहाणार नाहीं.


श्रेष्ठ ध्येय पुढें ठेवून त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करण्याचें कार्य बहुत-करून तारुण्यांत होत असतें. विद्याभ्यास संपवून तरुण मनुष्यें जेव्हां संसारांत पडतात तेव्हां पुष्कळदां तें असें ध्येय आपल्यापुढें ठेवतात. केवळ बहुजनांच्या मार्गानें न जातां आपण विशेष कांहीं तरी करून दाखवूं असा तेव्हां त्यांचा निश्चय असतो. तेव्हां मन सुविचारांनीं भरलेलें असतें. मी नोकरी करीन परंतु तींत फसवेगिरी करणार नाहीं. मी जें वेतन घेईन त्याचा आपल्या धन्याला रास्त मोबदला देईन. हाताखालच्या चाकरानोकरांकडून मी जें काम करून घेईन त्याबद्दल योग्य जें वेतन, त्यापेक्षांहि थोडें अधिक त्यांना देईन. मी सत्यानें, न्यायानें, प्रेमानें वागेन; खोटें बोलणार नाहीं; खोटें आचरणार नाहीं; लाच घेणार नाहीं. दुसऱ्यांच्या उपयोगी पडेन; समाजाच्या अधोगतीचीं कारणें दूर करण्याचा प्रयत्न करीन. अशा उत्तमोत्तम बेतांनीं प्रेरित होऊन तरुण मनुष्यें संसारकार्याला लागतात. परंतु समाजाकडून त्यांना प्रोत्साहन मिळत नाहीं. अशा मनुष्याची व संचारचतुर, व्यवहारदक्ष गणलेल्या माणसांची गांठ पडली म्हणजे ह्या सुंदर ध्येयावर विरजण घातलें जातें ! व्यवहारचाणाक्ष तरुणाला म्हणतो, "बाबा, तूं अद्यापि लहान आहेस. तुला जगाचा अनुभव नाहीं. हें जग सत्यानें भरलेलें नाहीं. हें खरें, खोटें, बरें, वाईट ह्यांचें मिश्रण आहे.

उत्तम ध्येय असणें वाइट नाहीं, पण त्याप्रमाणें वागणें हें व्यवहारज्ञानाचें लक्षण नव्हे. पुस्तकी विद्या व व्यवहार ह्यांत फरक आहे. तुम्हां तरुणांना व्यवहाराचें ज्ञान नसतें म्हणतात तेंच खरें. मीं ह्या जगांत बरेंच पावसाळे काढले आहेत. तुला जर जगांत राहून यश संपादावयाचें असेल तर मी सांगतों तें ऐक. जगाप्रमाणें जगिक झालें पाहिजे. हें सत्ययुग नव्हे, कलियुग आहे. कोणाचेंहि उदाहरण घेऊन पहा. आपण श्रेष्ठ पदाला चढलेलीं माणसें पहातों तीं मी म्हणतों तशीं वागल्यामुळेंच श्रेष्ठत्वास पावलेलीं आहेत." असा खात्री करणारा अनुभव ऐकून साहाजिकपणेंच तरुणाची वृत्ति द्विधा होते. तो मोठमोठ्या माणसांचीं चरित्रें पहातो. त्यांतील दोष तेवढेच त्याला प्रामुख्यानें दिसूं लागतात. अशा प्रकारें काय करावें, कसें वागावें, ह्या विवंचनेंत कांहीं काळ गेल्यावर बिचाऱ्याचें ध्येय बाजूस रहातें व इतर व्यवहारचतुर मनुष्याप्रमाणें त्याच्याहि आयुष्यक्रमाला त्याच्या ध्येया-च्याविरुद्ध प्रकारचें वळण लागतें !

ह्याप्रमाणें आणबाणीचा प्रसंग येतो तेव्हां प्रत्येक तरुणानें ही गोष्ट लक्षांत आणावी कीं जगाची आजपर्यंत जी सारखी उन्नत्ति झाली आहे ती व्यवहार-चाणाक्षांकडून झालेली नसून ध्येयवान् तरुणांकडूनच झालेली आहे. बुद्धानें भर तारुण्यांत आपल्यापुढें उच्चतम ध्येय ठेवून, राज्यपदावर लाथ मारून त्या ध्येयाचें अनुसरण केलें नसतें तर जगामध्यें भूतदयेचा प्रसार व कर्मठपणाचा प्रतिकार झाला नसता. ख्रिस्तानें आपलें ध्येय झांकून ठेवलें असतें तर ईश्वराचें पितृत्व व मनुष्याचें भ्रातृत्व हीं तत्त्वें प्रसृत झालीं नसतीं. लुथरनें धर्मासाठीं असह्य यातना सोसल्या नसत्या तर आजहि ख्रिस्ती धर्म जुन्या इजिप्तच्या अज्ञानांधकारांत खितपत पडला असता. रामदास, तुकाराम ह्यांनीं भक्तीचें ध्येय बाजूस सारलें असतें तर भक्तिमार्गाचा फैलाव आपल्या देशीं झपाट्यानें झाला नसता. इतर बाबतींतहि हीच गोष्ट लागू आहे. शास्त्रीय शोध लावणारे गॅलिलिओसारखे पुरुष, भूतदयेचीं कामें करणारे सुधारक हॉवर्ड, वुइलबरफोर्स, लिंकनप्रभृति कर्तृत्ववान् मनुष्यें ध्येयाच्या मागें अहोरात्र लागल्यामुळें अनेक सुधारणा शक्य झाल्या. छापण्याची कला, वाफेच्या शक्तीचा शोध, विद्युत् शक्तीचा उपयोग इत्यादि त्या त्या ध्येयाच्या सिध्यर्थ झटणाऱ्या पुरुषांच्या अहर्निश श्रमाचीं फळें आहेत. केवळ अल्प काळांत आपल्या देशांत साध्या रहाणीचा व उच्च विचारसरणीचा जो इतका फैलाव झाला आहे, ज्यामुळें हजारो लोक व्यसनमुक्त झाले आहेत, त्याचें कारण तरी ध्येयवान्, शीलवान् महात्मा गांधी हेच होत. तात्पर्य, आपलें ध्येय जर श्रेष्ठ असेल तर आम्हांला बहुजनसमाजाची, बहुमताची पर्वा करण्याचें कारण नाहीं. तें अनुसरलें असतां यशप्राप्ति होईलच होईल.

हें ध्यानांत बाळगून आपण आपल्या स्थितीचें क्षणभर निरीक्षण करूं या.

आमच्या भारतातील सर्व तरुणांनीं आपल्यापुढें श्रेष्ठतम असें ध्येय ठेवले पाहिजे. आम्हीं आपल्यापुढें कोणीहि मनुष्याचें उदाहरण न ठेवतां प्रत्यक्ष परमेश्वराला आपलें ध्येय केलें पाहिजे. तें परिपूर्ण करावयाचें म्हणजे त्याचे जे गुण आम्ही आपल्या नजरेनें पहातों ते स्वतःच्या आचरणांत आणावयाचे. हें ध्येय आपण कितपतसें अनुसरीत आहों ? देव सत्य आहे, प्रेममय आहे, दया, क्षमा, शांति, पावित्र्य हे त्याचे विशिष्ट गुण आहेत असें आपण म्हणतों व त्याप्रमाणें वागण्याची आपण शपथहि घेतों; पण आमचें वर्तन कितपत प्रेमाचें असतें ? प्रसंग येतो तेव्हां दया, क्षमा, शांति ह्या गुणांच्या कसोटीला आम्ही उतरतों काय ? ह्या बाबतींत शांत वृत्तीनें आत्मपरिक्षण केलें तर लज्जेनें मान खालीं घालण्याचा आपल्यापैकीं बहुतेकांवर प्रसंग आल्याशिवाय रहाणार नाहीं. ईश्वराचे गुण प्रत्यक्ष आचरणांत यावे, केवळ ते तत्त्वांतच राहूं नयेत म्हणून अनेकांनीं रात्रीच्या शाळा, समाजसेवासंघ; अनाथ मुलांचें संगोपन, इत्यादि बरींचशीं लहानमोठीं कार्यें हातीं घेतली आहेत. परंतु ह्या संस्थांची स्थिति पाहिली असतां आपण आपलें ध्येय विसरलों आहो व त्यापासून निसटून फार दूर जाऊन पडलों आहोंत असें खेदानें कबूल करणें भाग आहे. ध्येयसाधनाच्या बाबतींत आम्हीं आपली वंचना करतों आहों. आम्ही वारंवार आमची प्रगति कां होत नाहीं व ती कशी होईल ह्या संबंधाच्या सभासदांच्या व आमच्याशीं सहानुभूति असणाऱ्यांच्या सभा भरवून विचार करतों, खल करतों, परंतु कांहीं कार्यनिष्पत्ति होत नाहीं. जोंपर्यंत आम्ही आपली फसवणूक करण्याचें सोडणार नाहीं, जोंपर्यंत ध्येयाला मान देऊन तें आचरणांत आणणार नाहीं, तोपर्यंत आमची वाढ होईल व आम्हांला यश येईल अशी अपेक्षा करणें चुकीचें आहे. आम्ही जर योग्य रीतीनें स्वतःच्या हृदयाचें परीक्षण करूं व त्यालाच साक्षी ठेवून आपलें वर्तन ठेवूं, तर अशा सभा भरवण्याचाहि प्रसंग आम्हांवर येणार नाहीं. परमेश्वराच्या कृपेनें, ज्यांची आमच्यासंबंधीं सहानुभूति आहे ते आम्हांला येऊन मिळतील व एकंदर देशाची झपाट्यानें प्रगति होईल.



# संतांच्या वाङ्मय परंपरेचे उत्तराधिकारी

## श्री दासगणू महाराज यांची वाङ्मय सेवा

संतकवि दासगणू महाराज हे साईबाबांचे अनन्य-साधारण भक्त होते. बाबांच्या तत्त्वज्ञानाचा कीर्तनांच्या व काव्यरचनेच्या रुपानें त्यांनीं महाराष्ट्रांत अत्यंत प्रभावीपणें व समर्थपणें प्रचार केला. सत्‌शिष्य श्री. अनंतराव आठवले यांनीं लिहिलेल्या श्री दासगणू महाराजांच्या चरित्रांतून त्यांच्या वाङमयसेवेचा परिचय पुढीलप्रमाणें करून दिला आहे:—

संतकवि श्रीदासगणूमहाराज यांच्या काव्याचा परिचय करून देणें ही एक अवघड गोष्ट आहे, असें मला वाटतें. याचीं कारणें मुख्यतः दोन आहेत. एक तर त्यांच्या काव्याचा विस्तार खरोखरीच एकाद्या सागराप्रमाणेंच विशाल आहे आणि गांभीर्याचा विचार करितां समुद्राचींच उपमा शोभावी, असेंच तें खोलहि आहे. त्याचा थांग लावून आंतील विचारमौक्तिकें वर आणणें, हें अतिशय श्रमाचें आहे. दुसरें महत्वाचें कारण असें आहे कीं, कवित्वाच्या ज्या परंपरेचा उत्तराधिकार श्रीदासगणूमहाराजांच्याकडे आला आहे, ती आज जनतेमध्ये लोकप्रिय असलेल्या परंपरेपेक्षां सर्वथैव वेगळी आहे. आजच्या कवींच्या संप्रदायामध्यें एक वेगळेंच नाविन्य रूढ झालेलें आहे. विलक्षणता हीच जणूं आधुनिक कवितेची कसोटी बनलेली आहे. प्रा. रा. श्री. जोग यांनीं केशवसुतासंबंधीं लिहिलेल्या ग्रंथामध्यें केशवसुतांच्या संप्रदायाचें म्हणून जें वर्णन केलें आहे, तेंच वळण जवळ जवळ सर्व आधुनिक कवितांचें आहे. आधुनिक सुशिक्षित जगतावर इंग्रजी संस्काराचे परिणाम अत्यंत खोल झालेले असल्यामुळें कवितेचा अद्यतनीय आविष्कार जरी मराठी वा भारतीय वेषभूषेंत झालेला असला तरी त्यांतील अंतरंग सर्वथैव परकी आहे. त्यांचे ध्येयही परकीयांप्रमाणें केवळ ऐहिक वासनातृप्तींत आहे. ध्येयामधील हा फरक संस्कृतीचा. या परकीय विचारसरणीचा पगडा सुबुद्ध समाजावर पडलेला असल्यामुळें या परंपरेव्यतिरिक्त रचिल्या गेलेल्या साहित्याचें रसग्रहण करणें, दुर्घट होऊन बसतें. श्री. दासगणू महाराजांच्या काव्याचें परीक्षण करणें अवघड आहे, असें मी म्हटलें त्याचें हें दुसरें पण महत्वाचे कारण होय.

श्री. दासगणूमहाराज संपूर्ण अर्थानें संतकवि आहेत. ते या परंपरेचे उत्तराधिकारी आहेत, तिची गंगोत्री श्रीज्ञानेश्वरांच्या प्रतिभेंत आहे आणि नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास अशा एकाच क्षेत्रामध्यें उगम पावलेल्या, सारखेंच मधुर व पवित्र जल असणाऱ्या अनेक प्रवाहांना समाविष्ट करून घेत, ही काव्य गंगा जनांचे पापताप फेडीत तीरावरील तृषार्त पादपांना पोशीत जनकल्याणासाठीं प्रसन्नपणें अविरत वहाते आहे. आत्महित आणि जनहित साध्य करणें, समाजाचें अंतर्बाह्य स्वास्थ्य टिकविण्यासाठीं नैतिक मूल्यांचा पुरस्कार करणें, जीवनासाठीं कलेला राबविणें आणि त्यांतच कलेचें सौंदर्य मानणें, हें या परंपरेचें साहित्यशास्त्र आहे. सौंदर्याचा आविष्कार हे येथें साधन आहे. त्यामुळें सौंदर्यानें पाहिजे तर आपण होऊन आपला मान राखून घ्यावा. सासरच्या वडीलधाऱ्या मंडळीसमोर वावरतांना शालीनतेचा पदर सांवरून वागणाऱ्या प्राचीन काळच्या नववधूप्रमाणें सुंदरतेनें या वाङ्मयांत वावरावें, पण डोक्यावरील पदर ढळूं देऊं नये, अशी या परंपरेची शिस्त आहे. शब्दांतून प्रकट होणारा ध्वनि त्या ध्वनीला पोषक होणारीं रूपकें हीं मूळ अर्थाशीं सर्व दृष्टीनें संबद्ध असलीं पाहिजेत, असा या परंपरेचा **भाषाशास्त्रविषयक** दंडक आहे. हरिभक्तीची लेणीं मिरविणें, हें या परंपरेचें भूषण आहे. दंभ, लोभ, मत्सर, अन् वासन यांना फटकारे मारून नियंत्रित ठेवणें ही या परंपरेची दंडनीति आहे आणि प्राचीन वेदान्तमताप्रमाणें मोक्ष किंवा संतांच्या समाजोन्मुख तत्त्वज्ञानाच्या मांडणीप्रमाणें सगुण श्रीहरीची प्राप्ति हें या परंपरेचें परमधाम ध्येय, उद्दिष्ट, हेतु इत्यादि सर्व कांहीं आहे. त्यासाठींच ती उगम पावते, वहाते आणि तेथेंच तिचा लयहि होतो.

वैषयिक सुखाच्या मागें लागून कोणत्याहि समाजाचें कधींहि भले होणार नाहीं. समाजांतील संघर्ष कधीं थांबणार नाहीं. सदा वर्गविग्रहच राहील. वर्ग होऊंच नयेत म्हटलें, तर ज्या अर्थानें आपण सुधारणा, प्रगति हें शब्द वापरतों, तो अर्थ कधींच प्रत्ययास येणार नाहीं. या कारणानें कोणत्या तरी स्वरूपांत वर्ग हे पडावयाचेच आणि स्वार्थलोलुपतेमुळें त्यांच्यांत वैमनस्य हें रहावयाचेंच...मग जीवनाला स्वास्थ्य म्हणून लाभणारच नाहीं. तें लाभावें यासाठीं संयम, सदाचार, नीति, सामोपचार, वैराग्य, वासनोपशम इत्यादि सद्गुणांचा पुरस्कार करणें, हें संतांना आवश्यक वाटलें. यासाठींच त्यांनीं आपल्या सर्व सुखावर पाणी सोडून आयुष्यभर अविरत कष्ट केले. क्वचित् समाजाकडून हेटाळणीहि पत्करली, पण समाजाच्या कल्याणासाठीं स्वीकारिलेलें हरिभक्तीचें ओढहि क्वचित् आत्मनिष्ठ वाटली, परमेश्वरदर्शनासाठीं होणारी त्यांच्या जीवाची तडफड आणि मनाची तळमळ ही वैयक्तिक भासली, तरी तिचें खरें उद्दिष्ट सर्वजनकल्याण हेंच होतें. तुलसीदास जरी "स्वांतःसुखाय तुलसी रघुराज-गाथा-भाषानिबद्धमतिमंजुल-मातनोति"—असें म्हणत असले. तरी त्यांच्या स्वांतःसुखाचा अर्थ फार व्यापक

घेतला पाहिजे. श्रीतुकाराम महाराजांनीं आपल्या जीवनाच्या उद्दिष्टाचें स्पष्टीकरण एक अभंगांत प्रकटपणें केलें आहे—

" आम्ही वैकुंठवासी । आलों याच कारणासी ।
बोलले जे ऋषी । साच भावें वर्ताया ॥
अर्थे लोपली पुराणें ! नाश केला शब्दज्ञानें ।
विषयलोभी मनें । साधनें बुडविलीं ॥
झाड संताचे मार्ग । आडरानीं भरलें जग ।
उच्छिष्टाचा भाग । चांग उरला तो सेवूं...॥
पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।
तुका म्हणे करा । जयजयकार आनंदें...॥ "

संतांच्या जीवनाचें ध्येय या अभंगामध्यें स्पष्ट शब्दांत मार्मिकपणें सांगितलें गेलें आहे. त्यांच्या जीवनामध्यें स्वार्थ असा शिल्लक नसेच. त्यांचें अस्तित्व केवळ परोपकारासाठीं असावयाचें.

" तुका म्हणे आतां । उरलों उपकारापुरता " हें वचन त्यांच्या साहित्याच्या दृष्टीनेंहि सर्वथैव सत्य आहे. यामुळें संतवाङ्मयाचे हेतु व संतांच्या साहित्याचे नियम रूढ साहित्यशास्त्राच्या सांच्यांत जसेच्या तसे बसविणें अशक्य आहे.

प्राचीन साहित्यशास्त्रकारांनीं काव्याच्या हेतूविषयीं व स्वरूपाविषयीं लिहितांना पुढील नियम सांगितला आहे—

काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये ।
सद्यःपरनिर्वृतये कांतासंमिततयोपदेश युजे ॥

याचा अर्थ असा :—काव्य हें जें रचले जातें, तें हा उत्तम कवि आहे, प्रतिभावन्त आहे, भाषाप्रभु आहे, याची निरीक्षणशक्ति सूक्ष्म आहे, याचा कल्पनाविलास भावमधुर व बुद्धीला चकित करणारा आहे, याच्या अनुभूतींत विविधता,


SANTACRUZ RESTAURANT AND STORES

Station Road, Santacruz West,
BOMBAY

☆

**Caterers and dealers in Biscuits, Chocolates and all Kinds of tinned articles.**

विशालता व गंभीरता आहे, हा श्रेष्ठ प्रतीचा साहित्यिक आहे, अशी स्वतःची कीर्ति जगतितलावर व्हावी, म्हणून रचिलें जातें, किंवा ऐहिक सुखास साधनीभूत होणारें द्रव्य भरपूर लाभावें, हाहि वाङ्मयनिर्मितीचा हेतु असूं शकतो. लोकांच्या वागणुकीसंबंधीचे नियम बांधून गोडीगुलाबीनें समाजाला शिक्षण द्यावें, यासाठींहि साहित्याची रचना केली जाते, अमंगळ नाहींसें होऊन सर्व संकटाचा परिहार व्हावा, यासाठीं देवतांना प्रसन्न करण्यास, स्तुतिपर कविताहि गाइल्या जातात; किंवा अंतःकरणाला आत्यंतिक शांतता मिळून चित्ताचें समाधान कधींच ढळूं नये, मनोवृत्ति नेहमीं शाश्वत आनंदांत रंगून रहाव्यात, अशी अलौकिक रसनिर्मिति करणें, हेंहि सारस्वताचें प्रयोजन असूं शकतें. काव्याच्या निवेदनाची पद्धति मात्र आज्ञा करून सांगणारी वा वादविवाद करून पटवून देणारी नसावी. प्रिय पत्नी ज्याप्रमाणें आपल्या पतीकडून एखादी गोष्ट प्राप्त करून घेण्यासाठीं लाडीगोडीनें, लडिवाळ माधुर्यानें वा क्वचित् रुसवाफुगवा धरल्याचा आव आणून प्रिय पतीशीं बोलते व आपलें काम साधून घेते, तीच रीति साहित्याच्याचीहि असावी. आज्ञा करणारा प्रभुसंमितोपदेश वा स्वतःच्या वजनानें तर्कबुद्धीला एखादी गोष्ट पटवून देणारा सुहृत्संमितोपदेश काव्यामध्यें नसावा. हा संस्कृत साहित्यांतील काव्यासंबंधींचा नियम झाला. आधुनिक काव्यहि या नियमास फारसें सोडून नाहीं. त्याचें उद्दिष्ट पहिल्या दोन, फार तर पहिल्या तीन प्रकारांत कुठेंतरी बसतें; आणि निवेदनाचें स्वरूपहि कांतासंमितोपदेशाचेंच आहे. ही कांता पूर्वकालच्या कुलस्त्रीइतकी शालीन नसली, लज्जाविनयादि गुण आधुनिक शिक्षणाच्या संस्कारानें वा स्त्रीपुरुषांच्या समानाधिकाराच्या जाणिवेनें जरी थोडे उणावले असले' तरी संभाषणपद्धति कांतेचीच आहे. प्राचीन साहित्यशास्त्रकारांनीं सांगितलेल्या नियमाचें उल्लंघन अत्यंत पुरोगामी म्हणून गणिल्या गेलेल्या आधुनिकांतील आधुनिक कवीकडूनहि होऊं शकलें नाहीं. कविता मुक्तछंदांत रचली गेली, नागरभाषेचा वेष आणि अलंकारशास्त्राचे नियम बाजूस सारले गेले; शब्द ग्राम्य बनले, उपमा रूपकें यांनीं पूर्वींच्या चंद्रप्रकाशांतील प्रसन्नता टाकून गांवकुसावर सांचलेल्या उकीरड्याच्या ढिगाचें बीभत्स रूप धारण केलें, तरीहि बंडखोरी करणारी ही अल्लड, अवखळ नवकाविता साहित्यशास्त्राची लक्ष्मणरेषा ओलांडूं शकली नाहीं.

संतांच्या कवितेला मात्र या प्राचीन साहित्यशास्त्राच्या नियमांत जसेंच्या तसें बसविणें बरेंचसें कठिण आहे. थोडें फार सादृश्य दाखवितां आलें तरी तिचें वळण पुष्कळसें स्वतंत्र आहे. अर्थात् ही स्वतंत्रता बंडखोर वृत्तींतून जन्माला आलेली नसून काव्यहेतूंशीं संवाद राखतांना स्वाभाविकपणेंच उत्पन्न झालेली आहे आणि त्याचें कारणहि उघड आहे. प्राचीन साहित्यशास्त्रकारांच्यासमोर सामान्यतः कालि-

दास, भवभूति, बाण, माघ इत्यादि ललित कवीच होते. आपापल्या काव्यप्रकाश, ध्वन्यालोक, साहित्यदर्पण, कुवलयानंद इत्यादि ग्रंथांतून त्यांनीं उद्‌धृत केलेलीं उदाहरणें पाहिलीं म्हणजे माझें वरील विधान सहज पटेल. व्यास, वाल्मीकि इत्यादींच्या अव्याजमनोहर काव्यांतील उदाहरणें तेथें अभावानेंच तळपतात. याचा अर्थच वाल्मीकि व्यासादि साहित्यसम्राटांचें लिखाण त्यांच्या डोळ्यांसमोर नव्हतें, असा आहे. अन्यथा काव्याचे हेतू सांगतांना व त्याचे स्वरूप विशद करतांना सांगितलेल्या नियमास थोडा वेगळेपणा निश्चयानें आला असता.

साहित्यशास्त्रकारांनीं सांगितलेलें कीर्तीसाठीं आणि द्रव्यलाभासाठीं काव्य रचिलें जातें, हे पहिले दोन हेतु संतांच्या वाङ्मयाशी मुळींच संबद्ध नाहींत. स्वतःचें असलेलें धनहि त्यांनीं दोन्ही दोन्ही हातांनीं उधळून टाकून कडकडीत वैराग्याला शोभेल असें निष्कांचन व्रत स्वीकारिलें. स्तुतीची यत्किंचितहि अपेक्षा त्यांनीं केली नाहीं. उलट निंदा झाली तर बरीच, असें मानून 'निंदकाचें घर असावें शेजारीं'। असें म्हटलें. पुढचें तीन हेतु व्यवहारबोध, अमंगलनाश आणि परनिर्वृति यांचा मात्र चढत्या क्रमानें स्वीकार केला. अर्थातच या पद्धतीच्या वाङ्मयाचें स्वरूप कांतासंमितोपदेशाचें राहणें शक्यच नाहीं. येथेंच प्राचीन साहित्यशास्त्र आणि संतांचें वाङ्मय यांत मुख्यतः फरक आहे. अर्थात् हेंहि काव्यच असल्यानें उपदेशाच्या पहिल्या दोन प्रकारांत तें पडत नाहीं. प्रभुसंमितोपदेश सक्तीचा, तर सुहृत्‌संमितोपदेश बरोबरीच्या नात्यानें केलेला बराचसा रूक्ष व म्हणून क्वाचित् उपेक्षणीय भासणारा. या पद्धतीच्या लिखाणाला काव्यांतील रस कसा प्राप्त होणार? ही उपदेशात्मक रचना पद्यमय असूं शकेल, पण ते 'काव्य' नव्हे! संतांचें बहुतेक वाङ्मय निश्चितपणें 'काव्य' या सदरांत समाविष्ट होणारें आहे. तें पद्यमय तर आहेच, प्रसादगुण त्याचा आत्मा आहे, पण प्रतिभाविलासहि त्यांत ठायींठायीं आढळतो. त्यांतील उपमारूपकांतून हें सहज स्पष्ट होईल. भावनेचा ओलावा, हे काव्याचें जीवन मानलें तर संतसंप्रदायाची कविता ही भावानें थबथबलेली आहे, पण येवढें असूनहि या काव्याला कांतासंमितोपदेश म्हणण्यास मी तयार नाहीं.

संतांच्या कवीतेला उपमा द्यावयाचीच झाली, तर ती मोठ्या एकत्र कुटुंबांतील सर्व प्रकारची जबाबदारी आपल्या शिरावर घेणाऱ्या प्रौढ पुरंध्रीची देतां येईल लेकीसुनानातवंडांबरोबर संसारांत राहणाऱ्या या माऊलीचे सर्व स्वार्थ अगदीं संपलेले असतात. खाण्यालेण्याची कोणतीहि हांव तिच्या ठायी उरलेली नसते. सर्वांचें बरें व्हावें, सगळ्यांना सुख लागावें, कुणालाहि कमी पडूं नये, म्हणून ती कष्टत रहाते; मुलांमाणसांच्या दुखण्यांत जीवापलिकडे खस्ता खाते, लेकीसुनांना संसारांतील वागणुकीचें वळण लावते; मुलांना कधीं खाऊचें आमिष

दाखवून तर कधीं डोळ्याच्या धाकानें सुशिक्षण देते. सर्वांच्या कल्याणासाठीं अहोरात्र देवघरांत बसून परमेश्वराची करूणा भाकते. नमस्कारास आलेल्या मुलांबाळांना त्यांच्या अडचणींचा परिहार व्हावा, म्हणून आशीर्वाद देते. प्रसंगोपात्त कधीं करारी तर कधीं तापट, कधीं हसून तर कधीं उपहासून, कधीं प्रेमळपणानें तर कधीं रागानें, कधीं कडक शिस्तीनें तर कधीं लडिवाळपणानें सर्वांना वागवीत, सर्वांच्या हिताची काळजी वहात, सर्वांच्यासाठीं कष्ट उपशीत प्रसन्नपणानें निःस्वार्थ जीवन जगणाऱ्या या वत्सल मातेचीच उपमा संतकवितेच्या स्वरूपाची ओळख करून देईल.

आई जी पवित्र आदरणीय आणि खऱ्या अर्थानें सेव्य म्हणजे सेवा करण्यास योग्य वाटते, ती तिचा वर्ण किती उज्जल आहे, नाकडोळे किती रेखीव आहेत, यामुळें नाहीं.उजळ वर्ण आणि नीटस नाकडोळे यांचा मातृत्वाशीं जवळ जवळ कांहींहि संबंध नाहीं. हृदयाची श्रीमंती, बुद्धीची उदारता, भावनें-तील वात्सल्य आणि वृत्तींतील त्यागमयता हेंच आईविषयींच्या आदराचें मुख्य कारण आहे. बाह्य सौंदर्य वा वेषभुषा येथें गौण आहे. संतांच्या वाङ्मयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन असाच असला पाहिजे. त्या ठिकाणीं बाह्यांगावर भर देऊन चालणार नाहीं. आधुनिक टीकाकारांना या प्रकारची जाणीव अगदींच नाहीं, असें नाहीं. त्यांना इष्ट वाटणाऱ्या नवसाहित्यिकांचें समर्थन करितांना त्यांनीं या तऱ्हेची जाणीव असल्याचें निश्चितपणें दाखविलें आहे. नवसंप्रदायाचे मूळ पुरुष या नात्यानें ज्याची ओळख करून दिली जाते, त्या श्री केशवसुतांच्या काव्याविषयीं टीकाकारांनीं ही आपुलकी खचितच दाखवीली आहे. केशवसुतांचें काव्य भाषेच्या लालित्याच्या दृष्टीनें फारसें मधुर नाहीं, कवितेच्या तंत्राच्या दृष्टीनें विशेषसें रेखीव नाहीं वा उपमारूपकांच्या दृष्टीनें तसें संपन्नहि नाहीं, हें सर्वांनाच मान्य होण्यासारखें आहे. केशवसुतांच्या कवितेतून प्रकट होणारा भाव, चमकणारें तेज, आढळून येणारा विचारांचा बंडखोरपणा, यामुळें व विषयाच्या नाविन्यमुळें त्यांचें काव्य आकर्षक झालें आहे असेंच सर्व मानतात. आणि म्हणून नवकवींच्या गणनेंत केशवसुतांना मानाचें पहिलें पद मिळालें.

याच तऱ्हेची वृत्ति संतवाङ्मयाबद्दलहि दाखविली पाहिजे असें मला वाटतें. संतवाङ्मयामध्यें केवळ काव्याच्या दृष्टीनें विचार करतांनाहि सौंदर्य, माधुर्य, लालित्य आढळतेंच. श्रीज्ञानेश्वरमहाराजांसारखे कांहीं वाङ्मयप्रभु तर या प्रकरणीं कोणत्याहि अर्वाचीन, प्राचीन कवींना हार जाणार नाहींत. उलट निरपवादपणें श्रेष्ठ ठरतील, यांत शंका नाहीं; परंतु इतकें असूनहि ज्ञानेश्वरींत काव्य शोधणें, हें पीकलेल्या उत्तम कलमी आंब्याच्या नुसत्या रंगाच्या वर्णनांत वेळ वाया घाल-विण्यासारखें आहे, असें मी समजतों. संताच्या वाङ्मयांत कला असली, तरी केवळ कलानंदासाठीं तें कधींच रचलें गेलें नाहीं. जीवनाचें शाश्वत हित साधणें, हाच

त्यांच्या निर्मितीचा हेतु आहे. अर्थात् 'कलेकरितां कला' का 'जीवनांकरितां कला' हा वाद येथें निरर्थक आहे. जीवनाकरितां कला म्हणण्यांतहि कलेला एक प्रकारची अपरिहार्यता येते. तितकेंहि महत्व संतवाङ्मयामध्यें कलेला देतां येणार नाहीं. संतांच्या कवितेत कला आढळते. साहित्यकारांनी निर्माण केलेलीं कांहीं भूषणें तिनेंहि आपल्या अंगावर धारण केलीं आहेत, परंतु प्रौढ सुवासिनीनें नथ घालण्याचें प्रयोजन समजलें पाहिजे. सुवासिनीच्या अलंकारांमध्यें नथेचें स्थान सौंदर्य-प्रसाधनासाठीं नसून एक सौभाग्यचिन्ह म्हणूनच ती वापरली जाते; परंतु नथ नसेल, तर सौभाग्यवतीच्या सुवासिनीपणाला जसा कोणताच बाध येत नाहीं, तसेंच संतांच्या वाङ्मयामध्यें कलेच्या बाबतींत समजावें. 'कलेकरितां कला' हा वन्ध्य सौंदर्यवाद नर्तकीनें स्वीकार्य मानला तरी कुलस्त्रीला त्याचा उपयोग नसावा, हेंच योग्य आहे.

श्रीदासगणु महाराजांच्या काव्याकडे पाहतांना दृष्टिकोन कोणता असावा, हें स्पष्ट करण्यासाठींच मी वरील प्रतिपादन केलें आहे.

श्रीदासगणु महाराज हे संतांच्या वाङ्मयपरंपरेचे आज तरी एकुलते एक उत्तराधिकारी आहेत. जो हेतु, जें प्रयोजन संतांनीं आपल्या डोळ्यांसमोर ठेवलें होतें, तोच हेतु श्रीमहाराजांच्याहि समोर आहे; त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या वाङ्मयावर त्यांचा उल्लेख 'संतकवि दासगणु असा सविशेषण केला जातो. एकानें खेंचून विचारलें, तुम्ही आपल्याला संतकवि म्हणवून घेतां, हें अभिमानाचे द्योतक नाहीं काय ?' यावर महाराज लगेच म्हणाले, "यांत अभिमानाचा काय संबंध! राजाचा कवि तो जसा राजकवि, तसा संतांचा कवि तो मी संतकवि! यांत अभिमान कसला?" 'संतकुळींचा भाट तुझा हा दासगणू आला' असें त्यांच्या संबंधीं श्री. देवांनीं म्हटलें आहे, तें योग्य आहे. आयुष्यभर त्यांनीं संतांच्या कीर्तीचे पोवाडे गाण्यापलीकडे दुसरें कांहींच केलें नाहीं, असें म्हटले तरी चालेल. संतांच्या दरबारामध्यें आपलें स्थान फक्त वैतालिकाचे, स्तुतिपाठकाचें आहे; असें श्रीदासगणु महाराज मानतात.

मी मात्र "संतश्चासौ कविश्च संतकविः।" 'संत असा कवि' असाच अर्थ संतकवि या शब्दाचा करतो. संतकवि म्हणण्यामध्यें दासगणु महाराजांच्या काव्याची ओळख सर्व तऱ्हेनें पटवून देण्याचें सामर्थ्य आहे, असें मला वाटतें. संतकविपदाला शोभेल, असेंच त्यांचें वर्तन व वाङ्मय आहे. मुख्य हेतु बाजूला टाकून केवळ कवित्वाच्या दृष्टीनें पाहिलें, तरी आधुनिकांना रंजविण्याचें सामर्थ्य त्यांच्या कवितेंत आहे, असें मला प्रामाणिकपणें म्हणावयाचें आहे. म्हणूनच आधुनिक सुशिक्षित, विद्वान् रसिक अशा वाङ्मयप्रेमी जनांच्या पुढें दासगणु-महाराजासंबंधीचा हा ग्रंथ लिहून ठेवण्यास मी प्रवृत्त झालों आहे. एकाद्या संतकवीचें धार्मिक वाङ्मय म्हणून त्याकडे उपेक्षाबुद्धीनें पाहिलें जाऊं नये, असें

मला वाटतें. एकाद्या ललितकलामंदिराभोंवतींची पुष्पवाटिका ही जितकी रमणीय असूं शकते, तितकीच मनोहरता देवमंदिराभोंवतींच्या उद्यानास कां असूं शकणार नाहीं? देवाच्या मंदिराभोंवतीं येतांच त्याचें सौंदर्य उणावेल असें थोडेंच आहे? दक्षिणेकडील देवतांच्या दर्शनासाठीं एकादा भाविक यात्रेकरू गेला तर तो तेथील मंदिरांत भरून असणाऱ्या रमणीय शिल्पाचें सौंदर्य अनुभवूं शकत नाहीं का? तितकी भाविकता नसलेला एकादा चोखंदळ प्रवासी तें भव्य, मनोहर शिल्प देवतांची सेवा करीत उभें राहिलें आहे, म्हणून दर्शनीय नाहीं असेंहि मानीत नाहीं. वैषयिक प्रेमाची समाधि असलेला ताजमहालच तेवढा सुंदर असावा, वेरूळचें कैलास लेणें रमणीय असूं नये असें म्हणणें खऱ्या रसिकास शोभणारें नाहीं. दासगणू महाराजांच्या काव्याविषयींहि असेंच म्हणतां येईल. भाविकाला त्यांच्या वाङ्मयाचें आलोचन करणें, हें एकाद्या सुगरणीनें दिलेल्या पंचपक्वान्नाच्या मेजवानीप्रमाणेंच आहे यांत शंका नाहीं; परंतु विचक्षण रसिकाला तें सत्यनारायणाच्या शास्त्रोक्त पद्धतीप्रमाणें तयार केलेल्या मधुर प्रसादाप्रमाणें ग्राह्य वाटेल.



LEADING DRY CLEANERS & DYERS

**VINU POWER LAUNDRY**

Station Road, Santacruz West,
BOMBAY

☆

Customer's Satisfaction is our motto.

# मामेकं शरणं व्रज

तूं एवढा चिंताग्रस्थ कां ? तूं माझें स्मरण कर. श्रद्धायुक्त अंतःकरणानें मला हांक मार. तुझ्या हांकेला तात्काळ ओ दिल्याशिवाय मी रहाणार नाहीं ! तुझे सारे रोग, सारीं दुःखे व सारीं संकटें नाहींशी करण्याचें सामर्थ्य माझ्याठायीं आहे. मी सांगितलें ना कीं, मी तुझ्यापासून जरासुद्धां दूर नाहीं. तूं एकदां माझ्याकडे पहा तर खरें !

माझा तुला पदोपदीं विसर पडतो आणि त्यामुळेंच तूं दुःखाच्या तावडींत सांपडतोस ! मी तरी काय करणार ? तूं मला विसरू नकोस, माझी सतत आठवण कर असें किती परोपपरीनें सांगत आलों आहे मी !

पण माझ्या त्या सांगण्याकडे तुझें लक्ष कुठें आहे ! ' लक्ष लावी तूं मजकडे ! ' असें किती वेळां मी सांगितलें ! तूं माझ्याकडे लक्ष लाविलें म्हणजे आपोआप माझें लक्ष तुझ्याकडे लागून राहील. मग मी तुला कोणत्याही संकटांत सांपडूं देणार नाहीं.

किती प्रेमानें मी तुला बोलावित आहें ! परंतु तुझें लक्षच नाहीं माझ्या त्या बोलावण्याकडे

तूं संसार तापानें गांजलेला व निराश झालेला आहेस ना ? मग मी तुझ्या सांगाती नाहीं असें का तुला वाटतें ? अरे ! तूं डोळे असून माझ्याकडे पहात नाहींस, त्याला मी काय करूं ? एकदां डोळे चांगले पुसून माझ्याकडे पहा तर खरें. मग पहा, काय चमत्कार घडून येतो तें. मी तुझीं सारीं दुःखें हां हां म्हणतां नाहींशी करून टाकीन.

मी सतत तुझ्याबरोबर आहें, याचा विसर कधींही पडूं देऊं नको. मी तुझ्या हृदयांत आहे. तुझें हृदयकमल हेंच माझें निवासस्थान.

तूं आवडीनें माझें नांव घे. आंत, बाहेर, जेवतां खातां, कुठेंही असलास तरी मला हांक मार. तुझ्या दुःखनाशाचें तें एकमेव साधन आहे असें समज.

कोणताही प्रसंग येवो. घाबरण्याचें कारण नाहीं. मग माझा काय बरें उपयोग ? अज्ञानापायीं तूं स्वतःचें नाहक नुकसान करून घेत आहेस.आजवर झालें तें गेलें. तें कृष्णार्पण असें समज व यापुढें तरी एकच कर. काय ?

**' सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज । '**

---

# शिर्डी संस्थानचें वाढतें वैभव

( आमच्या प्रतिनिधीकडून )

शिर्डीचें महत्त्व दिवसेंदिवस वाढत चाललें आहे. याचें कारण या पुण्य-क्षेत्रांत श्रीसाईबाबांचें दीर्घकाळ वास्तव्य होऊन तेथेंच सुमारें सत्तेचाळीस वर्षांपूर्वी ते समाधिस्थ झाले. श्रीसाईबाबा आज प्रत्यक्ष देहानें वावरत नसले तरी त्यांनीं अंतकाळापूर्वी सांगितल्याप्रमाणें त्यांच्या भक्तांना त्यांच्या भक्तीचें योग्य तें फळ मिळतच आहे. त्यांच्या मनकामना आजही परिपूर्ण होत आहेत.

## जागृत स्थान

शिर्डी येथील साईबाबांचें समाधिस्थान हें एक जागृत स्थान आहे. तेथें येणाऱ्या भक्ताला त्याच्या श्रद्धेचें फळ मिळत आहे. आणि त्यामुळें त्या स्थानास भक्तिभावानें भेट देणाऱ्या भक्तांची संख्या उत्तरोत्तर वृद्धिंगत होत चाललेली आहे.

साईबाबांचें आगमन होण्यापूर्वी शिर्डी हें एक लहानसें व सर्वसाधारण खेडें होतें. तेथें सोईपेक्षां गैरसोईच फार होत्या; परंतु साईबाबांनीं त्या खेड्याचा क्रांतीकारक कायापालट घडवून आणिला. तेथें रहाणारे लोक खरोखर भाग्यवान् समजले पाहिजेत. कारण आजकाल त्या गांवाला वैभवश्री प्राप्त झालेली आहे. जेथें सदासर्वकाळ काळोखाच्या ऐवजीं प्रकाश नांदत असतो. जेथें घनघोर शांततेऐवजीं रात्रंदिवस हरिनामाच्या वा श्री साईबाबांच्या भजनानें अहोरात्र सारें वातावरण दुमदुमलें जात असतें, जेथें सर्वत्र सुगंधी पुष्पांचा व उदबत्त्यादि सुगंधी द्रव्यांचा मधुर सुगंध सारें वातावरण व्यापून टाकीत असतो व जेथें रोजच्या रोज शेकडो भक्तांना बाबांच्या कृपेचा आधार मिळत असतो, त्या पुण्यभूमीचें भाग्य कोण वर्णन करूं शकेल ?

## भक्तांची सुखसोय

शिर्डी आजकाल पंढरीप्रमाणें पुण्यधाम बनली आहे. शेकडो भक्ताची ये, जा, रोजच्या रोज सतत चालू आहे. अशा पवित्र स्थानांत बाबांना केलेले नवस फेडण्यासाठीं किंवा बाबांची कृपा संपादन करण्यासाठीं जे भक्त रोजच्या रोज बहुसंख्येनें तेथें येत असतात, त्यांच्या सुखसोयीकडे जरूर तें लक्ष्य पुरविणें, त्यांच्या भक्तिभावाला कोणत्याही प्रकारें जरासुद्धां धक्का लागणार नाहीं, याबद्दल काळजी वहाणें, व त्यांच्या रहाण्यासवरण्याची, दर्शन घेण्याची पूजाअर्चेची व जेवणाखाण्याची व्यवस्था नीट लागेल याबद्दल जागरूकतेनें जपणें अत्यंत जरूर आहे नाहीं का ?

बाबांच्या दर्शनासाठीं मी शिर्डीस गेलों. परंतु तेथें माझी व्यवस्था नीट लागली नाहीं, किंवा मला गैरसोयींशीं सामना द्यावा लागला, असें एकाही भक्ताला वाटतां कामा नये. साईबाबांचें धोरण व ध्येय कोणतें होते ? ते जास्तींतजास्त कोणत्या गोष्टीसाठी जपत असत ? भक्तांना सुख समाधान लाभावें, भक्तांनीं दुःखी-कष्टी होऊं नये, तर त्यांनीं आनंदांत रहावें यासाठीं.

आणि तेंच त्यांचें ध्येय धोरण शिर्डी संस्थानच्या व्यवस्थापक व चालक मंडळींकडून आजकाल पाळलें जात आहे.

शिर्डी संस्थानचा कारभार सध्यां सरकारनें नेमलेल्या रिसीव्हरमार्फत चालू असतो. प्रत्येक रिसीव्हर आजवर आपआपल्या परीनें भक्तांच्या सुखसोयीसाठीं शक्य त्या परीनें काळजी वहात आलेले आहेत. भक्तांची सुखसोय पहाणें यासाठीं ते झटत आलेले आहेत.

सध्यांचे संस्थानचे कोर्ट रिसीव्हर श्री. बी. जी. पोतनीस यांचाही उत्साह व या बाबतींतील दक्षता वाखाणण्याजोगी आहे. त्यांनाही आपल्यावरील जबाबदारीची व कर्तव्याची पूर्ण जाणीव आहे. व त्या जाणीवेनें लहानसहान बाबतींत सुद्धां भक्त-जनांची गैरसोय होऊं नये यासाठीं ते डोळ्यांत तेल घालून जपावें तसें जपत आहेत.

## भक्तांच्या गरजा

भक्तांच्या मुख्य गरजा कोणत्या ? त्यांना रहाण्यासाठीं सर्व सुखसोयींनी सुसज्ज अशी स्वच्छ व निवाऱ्याची जागा अगदीं कमीत कमी व मामुली खर्चांत मिळणें, त्यांची पाणी, प्रकाश, व पूजाअर्चासंबंधीं व्यवस्था नीटपणें लागणें, वगैरे. या सुखसोयीं दिसायला लहानसहान व किरकोळ वाटत असल्या तरी बाहेरून तेथें येणाऱ्या भक्तांच्या दृष्टीनें त्यांना भारी महत्व आहे.

रिसीव्हरसाहेब श्री. पोतनीस यानीं हें जाणून शिर्डीत येणाऱ्या कोणाही भक्ताची कोणत्याही बाबतींत सहसा कुचंबणा होऊं नये अशी व्यवस्था ठेवविली आहे. भक्ताला तेथें येतांच त्याची दाद कमीत कमी वेळांत लागावी व कमीत कमी वेळांत त्याच्या रहाण्यासवरण्याची व्यवस्था व्हावी, अशी सुटसुटीत यंत्रणा निर्माण केली आहे.

## कांहीं सुखसोयींची कल्पना

बाहेर गांवाहून येणाऱ्या भक्तांस जागेची सोय होईपर्यंत तिष्ठत उभे रहावें लागत असे. परंतु आतां ती सोय होईपर्यंत त्यांच्या बसण्यासवरण्याची व जागेची व्यवस्था अविलंबेंकरून होण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे, भक्तांना थंडगार व स्वच्छ पाणी जरूर लागेल तेव्हां मिळावें यासाठीं जागोजाग पाण्याची सोय करण्यांत आली आहे.

पूर्वी शिर्डी संस्थानच्या मुख्य व्यवस्थापकाची कचेरी पहिल्या मजल्यावर होती. ती सर्वांच्या लक्षांत येण्याजोगी नव्हती. अलिकडे कचेरी खाली आणण्यांत आली असून ज्या कोणास कांहीं सूचना करावयाच्या असतील त्या करण्यासाठीं तेथें एक सूचना पेटी ठेवण्यांत आली आहे. रिसिव्हरसाहेब ती पेटी उघडून त्यांत पडलेल्या सूचना स्वत: वाचून त्याबाबतींत तावडतोब निर्णय घेत असतात.

### भिक्षेकऱ्यांचा प्रश्न

पूर्वी समाधी मंदिराच्या आसपास नाना ठिकाणाहून आलेल्या भिकाऱ्यांचे घोळके जमून भक्तांस सतावीत असत. हा त्रास वाचवून भिकाऱ्यांचीही सोय व्हावी अशी स्वतंत्र व्यवस्था आतां करण्यांत आली आहे.

तुम्हीं कुठेंही जा. तेथें शिस्तीचें व सुव्यवस्थेचें वातावरण आढळून आलें म्हणजे कोणाच्याहि मनाला आल्हाद वाटल्याशिवाय रहात नाहीं. भिक्षेकरी, बैरागी, संन्यासी किंवा फुलवाले यांची गर्दी आपापले मतलब साधण्यासाठीं समाधि मंदिराजवळ सहाजिकच गर्दी करीत असत; परंतु अलिकडे या परिस्थितीत अत्यावश्यक व भक्तांना उपकारक होऊन रहाणारे फेरबदल घडवून आणण्यांत आले आहेत.

शिर्डीत नव्यानें येणाऱ्या भक्ताला कुठें काय आहे हें न विचारतां समजावें यासाठीं ठिकठिकाणीं नामफलक लावण्यांत आले आहेत. स्नानगृह, लेंडीबाग वगैरे.

जेथें जमाव जमतो अशा ठिकाणीं आरोग्य रक्षणाची काळजी घ्यावी तेवढी थोडीच. संडास सदैव स्वच्छ राखणें तेथें दिवाबत्तीची सोय करणें, कुठेंही केरकचरा पडूं किंवा साचूं न देणे, याबद्दल अत्यंत कसोशीनें दक्षता घेण्यांत येत असते.

### प्रत्यक्ष देखरेख

श्री. पोतनीस हे मधून मधून सवड मिळेल त्यावेळीं मंदिराच्या चौफेर भागांतून फेरफटका मारून सकाळ संध्याकाळ सारा कारभार नीट सुरळीत चालला आहे कीं नाहीं, हें बारकाईनें पहात असतात.

शिरडीस सुमारें चार लक्ष रुपये खर्च करून सर्व प्रकारच्या उपकरणांनीं सुसज्ज असें 'श्रीसाईनाथ हॉस्पिटल' सुमारें सव्वा वर्षांपूर्वी (ता. १४।५।६४) उघडण्यांत आलें. तेथें येणाऱ्या रोग्यांच्या दृष्टीने ती संस्था त्या भागांतील एक आदर्श व लोकोपकारी संस्था व्हावी या दृष्टीनें जें जें करणें जरूर व शक्य आहे तें तें काळजीपूर्वक करण्यांत येत आहे.

श्रीसाईनाथ माध्यमीक विद्यालय हो शिर्डी येथील विद्यार्थीवर्गाच्या व शिक्षणप्रसाराच्या दृष्टीनें महत्त्वाची संस्था आहे. ती सर्व परीनें स्वयंपूर्ण, उपयुक्त व


सर्वांगसुंदर व्हावी यासाठींही झटून प्रयत्न करण्यांत येत आहेत. विद्यार्थ्यांसाठीं वसतिगृह,, त्यांना खेळण्याची साधनें व जरूर तेवढी मोकळी जागा, शिक्षकांसाठीं जवळपास रहाण्यास घरें वगैरे जरूर त्या सुखसोयी करण्याच्या दृष्टीनें प्रयत्न चालू आहेत. त्या मार्गानें पावलें पडूं लागली आहेत. भक्तांच्या सुखसोयीसाठीं आण खीही कांहीं घरें बांधण्यांत यावयाची आहेत.

कोर्ट रिसिव्हर श्री. बी. जी. पोतनीस यांनीं अशारीतीनें सुरुवात फार सुंदर केली आहे. यापुढील काळांतही अनेक सुधारणा घडवून आणण्याचे विचार त्यांच्या कल्पक डोक्यांत घोळूं लागले आहेत. श्री. साईबाबांच्या कृपेनें व सहकाऱ्यांच्या संपूर्ण सहकारानें त्या अंमलांत येवोत एवढीच आमची प्रार्थना आहे.

## श्रीसाईपूजन

मला आवडे साईपूजन
इतर कशामधीं रमे न हे मन
उठतां बसतां सांजसकाळीं
गावी वाटे साईभूपाळी
तेव्हां होई स्थिर माझें मन ॥ १ ॥
साई पाहावा चराचरांतुनि
हेवादावा दूर सारूनि
सजा देई तो पाण्यालागुनि
अनंत हस्तें कमलावराने
देतां किती घेशील दो करानें !
दाता साई प्रसन्न होऊन
कृपा कटाक्षें टाकिल भारून ॥ २ ॥

—सौ. श्री रहाणे



# श्रीसाईभक्तांना आवाहन !

साई भक्तांना माहितच आहे कीं श्रीसाईबाबा संस्थाननें सुमारे चार लक्ष रुपये खर्च करून शिरडीस खंडोबाचे देवळाशजारी एक अद्यावत भव्य "श्रीसाई नाथ हॉस्पीटल" बांधले असुन त्यांत अद्यावत् उपकरणांची पूर्तता केली असून तें दिनांक १४-५-६४ रोजीं तज्ज्ञ डॉक्टरांच्या मदतीनें सुरू करण्यांत आलें आहे.

तसेंच नजीकच संस्थानने इमारत बांधून त्यांत एस. एस. सी. पर्यंत शिक्षण देणारी श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय नांवाची माध्यमिक शाळाहि चालविली आहे. या इमारती नगर-मनमाड या हमरस्त्यावर आहेत'

आम्हांस आणखी कळविण्यास आनंद होतो कीं हॉस्पीटल व शाळा यांना जोडून संस्थाननें ७ एकर २७ गुंठे अशी विस्तीर्ण जमीन संपादन केली आहे. या जमिनींत विद्यार्थ्यांसाठीं वसतीगृह, खेळण्यास जागा, शिक्षकांसाठीं राहण्यास घरे, संस्थान व हॉस्पिटल नोकरांसाठीं वसतीगृह, भक्तांसाठीं राहण्यास घरे वगैरे बांधण्याचा संकल्प असून कांहीं भक्तांना आपल्या खर्चानें स्वतंत्र लहान लहान कॉटेजवजा घरे स्वतः जास्त दिवस राहण्यासाठीं व त्याचे गैरहजेरींत इतर भक्तांना वापरण्यास देण्यासाठीं बांधण्याची मनीषा अनेक वेंळा व्यक्त केली आहे. अशा भक्तांसाठी कांही भाग मुद्दाम राखून ठेवण्यांत येत आहे. तरी ज्या भक्तांना अशा सोईचा फायदा घेण्याची इच्छा असेल त्यांनीं खाली सही करणाराकडे त्वरीत शर्तीचा व इतर खुलासा घेण्यासाठी पत्रव्यवहार करण्यास विनंती करण्यांत येत आहे. कारण असे लहान प्लॉट थोडेच राखून ठेवले जातील. या भागास "श्रीसाईनाथ नगर" असे नांव देण्यांत येणार आहे. शिर्डीची हवा सॅनेटोरियमलायक आरोग्यदायक आहे. म्हणून ही योजना आरोग्याचे दृष्टीने आखण्यांत आली आहे. कळावे.

**भा. ग. पोतनिस**
कोर्ट रिसीव्हर


*For your Provision Requirements*

*Please Visit*

**GANESH STORES**

3rd ROAD KHAR WEST

*Branch at —*

Khar, Santacruz, (Kalina) Bandra East.




## ऑगस्ट १९६५

या महिन्यांत पर्जन्यवृष्टी अतिशय झाल्यामुळें शिर्डीस येणारे भक्तांची गर्दी थोडींशी कमी प्रमाणांत होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणेः—

### कीर्तन

सं. गवई श्री. विठ्ठलराव मराठे यांची कीर्तनें श्रीगणेश ४ थी. निमित्त एक कीर्तन श्रावण ११ श्रावण वा। ८ श्रीकृष्णजयंती व काला श्रावण शु. ११ अशी पांच कीर्तनें श्रीचे मंदिरांत झाली.

### गायन

श्री. लालजी जगन्नाथ तरे मु. मोर्बे. ता. पालघर. जि. ठाणे. श्री. महंमदखाँ छोटेखान ( वायरमन ) सेन्ट्रल रेल्वे पावरहाऊस वर्क्सशॉप कुमार रशीद महंमदखाँ परेल मुंबई नं. १२

ता. १५ ऑगस्ट स्वराज्यप्राप्ति दिनानित्त मे. माननीय कोर्टरिसीव्हर पोतनीससाहेब यांचें हस्ते श्रींचे मंदिरावर ध्वजवंदन झाले. शाळेतील मुलांमुलींना खाऊ वाटला. रात्रौ गावनभजन दिव्यांची रोषणाई वगैरे कार्यक्रम झाला.

### कृष्ण जयंती

गुरुवार दि. १९।८।६५ श्रीकृष्ण जयंती प्रित्यर्थ श्रींचेमंदिरांत रात्रौ १० ते १२ पर्यंत सं. गवई विठ्ठलराव मराठे यांचे श्रीकृष्णजन्म कीर्तन ( पाळणा ) नंतर शेजारती व सर्वास तीर्थप्रसाद ( सुंठसाखर ) स्वतः मे. सन्माननिय कोर्ट रिसीव्हर पोतनीस साहेब हजर राहून व्यवस्था पहात होते. दुसरे दिवशीं गोपाळकाला कीर्तन दहीहंडी व रात्रौ श्रीचे रथाची गांवांतून मिरवणुक गारुड भजन वगैरे कार्यक्रम झाला.

संस्थान नोकर मंडळीची जाहिर सत्यनारायण पुजा ता. ११।८।६५ बुधवारी श्रींचे सभामंडपांत चांदीचे भव्य सिंहासन मांडून संस्थान नोकर श्री. जोशी यानीं उभयता मिळून केली. नंतर [ सभा ] मे. माननियकोर्ट रिसीव्हर साहेब यांचे अध्यक्षतेखाली मंदिरावरील हॉलमध्यें होऊन सर्व नोकरांना प्रत्येकी ( दहा

रुपये ) पगारांत ( महागाईमुळें वाढ ) मिळाली म्हणून सभा होऊन मे. साहेबानी सर्वांना कळककळीचा उपदेश सर्वांनीं काम उत्तमरितीनें करावे असा केला. नंतर फराळ चहा, केळी, पोहे सर्वांना देऊन सर्व नोकरांतर्फे साहेबांचे आभार मानून हार अर्पण करून कार्यक्रम संपला

**मोठ्यांच्या भेटी**

मे. दलालसाहेब लिगल सेक्रेटरी महाराष्ट्र राज्य मुंबई व मिसेस भरुच्याबाई मुंबई यांनीं श्रीसाईपूजा सत्यनारायणपूजा केल्या.

साईसंस्थान नोकर भजन मंडळाचे या महिन्यांत दोन वेळा ( भजन ) झाले. स्वतः मे. माननीय कोर्ट रिसिव्हर पोतनीससाहेब हजर राहून भक्तीनें भजन म्हणून ( भजनें ) कशारितीनें म्हणावी याचें मार्गदर्शन केलें व सुधारणा केली.

शिर्डी येथील हवापाणी या वर्षी ( मघा ) नक्षत्राचा ( पाऊस ) सतत आठ दिवस सारखा पडत राहिला व त्यामुळे गांवांतील घरे कांहीं गळून चिखल झाल्यामुळे मंदिरांत लोकांना आश्रयासाठीं ( निवारा ) म्हणून यावे लागले. बाकी हवापाणी ठीक आहे. रोगराई नाहीं.

# एक मागणी

साई राणा ! दुःख न देऊ कुणा !
मित्र असो वा, शत्रु असो तो; सहवेना माझ्या मना —० !!
आत्मा दुःखी, काया दुःखी
कुटुंब दुःखी, जीवन दुःखी
जीवा मधे जीव ना —० !!
जगति मिळतो सधना मान
गरिबा बघती, माती समान
वैषम्य जाचे मना —० !!
सुखासाठीं करिती दळमळ
कळकळ हळहळ, आत्मी जळजळ
मळमळ सारी मना —० !!
म्हणे " नारायण " दीन दयाघना
गरिबांच्या संसारी दैना,
कर त्यांची करुणा —० !!

**—नारायण तलारवार [ शुभांशु ]**

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**– by Pradhan | | | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. घोंड | २-०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) | स्तवन-मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** by R. S. Harshid Mehta | | | २-५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** | (Eng.) | Calcutta | ००-७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00-37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : बी. जी. पोतनीस, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक: श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक: बी. जी. पोतनीस, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.